म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. 33६५

# देवाचे डिव

REFBK-0026060

राम शेवाळकर

संदर्भ निबंध
३३६५
२६५६०
२५।३।९०

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

21 MAR 1990
20 JUN 1990
27 JUN 1990
14 JUL 1990
-7 JUL 1990
11 JUL 1990
14 JUL 1990
8 SEP 1990
3 OCT 1990
10 NOV 1990
10 NOV 1990
18 AUG 1992
18 AUG 1992
21 MAY 1993

( क्रु. मा. पहा )
१००००-११-८९

# देवाचे दिवे

राम शेवाळकर

REFBK-0026060

साहित्य प्रसार केंद्र
नागपूर

प्रकाशक :
भा. ल. कुलकर्णी
साहित्य प्रसार केंद्र
सीताबर्डी, नागपूर ४४० ०१२

प्रथमावृत्ती
१९८९

© सौ. विजया शेवाळकर

मूल्य : रु. ३५/-

मुद्रक :
म. पां. बनहट्टी
नारायण मुद्रणालय
२२४ टिकेकर रोड, धनतोली,
नागपूर ४४० ०१२

चि. आशू

व

चि. सौ. मनीषा

— हे दिवे तुमच्यासाठी.

# दिवेलागण

आयुष्यात मला लाभलेले हे जिव्हाळे. यापैकी काहींनी माझ्या आयुष्याला कांती दिली, सुगंध दिला. काहींनी मला आयुष्यच दिले. आयुष्यभर पुरणारे पाथेय दिले.

वेगवेगळ्या दिवाळी अंकांच्या निमित्ताने ही व्यक्तिचित्रे साकार झाली. मला लिहिते. करणाऱ्या त्या सर्व संपादक मित्रांचे आभार. त्यानंतर आभार आमचे मित्र श्री. राजाभाऊ कुळकर्णी ह्यांचे. प्रकाशनाचे साहस त्यांचे.

आमचे मित्र श्री. मधुसूदन व बाळ बनहट्टी ह्यांनी नेहमी-च्याच आपुलकीने, तत्परतेने व सुबकपणे मुद्रणाची बाजू सांभाळली. या सर्व मित्रांचे मनापासून आभार. यांनी माझ्या जिव्हाळ्याच्या जगात प्रेमाने भर घातली.

**वणी**

चैत्र पौर्णिमा, १९११ राम शेवाळकर

३३६५

# बाई

वयानं अडीच वर्षांचा असताना मी आईविना भिकारी झालो. वडलांनी दुसरे लग्न केले नाही. म्हणून सावत्र आईचाही अनुभव नाही. आजी–आईची आई परवापर्यंत होती, तिलाच आम्ही आई म्हणत होतो आणि जन्मदात्रीला बाई. पण बाईचा लळा लागण्यापूर्वीच ती आम्हाला सोडून गेली. आता आठवू म्हटले तरी तिचे शेवटचे आजारपण तेवढे आठवते. मंदिराच्या माडीवर तिला ठेवले होते. घरी कोणतेतरी महाराज आले होते. त्यांच्याबरोबर माडीवर गेलो. त्यांनी बाईला बसते केले नि कपाळभर कुंकवाचा मळवट भरला, ही एक आठवण. तसेच एकदा तिला उपचारासाठी त्रिचनापल्लीला नेण्याच्या गोष्टी चालल्या होत्या. त्यावेळचे तिचे क्षीण बोलणे नि कोमेजला चेहरा पुसटसा लक्षात आहे. त्यानंतरची आठवण ती गेल्याचीच. भाऊसाहेब नि नारायणकाकांनी तिला अंथरुणावरून खाली ठेवले. आमची आजी रडत होती. मी पायऱ्या चढून वर गेलो. ताईही आईच्या मांडीवर बसून रडत होती. बाकी सर्व वातावरण कुंद होते. रडण्याचासुद्धा मोठा आवाज होत नव्हता. ताई माझ्यापेक्षा जेमतेम दोन वर्षांनी मोठी. तिला रडायला काय झाले होते ? बाई गेली हे तिला कळले होते कां ? की आई रडत होती म्हणून तिला रडू आले ? त्या दोघींना रडताना पाहून काही न कळता मीही रडायला लागलो:

त्यानंतर आम्हाला यमुनात्याच्या घरी नेण्यात आले. त्यांनी आम्हाला दूध-पोहे खायला दिले. तिथून परतायला संध्याकाळ उलटून गेली. घरी आलो तर सर्व सामसूम होती. अंधारातच आईने आम्हाला विहिरीवर नेले नि भडभड आमच्या अंगावर थंड पाण्याच्या बादल्या ओतल्या. त्या रात्री जेवलो की नाही ते आठवत नाही. रात्री मंदिरात हरीसमोर चटईवर आईच्या पोटाशी झोपलो. इथे बाईचा न् आमचा संबंध संपला.

सौ. गोपिकाबाई शेवाळकर ही आम्हा उरलेल्या तिघा अपत्यांची जन्मदात्री. दोन बहिणी अगोदरच गेल्या होत्या. आम्हा तिघांपैकी बाळ त्यातल्या त्यात मोठा, म्हणजे दहाबारा वर्षांचा होता. त्याला काही थोडेफार आठवत असेल. बाकी आमच्या लेखी बाईचा आईपणा काही शिल्लक नाही. आईपणाचे काही प्रसंगच आठवत नाहीत. माझ्या जन्मापासूनच आजारपण तिच्या मागे लागले. त्यानंतर अजून एक बहीण झाली. त्या बाळंतपणापासून बाई विरतच गेली. आजारपणामुळे मला आईचे दूधही मिळाले नाही. हाताच्या अंगठ्यावर दूध टाकून तो चोखायला लावीत असत. ही अंगठा चोखायची सवय मला शाळेत जाईपर्यंत होती. त्यामुळे बाईने कधी जवळ घेतल्याचे, आपला लोभ केल्याचे, किंवा आपण होऊन तिच्याजवळ गेल्याचे काही आठवत नाही. आईचे वात्सल्य, स्पर्श–वगैरेतील काव्यात्मक अनुभव आमच्या वाट्यालाच आले नाहीत. तिच्याबद्दल ओढही कधी वाटल्याचे आठवत नाही. ती गेल्यानंतर तिची उणीव जाणवल्याचे व त्यासाठी दुःख केल्याचे लक्षात नाही. एखाद्याला जन्मापासून एखादा अवयव नसतो, तशी आम्हाला आई नव्हती. जन्मापासूनच्या अशा अपंगपणाची सवय होऊन जाते. तशी मातृहीनता आमच्या अंगवळणी पडली होती. आजी, भाऊसाहेब, शेजारी–पाजारी, येणारे–जाणारे जे प्रेम आमच्यावर करीत असत, त्यानेच आम्ही कृतकृत्य झालो होतो. भाऊसाहेब सदैव फिरतीवर असायचे. आजीच्या प्रेमळ जरत्रेखाली आम्ही वाढत होतो. त्यामुळे घर असेच, एवढेच असते, घरात माणसेही एवढीच, अशीच असतात, हीच आमची समजूत होती. कुटुंबामध्ये आई नावाचे यापेक्षा वेगळे, यापेक्षा चांगले, यापेक्षा पिळाचे एखादे अस्तित्व असते, हे आमच्या गावीही नव्हते. लोक–विशेषतः स्त्रिया त्या उणिवेची आम्हाला जाणीव करून देत. त्यांच्या त्या वेळच्या शाब्दिक हळहळीने सर्वांग आक्रसून जात असे. त्या ओशाळवाण्या अवस्थेपेक्षा एखाद्याला आई असलेली पुरवली !

बाई ही गढीकर वकिलांची एकुलती एक कन्या. बाबासाहेब गढीकर अग्रगण्य वकील. पुढे शंकर महाराजांच्या संपर्काने एकाएकी वैराग्य उत्पन्न होऊन परमार्थाला लागले. चांगली चालती वकिली पांगारकरांच्या स्वाधीन केली अन् ते भागवताच्या पारायणाला बसले. घरी हे एवढेच अपत्य. तेही शेवाळकर महाराजांच्या पदरात त्यांच्या नातवासाठी घालून गढीकर महाराज संसाराच्या जबाबदारीतून मुक्त झाले. त्यावेळी बाई फक्त आठ वर्षांची होती, अन् भाऊसाहेब बारा वर्षांचे. चुलत सासऱ्याच्या बेहिशोबी व्यवहारामुळे धंद्यात खोट येऊन घरावर सावकारांची जप्ती आली, नि होते नव्हते तेवढे सगळे धुऊन निघाले. बापाने त्यावेळी दोन चांदीचे रुपये, आणि 'तुझा नवरा सगळे नुकसान भरून काढील', असा तोंड भरून आशीर्वाद दिला. त्याच्या

आधाराने बाईने पडत्या काळात भाऊसाहेबांना साथ दिली. वडिलांच्या आशीर्वादानुसार पुन्हा चालता काळ येताच आपली आवश्यकता आवरून घेऊन ती निमूटपणे निघून गेली.

बाई वर्णाने गोरीपान नि देखणी होती. शेत्राळकर वंश ठार काळा. या काळोखात आपल्या सोनपावलांनी बाईने लक्ष्मी आणली. आम्हाला जन्म देण्यापुरतीच त्यांची कांती झळाळत राहिली. जणू तेवढेच इप्सित नेमलेले होते. तेवढ्यानेच कृतकृत्य होऊन तिने अधिकाचा मोह आवरता घेतला. त्यानंतर काळोख अजूनच कभिन्न झाला.

आज मनामध्ये बाईची मूर्ती आहे ती रोजच्या फोटोपुढच्या नमस्कारामुळे. अनेकांकडून अनेकदा, नि आजीकडून पुन्हापुन्हा ऐकलेल्या आख्यायिकांनी नि आठवणींनी या मूर्तीचे काही तपशील ठळक केले आहेत. एरव्ही ती आहे तशीच आहे : पाहता पाहता विरलेल्या स्वप्नासारखी. जिवाला चटका लावून गेलेली, नि नंतर अखंड हुरहूर शिल्लक ठेवणारी. अजून ती तशीच आहे. आई असावी तर अशीच–असे वाटायला लावणारी. आणि अशी–एवढीशी आई कुणालाही असू नये, असेही कळवळून वाटायला लावणारी !

■ ■

# भाऊसाहेब

गढीकर वकिलांनी आपला चालता व्यवसाय एके दिवशी पांगारकर वकिलांच्या स्वाधीन केला व ते परमार्थाच्या मार्गी लागले. शंकर महाराजांच्या अनुग्रहामुळे त्यांच्यात हे परिवर्तन झाले. पुढे 'बाबासाहेब गढीकर महाराज' म्हणून ते ख्याती पावले. बाबासाहेब महाराजांना एकच अपत्य होते. तेही कन्यारत्न. ते त्यांनी शेवाळकर महाराजांच्या ओटीत त्यांच्या नातवासाठी घातले. वराचे वय त्यावेळी बारा वर्षांचे होते. वधूचे आठ वर्षे. गढीकर महाराज संसारातून निवृत्त झाले. गणपत वाड्याजवळ तेव्हा ते राहत असत. शेवाळकर महाराजांचा लौकिक त्यावेळी मोठा होता. वेदान्त, वैद्यक व ज्योतिष या तिन्ही क्षेत्रांमध्ये त्यांचा अधिकार सर्वमान्य होता. काही वर्षांपूर्वी परभणी जिल्ह्यातील शेवाळ्याहून श्रीमंत देशपांड्यांनी त्यांना अचलपूरला आणले. तेव्हापासून शेवाळ्याचे धर्माधिकारी अचलपूरचे शेवाळकर झाले. रामशास्त्री शेवाळकरांचा मराठवाडा व विदर्भात शिष्यपरिवारही मोठा होता. ते सिद्धहस्त कवी होते. त्यांची संस्कृत व मराठी पद्यरचना प्रकाशित झाली आहे. परभणी व अमरावती जिल्ह्यांतील नवरात्र उत्सवांमध्ये आजही ती पद्ये भक्तिभावाने आळवली जातात. शेवाळकरांचा वाडाही त्यावेळी फार मोठा होता. घरात हरिमंदिर व त्याच्याच नावे आयुर्वेदिक औषधांचा एक मोठा आर्यौषधी कारखाना होता. देवडीवर एका मुलाचे कापडाचे मोठे दुकान होते. मोठा मुलगा शेवाळ्याला व त्याखालची दोन मुले अचलपूरला होती. घरात गाई होत्या. दूधदुभते होते. विद्यार्थी, आप्तपरिवार, येणारे-जाणारे-यांचा नित्य मुक्काम व वावर असे. अशा भरल्या घरात गढीकरांची मुलगी पडली. लग्नसोहळा मोठ्या थाटात झाला. 'सन्मणीमाला' नावाच्या अचलपूरच्या तेव्हाच्या एका मासिकात या लग्नाचा सोहळा सविस्तर छापून आला होता !

मुलाचे शिक्षण मराठी चौथीपर्यंत झाले होते. पुढे त्याला संस्कृतच्या उच्च शिक्षणाकरिता बऱ्हाणपूरला पाठविण्यात आले. घरातले वळण पिढयानुपिढया वेदान्त्याचे–शास्त्र्याचे. त्यामुळे निर्वाहाचा प्रश्न नव्हता. सुदैवाने गळाही चांगला होता. मित्रांच्या आग्रहाखातर गावातील एका देवळात एक दिवशी त्याचे सहज कीर्तन झाले. 'भाऊने चांगले कीर्तन केले' ही बातमी श्वशुराच्या कानापर्यंत गेली. त्यानी जावयाला बोलावून 'कीर्तनतरंगीणि' त्याच्या हातात दिली, नि त्याला कीर्तनाचा अभ्यास करायला सांगितले. इतकेच नव्हे तर येत्या एकादशीला नारायणाच्या देवळात आपल्यासमोर कीर्तन करायला लावले. ते ऐकल्यावर चातुर्मासातील प्रत्येक एकादशीला आपल्या उपस्थितीत कीर्तन करण्याची जबाबदारी त्याचेवर टाकली. अशा रीतीने शास्त्र्यांच्या घरात पहिल्यांदा कीर्तन आले.

इकडे महाराज थकत चालले होते. म्हणून त्यांनी चतुर्थाश्रम स्वीकारण्याची इच्छा व्यक्त केली. त्या वर्षीच्या श्रावण शुद्ध प्रतिपदेला महाराजांनी संन्यासाची शास्त्रोक्त दीक्षा घेतली. तेव्हापासून रामशास्त्री शेवाळकरांचे 'रामकृष्णानंद-स्वामी महाराज' झाले. पुढे त्यांची प्रकृती उत्तरोत्तर क्षीण होत गेली. म्हणून बाबासाहेबांनी भाऊसाहेबांना सांगितले. 'या एकादशीचे कीर्तन नारायणाच्या देवळाऐवजी तुमच्या घरीच होईल–महाराजांच्या समोर'. याप्रमाणे श्रावण शुद्ध एकादशीला संध्याकाळी घरातल्या चौकात देवघरासमोर भाऊसाहेबांचे कीर्तन झाले. महाराजांनी पहिल्यांदा त्यांच्या नातवाचे कीर्तन शेवटपर्यंत ऐकले. कीर्तन संपले. आरती झाली. भाऊसाहेबांनी देवाला साष्टांग नमस्कार घातला. नंतर भाऊसाहेबांनी महाराजांच्या पायावर मस्तक ठेवले आणि नेमक्या त्याच-वेळी महाराजांनी देह ठेवला.

अमरावतीहून कमिशनरची खास परवानगी आणून घरातच हरिमंदिराच्या बाजूच्या जागेत महाराजांना समाधी देण्यात आली. सारे अचलपूर दुःखाने नि भक्तीने हा सोहळा पाहण्यास लोटले होते.

आपले तेज आपल्या नातवामध्ये संक्रमित करून कृतकृत्यतेच्या भावनेने महाराजांनी देहविसर्जन केला, अशी भाविकांची श्रद्धा होती. तेव्हापासून घरातील पारंपरिक उपासनांबरोबरच कीर्तनाची नवी उपासना भाऊसाहेबांनी स्वीकारली व चौसष्ट वर्षे अखंड निष्ठापूर्वक पार पाडली.

महाराज गेल्यानंतर पुढे घराचे दिवस फिरले. देवीदास काकांना काप-डाच्या व्यापारात खोट येऊन पुढे धंदा बसला. धंद्यापोटी झालेले अवाढव्य कर्ज वसूल करण्याकरिता सावकारांनी घरावर जप्ती आणली. घरातील सर्व काही गेले. महाराजांच्या फोटोचासुद्धा लिलाव झाला. काही दिवस सर्व

कुटुंबाला राहते घर सोडून ओकांच्या वाड्यात निर्वासिताचे जिणे जगण्याची पाळी आली. भाऊसाहेबांची बायको–बाई–त्यावेळी जेमतेम चौदा वर्षांची होती. या दुर्घट आपत्तीने ती कावरीबावरी झाली. आपल्या वडिलांजवळ जाऊन रडू लागली. बाबासाहेबांनी तिची समजूत घातली आणि सांगितले, " काही काळजी करू नकोस. तुझा नवरा गेलेले सगळं मिळवून देईल." असे म्हणून बाबासाहेबांनी आपल्याजवळचे चांदीचे चार राणीछाप रुपये पोरीच्या हाती दिले. तिने ते आपल्या देवांत ठेवले. पुढे रोज त्याचीही पूजा होऊ लागली. आणि पाहता पाहता खरेच दिवस पालटले. पूर्वीसारखे दिवस येऊ लागले. तेवढा व्याप राहिला नाही पण गेलेला आब परत आला. लौकिकही वाढू लागला.

कीर्तनाच्या निमित्ताने भाऊसाहेबांची भ्रमंती सुरू झाली. १९२२ मध्ये त्यांचा वणीशी संबंध आला. वणीचे संतश्रेष्ठ आप्पाजी महाराज ढुमे यांचा त्यांच्यावरती लोभ जडला आणि त्यांनी आपले शिष्य पाटणबोरीचे इजारदार भाऊजी देशपांडे यांना व्यंकटेशाच्या नवरात्रासाठी या नव्या कीर्तनकाराचे नाव सुचविले. भाऊसाहेबांचे वय त्यावेळी जेमतेम एकवीस वर्षांचे होते. पाटणबोरीला श्रीमंत माधवराव महाराज यांच्याशीही स्नेह जुळला नि दरवर्षी मार्गशीर्ष मासभर कीर्तनाचे तिथलेही आमंत्रण आले. वणी, पाटणबोरी, पांढरकवडा, राळेगाव, आपटी, जळका, सात्रंगी या यवतमाळ जिल्ह्यातील गावांशी संबंध हळूहळू वाढत गेले. गेली त्रेसष्ट वर्षे शेवटपर्यंत कुठेही खंड न पडता पहिल्यासारखेच टिकून राहिले एवढेच नव्हे, तर उत्तरोत्तर अधिकाधिक उत्कट व जिव्हाळ्याचे होत गेले.

भाऊसाहेबांना एकच बहीण होती. ती रामदासी महाराज तोडेवाले यांच्या मुलाला, बाबुरावला, दिली होती. आई लहानपणीच गेली. पुढे वडिलांनी, आप्पाजींनी दुसरे लग्न करायचे ठरवले. तेव्हा भाऊसाहेब त्यांच्या लग्नाची अक्षत द्यायला घरोघर सपत्निक गेले होते. गावाच्या दृष्टीने हा कुतुहलाचा, टीकेचा व कुचेष्टेचाही विषय झाला असेल पण भाऊसाहेबांचे मन निर्मळ होते. मुलाच्या लग्नात बापाने पोराचे करावे, तसे वडिलांच्या लग्नात भाऊसाहेबांनी आप्पाजींचे सर्व सोहळे मन:पूर्वक केले.

आप्पाजी गेल्यानंतर घर सगळे भाऊसाहेबांवर पडले. तत्पूर्वीही मोठा मुलगा या नात्याने घरातील सर्व काही तेच पाहत होते. आता सगळेच त्यांच्यावर येऊन पडले. भाऊसाहेबांनी आजोबांचे, आईचे, वडिलांचे, बहिणीचे खूप केले. शेवटच्या दुखण्यात त्यांच्या शरीरशुद्धीपर्यंतची सर्व सेवा न कंटाळता केली. बाबासाहेब महाराज गेल्यानंतर आमची आजी मुलीजवळच येऊन

राहिली होती .भाऊसाहेबांनी तिचेही शेवटपर्यंत आईसारखे केले. पुढे वयाच्या चौतिसाव्या वर्षी बाळंतपणात क्षयाची बाधा होऊन बायको अंथरुणावर पडली. तिचीही शुश्रुषा भाऊसाहेबांनी सर्वस्व ओतून केली. उपचारासाठी तिला त्रिचन्नापल्लीला नेले. तिच्या शेवटच्या आजारात उकरडाजी महाराज घरी येऊन गेल्याचे मला आठवते. बाईला त्यांनी आपल्या हातांनी कपाळभर मळवट लावला. पण हे उपचार, शुश्रुषा, नवस, अंगारेधुपारे यापैकी कशालाही दाद न देता बाईनेही एक दिवस देह सोडला. आपली तीन मुले विधवा आईच्या व भाऊसाहेबांच्या ओटीत घालून ती निघून गेली. आता घरात म्हातारी सासू, तीन लहान मुले नि भाऊसाहेब एवढेच उरले. पैकी भाऊसाहेब नेहमी फिरती-वरच असत. अधूनमधून घरी येत. काही दिवस राहून पुन्हा निघून जात. आता आठवते : भाऊसाहेबांच्या पत्राची, येण्याची आम्ही लहानपणी किती वाट पहात असू. आपण शाळेत असताना भाऊसाहेब घरी आले असतील या ओढीने शाळा सुटल्याबरोबर घरी यावे नि भाऊसाहेब आलेले नसावेत. त्यांच्या नावाने दाराच्या कडीत पळी घालून ठेवावी–यासारख्या उपायाने ते लवकर घरी येतील या आशेवर राहावे : अशी आसावून आम्ही वाट पाहात राहिलो की, अचानक भाऊसाहेब यायचे. पेटी–तबला, सामानाची पेटी हमालाच्या डोक्यावर देऊन वेशीवरून पायी चालत यायचे. कधीतरी त्यांच्याबरोबर त्यांचे साथी-दारही असत. भाऊसाहेब आले की आमच्या घरात उत्सव व्हायचा. या उत्सवाची दोन ठळक लक्षणे म्हणजे घरात कंदिल लागायचा. एरव्ही, आम्ही चिमणीच्या प्रकाशातच आमचे सारे व्यवहार आटोपत असू. आणि भाऊसाहेबां-साठी जेवणात भात व्हायचा. चारी ठाव स्वयंपाक व्हायचा.

भाऊसाहेबांचे बाराही महिन्यांचे वेळापत्रक ठरलेले असायचे : सुरुवातीला चैत्रात राममठातील रामनवमी व हनुमान जयंतीच्या उत्सवात पंधरवडा जायचा. वैशाखात अचलपूरच्या सर्व जमीनदार देशपांड्यांकडे नरसिंहाचे नवरात्र व्हायचे. ज्येष्ठात दशाहार व पौर्णिमेला पळसोदला बाबासाहेब गढीकरांची पुण्यतिथी. आषाढात अचलपूरच्या देशमुखांकडे व गणगण्यांकडे रुख्मिणी–पांडुरंगाचा उत्सव. श्रावण महिना वणीला पुराणिकांकडे, जन्माष्टमीचे नवरात्र अप्पाजी महाराजांच्या गोपाल कृष्ण मंदिरात. मध्येच एकादशीला महाराजांच्या पुण्यतिथीला अचलपूर. भाद्रपदात वणी व सावंगी. आश्विनात पाटणबोरी व आपटी, देशपांड्यांकडे व्यंकटेशाचे व थोडग्यांकडचे आठवीचे नवरात्र असायचे. दिवाळी घरची व्हायची. पुन्हा दीड महिना पाटणबोरी, पौष पौर्णिमेच्या सुमारास पाटाळच्याच्या धुळदशमीच्या यात्रेसाठी वणीला यायचे. माघात पुन्हा शिवरात्रीच्या नवरात्रासाठी वणी. फाल्गुन तेवढा मोकळा असायचा. दरम्यान दहिहंडा, आर्वी, चंद्रपूर, दर्यापूर, असे उत्सव

असायचेच. वर्षातून सर्व मिळून महिना दीडमहिना घरी मुक्काम असे. दिवाळी सोडली तर सणवार सगळे बाहेर व्हायचे. त्यावेळचा सर्व्हिस मोटारचा तो लांबलचक, कंटाळवाणा प्रवास, बरोबर सामान, कीर्तनाची अवजड वाद्ये, याशिवाय दोन आंधळे साथीदार. हा सर्व लवाजमा घेऊन भाऊसाहेबांचा प्रवास चालायचा. वाटेत चहा तेवढा व्हायचा. रात्री मुक्कामावर पोहोचल्यावर स्नान–संध्या–पूजा–श्रीमद्‌भागवत पाठ झाल्यावर मग जेवण. की लगेच कीर्तनाला उठायचे. भाऊसाहेबांचे दोन्ही साथीदार आंधळे होते. त्यांचेही सगळे भाऊसाहेबांना करावे लागे. प्रवासात, परगावी कुठेही असोत, भाऊसाहेब त्यांचे न कुरकुरता प्रेमाने करीत.

गेली पासष्ट वर्षे हा नित्यक्रम अव्याहत चालू होता. यामध्ये कुठे शीण, कधी कंटाळा नाही. चालढकलपणा नाही. सूर्याच्या नियमितपणाने भाऊसाहेब हे सर्व पार पाडीत. तेही मनःपूर्वक करीत. मनःपूर्वकता हा भाऊसाहेबांच्या कामांचा विशेष होता. सकाळच्या साध्या तोंड धुण्यापासून तो आंघोळ, पूजा, पारायण, जेवण, पत्रलेखन, ते कीर्तनापर्यंत सर्व काम स्वच्छ, नीटनेटके असे. भाऊसाहेबांची पूजा व देवघर प्रेक्षणीय असे. सर्व सोपस्कार, तपशीलवार, शास्त्रोक्त, हार्दिक व देखणे असत. देवाला फुले वाहताना बेल, फुले, तुळशी यांच्या रंगसंगतीकडे लक्ष असे. पूजेनंतर देवघराचा एक सुंदर पुष्पगुच्छ झालेला दिसे. सारे देवघर लख्ख व प्रसन्न दिसे. जेवतानाही भाऊसाहेब प्रत्येक पदार्थाला न्याय देत. चवीने जेवत. बटाट्याशिवाय इतर फळभाज्या त्यांना आवडत नसत. पालेभाज्या घ्यायचे. जेवणानंतर ताट स्वच्छ झालेले असायचे. इतके की, ते अजून वाढायचेच आहे, असे वाटावे. रोजच्या कार्यक्रमाची, कामांची व हिशोबाची वहीत काटेकोर नोंद ठेवायची त्यांना सवय होती. हिशोब असो की पत्र–अक्षर एकसारखे यायचे. ते सुंदर नसले तरी सुवाच्य होते.

कीर्तनकार म्हणून भाऊसाहेबांचे विदर्भातील स्थान अनन्यसाधारण होते. कीर्तन हा त्यांचा व्यवसाय नव्हता. तो त्यांचा जीवितधर्म होता. त्यामुळे त्यांनी बिदागीचा कधी आग्रह धरला नाही. त्यामुळे बिदागीच्या रकमेत पन्नास वर्षानंतरही वाढ झाली नाही, त्याचे त्यांनी कधी वैषम्य मानले नाही. जे मिळेल त्यात ते तुष्ट असत. त्याबद्दल कुरकुर नाही. हळहळ नाही, अनुताप नाही. घरच्या पुण्यतिथीत ते वेळेवर कीर्तनाला उभे राहत. सुरवातीला साथीदारांखेरीज एकही श्रोता नसे. तरीही कीर्तनाची नेमलेली वेळ चुकत नसे. विचारले तर म्हणत, "महाराज आहेत ना, ते असले की पुरे". तरीही कीर्तनात तन्मयता तीच. श्रोत्यांची वाट पाहण्याची कधी गरज वाटली नाही. त्यामुळे श्रोत्यांचा अनुनय करण्याची आवश्यकता पडली नाही. कीर्तनात पाल्हाळ

नाही. विषयांतर नाही; हीन अभिरुचीचे विनोद नाहीं; प्रचलिताला कुचेष्टेचे ओरखडे नाहीत. वर्तमानावर प्रासंगिक भाष्य असायचे. पण तेही नेमस्त. कीर्तन कसे आटोपशीर, अंगासरसे बेतलेले वाटायचे. सुरवातीला भाऊसाहेबांनी कीर्तनाच्या परीक्षा दिल्या. कीर्तन–पटू, कीर्तन–विशारद अशा पदव्या मिळवल्या. पहिल्या कीर्तन–पटू परीक्षेच्या प्रमाणपत्रावर तर नरसिंह चिंतामण केळकर, शिवराम महादेव परांजपे यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. 'कीर्तन केसरी' ही पदवी त्यांना अलीकडे श्रीशंकराचार्यांनी दिली. त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त अचलपूरच्या नागरिकांनी त्यांचा भव्य सत्कार केला; त्यांना मानपत्र दिले व 'भाऊसाहेबांची त्यांच्या गावात कदर नाही' हा दीर्घकाळचा आक्षेप फोल ठरवला. महाराष्ट्र शासनाने पुण्याला ना. जयंतराव टिळक यांच्या हस्ते त्यांचा सन्मान केला. त्यांचा शेवटचा सत्कार गेल्या फेब्रुवारीत नागपूरला बुटींच्या महादेव मंदिरात वैदर्भीय हरिकीर्तन संस्थेतर्फे करण्यात आला. त्या सत्काराला त्यांना येता येणे शक्य होईल की नाही, अशी शंका होती. पण भाऊसाहेब आवर्जून आले.

कीर्तन ही भाऊसाहेबांची आवड होती. उपासनाही होती. भाऊसाहेबांची कीर्तने ऐकणे हा एक निरामय आल्हाद असायचा. ज्ञान, उपस्थिती, श्रुतयोजन यांच्याबरोबरच वक्तृत्व, संगीत व नाट्य या सर्वांच्या रसायनातून सिद्ध झालेली कलाकृती–असे स्वरूप पाहता पाहता त्याला येई. रसवत्ता हा त्या कलाप्रयोगाचा आत्मा असायचा. 'जय जय रामकृष्ण हरी' या पहिल्या पदापासून ते 'आपुलिया बळे नाही बोलवत' या समारोपांच्या अभंगापर्यंत कीर्तनाच्या रूपाने एक बहुरंगी चैतन्य त्या ठिकाणी विलसताना दिसे. सर्व प्रयोगक्षम कलांचा संगम असलेला एकपात्री प्रयोग या दृष्टीने कीर्तनकला ही त्या काळात अतिशय लोकप्रिय होती. चित्रपट, रेडिओ, टी. व्ही. ही रंजनसाधने त्यावेळी आलेली नव्हती. नाटकेही सटीसहामाशी होत. त्यामुळे रंजनासाठी भुकेल्या पौरजनांना कीर्तन हे एक प्रमुख आकर्षण होते. भाऊसाहेबांच्या कीर्तनाला या सगळ्या कलांगांबरोबरच भक्तीची डूब होती. कलासाधनेपेक्षाही ईश्वरोपासना हे प्रयोजन प्रमुख होते. परमेश्वराची कलारूप सेवा या दृष्टीनेच त्यांनी कीर्तनाची साधना वाढविली होती. आख्यानांचा संग्रह भाऊसाहेबांजवळ विपुल होता. मुद्रित, लिहवून घेतलेली व स्वत: लिहिलेली अशी चारपाचशे आख्याने त्यांच्या जवळ असतील. त्यामुळे कीर्तनाचा उत्तररंग हमखास रसपूर्ण होत असे. पूर्वरंगही अतिशय आकर्षक असायचा. विवेचन, युक्तिवाद, कोटिक्रम, अवतरणे, बोधकथा, हास्यकथा इत्यादींच्या साह्याने त्यांचा पूर्वरंग एखाद्या ललित निबंधासारखा विलोभनीय होई. श्रोते पूर्वरंगातही रंगून जात. भाऊसाहेबांनी ऐनपणात केलेल्या कीर्तनांच्या आख्यायिका ठिकठिकाणचे श्रोते अजूनही भरून येऊन

सांगतात. महिना महिना कीर्तने चालायची. पण एकदाही एका आख्यानाची पुनरावृत्ती नाही. रोज नवीन आख्यान. आठ आठ दिवस चालणारी नलदमयंती-सारखी, सुभाषबाबूंसारखी आख्यानेही असत. त्या काळात विशेषतः ऐतिहासिक कीर्तने खूप लोकप्रिय असत. दिवस पारतंत्र्याचे होते. त्यामुळे पूर्वदिव्याबद्दल थरथरते आकर्षण असायचेच. पोवाडे, तिवारींची संग्रामगीते ह्यांच्या साह्याने ती आख्याने अधिकच आवेशपूर्ण नि नाट्यपूर्ण होत. भूतकाळातील तो उर्जस्वल प्रसंग शब्द, सूर व अभिनयाच्या साहाय्याने श्रोत्यांसमोर साकार झाला की ते रोमांचित व्हायचे. कीर्तनांना त्या काळी तरुण मुलांची गर्दी अधिक लोटायची. निरूपणानंतर उपरण्याने कंबर बांधून उभे राहिले की भाऊसाहेबांच्या अंगात रंगदेवतेचा जणू संचार व्हायचा.

भाऊसाहेबांच्या आख्यानांच्या संग्रहात त्यांनी स्वतः रचलेली आख्याने अनेक होती. त्यापैकी माधवराव महाराजांचे चरित्र व गोपालकाला अशी दोनच आख्यानांची पुस्तके प्रकाशित झाली आहेत. निरूपणाची दोन पुस्तके 'निरूपणचंद्रिका' भाग १ व २ ह्या नावाने प्रकाशित झाली आहेत. याचे श्रेय वीणाबेन हरदास हिच्या हट्टाला, चिकाटीला व परिश्रमाला देणे भाग आहे. याखेरीज अनेक निरूपणे व सर्व आख्यानेही त्यांच्या हयातीतच प्रकाशित व्हायला हवी होती. ती होऊ शकली नाहीत. याबद्दलची खंत मनाला आता काळवंडून टाकते.

पुढे पुढे भाऊसाहेबांच्या कीर्तनातील वीरश्री ओहटली. त्याला एक कारण : वय. पण महत्त्वाचे कारण बाबुराव महाराज ढुमे ह्यांचा मृत्यू. बाबुराव महाराजांवर भाऊसाहेबांचे लहान भावासारखे प्रेम होते. त्यांच्या अकाली निधनाने भाऊसाहेब एकदम ओसरले. त्यानंतर त्यांचा भर भक्तिपर कथानकांवर राहिला. त्यात बाकी ते समरसून जात. अलीकडे तर त्यांना सारखा गहिवर यायचा. आपल्या आयुष्याचा अंत कीर्तन करताना व्हावा अशी त्यांची आस होती. असा एक मृत्यू त्यांनी ऐकला होता : देवनाथ महाराजांचा. ग्वाल्हेरला रामनवमीचे कीर्तन आटोपल्यावरचा. असाच दुसरा मृत्यू त्यांनी प्रत्यक्ष पाहिला होता : रामदासी महाराजांचा. रामनवमीच्याच दिवशी. मानवतला. कीर्तनाची वही त्या दिवशी भाऊसाहेबांनी त्यांना माडीवरून आणून दिली होती. आरती संपल्यावर महाराजांनी देवाला साष्टांग नमस्कार घातला–ते उठलेच नाहीत ! या मृत्यूचा भाऊसाहेबांच्या कोवळ्या मनावर दीर्घजीवी परिणाम झाला. वाटायचे, उरलेल्या आयुष्यात अचलपूरला महाराजांजवळ रहावे. आपल्या गुरूची आराधना करावी. कीर्तनसेवा करावी. ती करीत असतानाच जगाचा निरोप घ्यावा !

लहानपणी भाऊसाहेब क्रिकेट खेळायचेच हे ऐकले तेव्हा मला आश्चर्य वाटले. पण शेवाळयाला त्या क्रिकेट टीमचा फोटोच बघायला मिळाला. त्यात भाऊसाहेबांच्या डोक्यावर हॅट आहे !

भाऊसाहेब पेटी चांगली वाजवीत. बावन एक्क्यामध्ये भाद्रपदातल्या शुद्ध षष्ठीला जे नाटक होत असे, त्याला भाऊसाहेब पायपेटीवर साथ करीत. कित्येकदा नाटकासाठी पदेही तेच लिहून देत. त्यांना चालीही तेच लावीत. श्रावणातल्या पुण्यतिथीनंतरचा महिना नाटकाच्या तालमीतच जाई. पुन्हा पाटणबोरीला दसऱ्याला तेच.

अचलपूरला भोलारामचा मठ आहे. समर्थ शिष्य भोलाराम ह्याच्या हातचा शेणामातीचा मारुती त्या मठात आहे. तरुणपणी भाऊसाहेबांनी त्या मठाचा जीर्णोद्धार केला. त्यासाठी जिवाचे रान केले. त्याची वर्षभराची व्यवस्था लावून दिली. गावाबाहेरचे भोलारामचे समाधी-स्थान निश्चित करण्यातही त्यांचा मोठा वाटा आहे.

बाबुराव महाराजांची अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण करण्यासाठी भाऊसाहेबांनी वणीला श्रीमद्‌भागवताचा स्वाहाकार केला. पंढरपूरला आप्पाजी महाराजांची पायी पालखी नेली. वणीला आप्पाजीमहाराज व बाबूराव महाराज, अचलपूरला शेवाळकर महाराज व गढीकर महाराज व पाटणबोरीला माधवराव महाराज ह्यांचे पुतळे स्थापन केले. तिन्ही ठिकाणी मोठमोठे यज्ञ व स्वाहाकार केले. तिन्ही गावांचे वळण अध्यात्मप्रवण राखण्यात भाऊसाहेबांचे योगदान मोठे आहे.

एक राहते घर सोडले, तर शेवाळकरांकडे कधी स्थावर व जंगम संपत्ती नव्हती. होती तिचा उद्वेगजनक अस्त त्यांना आयुष्याच्या सुरवातीलाच पहावा लागला. कीर्तनाच्या बळावर पोटापुरते मिळवावे व मिळालेले हातोहात खर्च व्हावे. असेच त्यांचे भागधेय होते. आयुष्यभर त्यांनी विदर्भभर वणवण केली. आम्हा मुलांना कुठे काही कमी पडू दिले नाही. त्यातच आमची शिक्षणे झाली, लग्ने झाली. आमचे घर त्यावेळी सुखवस्तू वर्गातच जमा होणारे होते.

ऐन तारुण्यातच अर्धांगी डाव अर्धा टाकून उठून गेली. आम्हा मुलांकडे पाहून भाऊसाहेबांनी दुसरे लग्न केले नाही. या घटनेने जणू त्यांना विरक्तीचा विधिसंकेत मिळाला. सर्व प्रपंचात राहूनही भाऊसाहेब आसक्तीपासून विलक्षण अलिप्त होते. आपल्या मातृहीन लेकरांवर त्यांचा लोभ होता. पण त्यातही ते गुंतून पडले नाहीत. एक्कावन्न वर्षे त्यांनी बापाबरोबर आईचीही भूमिका केली. एवढेच की या आईचे वात्सल्य शेवटपर्यंत अबोल होते. बाई गेल्यापासून आमचे लालनपालन आमच्या आजीने केले. घरामध्ये वडीलधारी ती एकटीच

होती. तिनेच हे तिन्ही मांसाचे गोळे वाढवले. ती सारे ममतेने करायची. पण तिचा स्वभाव तापट होता. रागावली की आम्हाला बदडायची. भाऊसाहेबांनी तिला कधी अडवले नाही. ब्र काढला नाही. स्वत: त्यांनी तर कधी आमच्यावर बोटसुद्धा उगारले नाही. रागावलेही नाहीत. त्याची आवश्यकताही पडली नाही. केवळ एखादी गोष्ट त्यांना आवडली नाही. एवढे कळले तरी आम्ही कोमेजून जायचो.

भाऊसाहेब जुन्या वळणाचे होते पण आपल्या मतांची त्यांनी मुलांवर कधी सक्ती केली नाही. घरातील वळणाचे शिक्षणसुद्धा आम्हाला त्यांच्याकडून मिळाले नाही. मुंजीनंतर काही वर्षे संध्या केली असेल तेवढीच, नित्यपूजा, रुद्र, पवमान, आम्ही शिकावे अशीसुद्धा अपेक्षा बाळगली नाही. मी विद्यार्थी काँग्रेसचे काम करीत होतो. सोवळे–ओवळे, विटाळ-चंडाळ हे मला कधीच जमले नाही. त्याबद्दलचे, अस्पृश्यतेबद्दलचे, जातिभेदाबद्दलचे माझे विचार व आचार ते ओळखून होते. त्यांनी त्याबद्दल नापसंती दाखवली नाही. प्रसंगी माझ्या पाठीशी उभे राहिले. तेसुद्धा तेवढे कर्मठ नव्हते. उदार होते. माणुसकी पाळणारे होते. एकनाथांच्या उदार मानवतावादी दृष्टिकोणाचे केवळ संकीर्तन करणारे नव्हते, आचरण करणारे होते. त्यांच्या या भूमिकेचा मला नेहमीच आधार वाटे. कित्येकदा त्यांच्या आवडत्या मतांवर, श्रद्धांवर आघात करण्याचे प्रसंग माझ्यावर येत. पण तरीही कुठे नाराजी नाही. लोभात अंतर पडले नाही. माझे लग्न त्यांच्या मनाविरुद्ध झाले. त्याचेही त्यांनी मोकळ्या व मोठ्या मनाने स्वागत केले. नव्या सुनेवर बापाइतकेच प्रेम केले. माझ्या संसारात ते अधिकच रमले. माझ्या घरात येणारे–जाणारे यांना धरबंध नव्हता. स्वयंपाकघरापर्यंत त्यांचा मुक्त वावर असे. भाऊसाहेबांनी हे कधी वर्ज्य मानले नाही.

बाप म्हणून सांगत नाही, पण भाऊसाहेबांइतके स्वच्छ मन मी कधी पाहिले नाही. कुणाबद्दलही राग नाही, द्वेष नाही, कमीजास्तपणा नाही. आपपर भाव नाही. वागण्यात वाकडेपणा नाही. बोलण्यात कटुता नाही. टीका, निंदा नालस्ती, अवहेलना, भांडण–या वाग्दूषणांचा स्पर्श नाही. कुणाचीही चांगलीच बाजू पाहतील. लक्षात ठेवतील. इतरांना सांगतील. एखाद्यावेळी एखादी गोष्ट त्यांना आवडत नसेलच असे नाही. तेवढ्यापुरते ते कटाक्षाने लक्षात आणून देत, बस्स ! तेवढेच. त्यानंतर ते त्यांच्या लक्षातही राहत नसे. एरव्ही चांगले तेवढेच लक्षात ठेवायचे. त्यामुळे लग्नाच्या व्यवहारातसुद्धा कुणीही त्यांना वाईट दिसत नसे. 'नाकडोळे जागच्या जागी' ही त्यांची सौंदर्यविषयक कल्पनेची सरहद्द होती. 'मुलगा फार काळा नाही. माझ्याएवढा आहे', अशी गंमतीने भलावणही करीत आणि हसत. खरे म्हणजे भाऊसाहेब फार काळे होते.

(आमची जन्मदात्री, 'बाई' गोरीपान होती. रंगाच्या बाबतीत आम्ही मुले भाऊसाहेबांशी एकनिष्ठ राहिलो !)

कीर्तनकार वा वेदान्ती यापेक्षा सत्पुरुष म्हणूनच भाऊसाहेबांचा लौकिक होता. त्यांचे निष्कपट मन, साधुतुल्य आचरण, अनासक्त वृत्ती व निःस्वार्थ स्वभाव यामुळे हा लौकिक सार्थही ठरायचा, अनेक निराधारांना, अनाथांना भाऊसाहेबांनी त्यांच्या आयुष्यात उभे केले. स्वतःचे वजन खर्च करून अनेकांना नोकऱ्या मिळवून दिल्या. अनेक नडलेल्यांची लग्ने लावून दिली. त्यांच्या संसारालाही मदत केली. त्या मुलींची माहेरपणे केली. त्यामुळे अनेक कुटुंबाना भाऊसाहेबांबद्दल पितृत्वाची, पालकत्वाची भावना होती. ही नाती भाऊसाहेबांनी शेवटपर्यंत कायम ठेवली होती, गुप्तदानाचा तर हिशोबच नाही. भाऊसाहेबांच्या या औदार्याचा गैरफायदा घेणारेही काही लोक निघाले. तरी मूळ वृत्तीत फरक नाही. केल्या अपराधाची लाज वाटावी—असे सौजन्य व संरक्षण चुकलेल्यांनाही मिळाले अंगावरचे उपरणे धोतर व सदरा यांचेही हक्कदार गावोगावी असत. बरे, हे सारे निःशब्दपणे चाले. याची त्यानंतर कुठेही वाच्यता नाही. घेणाऱ्याला शरमिंदे करील असा उपकाराचा उद्गार नाही. त्यानंतर खुद्द भाऊसाहेबही ते मनात ठेवत नसत.

कीर्तनाच्या निमित्ताने जवळजवळ पासष्ट वर्षे गावोगावच्या संपन्न कुटुंबामध्ये भाऊसाहेबांचे वास्तव्य असायचे. त्यांच्या घरात त्यांचा निःशंक वावर असायचा. त्यांच्याभोवती महिलांची गर्दी गृहीतच होती. त्यात तरुण रूपवतींचाही भरणा असे. पण त्यांचा त्यांच्या अंगावर कुठे शिंतोडा नाही. ऐन तारुण्यात बायको गेल्यानंतर विवाहाचा विचार त्यांच्या मनात आलाच नसेल असे नाही. कीर्तनासारख्या लोकप्रिय रंजनक्षेत्रात मोहाचे क्षणही आले असतील. परंतु त्यांना बळी पडल्याचे एकही उदाहरण नाही ज्या कारणासाठी व ज्या निर्धाराने विवाहाचा विचार बाजूला ठेवला. त्याच कारणासाठी हे मोहही कटाक्षाने टाळण्यात असामान्य निग्रह आणि संयम दिसून आला.

अलीकडे भाऊसाहेबांबद्दल अचलपूरमध्ये भक्ती वाढीला लागली होती. यापूर्वी भाऊसाहेबांबद्दलचा विरोध तसा कधीच कुणाचा नव्हता. फक्त नित्याची उदासीनता होती. बधिरता होती. थोरपुरुषांच्या भोवती त्यांच्या गावामध्ये द्वेषाचे रान माजलेले दिसते. साधी त्याची गुणवत्ता समजून घेण्याच्या बाबतीत-सुद्धा एक नाठाळ चुकारपणा व उर्मटपणा आढळतो. तोही इथे नव्हता. भाऊसाहेब कधीच कुणावर रागवत नसत. त्यामुळे त्यांचे कधीच कुणाशी भांडण होण्याची शक्यता नव्हती. तरी विशिष्ट भाविक वर्ग सोडला तर वातावरण उपेक्षेचेच होते. अलीकडे ते फार मोठ्या प्रमाणावर बदलल्याचे

आढळले त्यांच्याबद्दलच्या मान्यतेचे व आदराचे वर्तुळ कधी नव्हे इतके वाढलेले दिसले. त्यांची कीर्तने, नित्याची सामुदायिक उपासना यामुळे अवघ्या गावाला देवभक्तीचे वळण लागले. यात वार्धक्याबरोबरच तारुण्य व बाल्यही समाविष्ट होते. कुठल्याही धार्मिक कार्यक्रमाला होणाऱ्या गर्दीकडे पाहून या बदलाची साक्ष पटत होती.

भाऊसाहेबांचे आरोग्य शेवटपर्यंत चांगले होते. प्रवास, दगदग, जागरणे, कार्यक्रम यांचा अखंड ससेमिरा असूनही त्यांची प्रकृती निकोप होती. भूक पचनशक्ती, झोप सर्व व्यवस्थित होते. रोज सकाळी संध्येनंतर बारा सूर्य-नमस्कार घालण्याची त्यांना सवय होती. वयाच्या सत्तरीनंतर–आताआतापर्यंत–ते सायकलीवर फिरत असत. अलीकडे बाकी त्यांना शीण जाणवायचा. अंथरुणावर पडताना 'अरे रामारे' म्हणून कण्हत असत. ते कधी आजारी पडले आहेत, आजारामुळे त्यांचे कार्यक्रम खोळंबले आहेत, नित्याच्या वेळा-पत्रकात बदल करावा लागला आहे–असे कधी घडले नाही. स्मरणशक्ती अलिकडे अधूनमधून दगा द्यायची. तरी सर्व नित्याचे कार्यक्रम व व्यवहार चालूच होते. ज्या जबाबदाऱ्या ऐन तरुणपणात अंगावर घेतल्या होत्या, त्या अजून सुटल्या नव्हत्या. जे उत्सव त्यावेळी धरले, तिथल्या तिसऱ्या पिढीच्या हाती आता सूत्रे आली होती. कुलदैवत, त्यांचा उत्सव व त्यातील भाऊसाहेबांचा सहभाग–बाकी अद्याप कायम होते. किंबहुना त्या कुटुंबातील वडीलधारे व्यक्तिमत्त्व आता भाऊसाहेबांचेच उरले होते. त्यामुळे त्या जबाबदारीने, त्या नात्याने व त्या ओढीने भाऊसाहेब तेथे जात. त्यावेळी जी कामे करीत, तीच आताही अंगावर घेऊन स्वतःच पार पाडीत. आता बाकी त्यांच्यात शैथिल्य येणे अटळ असल्याचे जाणवू लागले होते.

भाऊसाहेबांची एकसष्टी, अमृतमहोत्सव व ऐंशीच्या वयात सहस्रचंद्र दर्शन हे कार्यक्रम आम्ही थाटाने केले. भाऊसाहेबांच्या ज्या ज्या इच्छा होत्या त्या अपुऱ्या राहू नयेत, यासाठी आटापिटा केला. जेणेकरून भाऊसाहेबांना समाधान होईल ते ते करण्याची धडपड केली. नातवांची मुंज केली, घराचा वास्तू केला. त्यांच्या चारी धाम यात्रेची व्यवस्था केली आयुष्यभर त्यांच्या-साठी काही करावे लागले नाही. ते कधी आजारी न पडल्याने शुश्रुषाही करावी लागली नाही. आता निदान त्यांना समाधानाचे दिवस यावेत, अशी तळमळ लागून राहिली होती. अलीकडे चालताना त्रास होत असे. बसल्यावर उठणे कठीण होत असे. शीण लवकर येत असे. म्हणून सर्व दौरे थांबवून अचलपूरला महाराजांच्या समाधीजवळ त्यांची सेवा करीत उरलेले दिवस वेचावेत, अशी त्यांना आस लागली होती. पण उत्सवाची वेळ आली की ते दौऱ्यासाठी

अस्वस्थ होत. आपण न जाऊ शकलो तर तेथील कार्यक्रम पडून राहतील. म्हणून प्रकृतीची परवानगी नसतानाही जाण्याची धडपड करीत. कीर्तनाची वेळ झाली, की त्यांची तगमग पहावत नसे.

संपूर्ण वैद्यकीय तपासणीनंतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांना अचलपूरला उपचार व विश्रांतीकरिता नेऊन ठेवले. थोडेसे बरे वाटू लागल्याबरोबर त्यांनी वणीचा हट्ट धरावा, डोळ्यात पाणी आणून काकुळती करावी, म्हणून त्यांना वणीला घेऊन यावे, तर काही दिवसातच त्यांना अचलपूरला महाराजांच्या भेटीची ओढ लागे. आपले आता फार दिवस राहिले नाहीत, याची त्यांना चाहूल लागली असावी. म्हणून त्यांनी अचलपूरला जाण्याचा, महाराजांच्या संगतीत राहण्याचा लकडा लावला होता. त्यांना वणीला घेऊन येण्यात आपली चूक होते आहे की काय, अशी अपराधीत्वाची जाणीव आमच्याही मनात घर करू लागली होती.

अलीकडे त्यांना अशक्तता खूप आली होती. प्रवासाच्या व कीर्तनाच्या वेळी त्यांना भान राहत नसे. काहीही एकट्याने निभावणे कठीण होत चालले होते. म्हणून त्यांचे नेणे-आणणे अलीकडे टॅक्सीनेच होत असे. अचलपूरबद्दलची व विशेषत: महाराजांच्या दर्शनाची त्यांची ओढ वाढत चालली. त्यासाठी त्यांची होणारी तगमग पहावेना म्हणून त्यांना अचलपूरला पोहचवण्याचा निर्णय अनिच्छेनेच घ्यावा लागला.

बारा मे ला निमित्त तसे लहानसेच घडले. जेवणानंतर विश्रांती घेत असताना अचानक त्यांना थंडी भरून ताप आला. पाहता पाहता तो चारपर्यंत चढला. म्हणून भर उन्हाळ्यातल्या भर दुपारी घरातील सर्व पांघरुणांनी त्यांना झाकून टाकले. डॉक्टरांच्या उपचारांनी त्यांचा ताप नॉर्मलवर झाला. दुसऱ्या दिवशी तुलनेने आराम होता. तिसऱ्या दिवशी जेवणानंतरच्या विश्रांतीच्या वेळेत पुन्हा सपाटून थंडी भरली. पारा १०५ पर्यंत चढला. भाऊसाहेबांचीही शुद्ध हरपली व त्यांनी मोठमोठ्याने हातवारे करीत कीर्तन करायला सुरुवात केली. त्यावेळची त्यांची अर्थशून्य नजर पाहून बाकी आम्ही घाबरलो. बर्फाच्या पट्ट्या ठेवूनसुद्धा दोन अंशाने ताप उतरायला रात्रीचे दहा वाजले. दोन दिवस वाट पाहूनही ताप उतरेना, तेव्हा डॉक्टरांनी त्यांना अधिक तपासणी-साठी नागपूरला किंवा चंद्रपूरला नेण्याचा सल्ला दिला. लगेच त्याच दिवशी संध्याकाळी आनंदवनच्या ॲम्ब्युलन्समधून त्यांना चंद्रपूरला नेले. डॉ. सालफळे वाटच पाहत होते. गेल्या गेल्या लगोलग त्यांच्या सर्व प्रकारच्या तपासण्या केल्या. मध्यरात्रीपर्यंत त्या सर्व तपासण्यांचे निष्कर्षही हाती आले. दुसऱ्या दिवशी एक्स-रेही काढला. तपासण्यांमध्ये काहीही निघाले नाही. सर्व नॉर्मल

होते. शेवटी डॉक्टरांनी पाठीच्या मणक्यातून पाणी काढण्याचा निर्णय घेतला. त्यातून मेनेन्जायटीसचा संशय निघाला. तात्काळ त्याचे उपचार सुरू झाले. चारही दिवस भाऊसाहेबांना सलाईन लावून ठेवले होते. आटोक्यात असणारे सर्व उपचार डॉक्टरांनी केले. कुठेही कमतरता ठेवली नाही. डॉ. सालफळचांनी भाऊसाहेबांचे सर्व काही बापासारखे केले. त्यातूनही सुधारण्याची काही चिन्हे दिसेनात. म्हणून शेवटी निरुपायाने त्यांनी भाऊसाहेबांच्या इच्छेनुसार त्यांना तात्काळ अचलपूरला हलवण्याचा सल्ला दिला. कदाचित महाराजांच्या सान्निध्यात मानसिक समाधानातून एखाद्या चमत्कारासारखी प्रकृतीत सुधारणाही घडून येईल–या आशेने त्यांना रातोरात अचलपूरला नेले. नेताना त्यांची प्रकृती गंभीरच होती. अचलपूरपर्यंत सुखरूप पोहचणे शक्य होईल किंवा नाही याबद्दल अनुभवी लोकांच्याही मनात शंका चर्र्र करून गेली होती. अचलपूरला पोचल्यावर दुसऱ्याच दिवशी त्यांचा पलंग मंदिरात नेला. महाराजांच्या समोर नेल्यावर भाऊसाहेबांना सांगितले, "भाऊसाहेब, तुम्ही आता अचलपूरला–आपल्या घरी–आला आहात. मंदिरात आहात. समोर महाराजांची समाधी आहे." तेवढ्या ग्लानीतही भाऊसाहेबांनी डोळे उघडले. जरासे उठून महाराजांना पाहिले व दोन्ही हात जोडून त्यांना नमस्कार केला.

जेमतेम तेरा–चौदा दिवस भाऊसाहेब आजारी होते. अति तापामुळे अगदी क्षीण होऊन गेले होते. डोळ्यांवर झापड होती. आवाज खोलातून यावा, तसा येत असे. तरी सजग होते. विचारलेल्या प्रश्नांची मानेनेच पण अचूक उत्तरे देत. इंजेक्शन देताना वा सलाइन लावताना मात्र कळवळून जात. पण सर्व उपचार त्यांनी शांतपणाने सहन केले. रडणे नाही, ओरडणे नाही, कुरकुर नाही, त्रासिकपणा नाही. शांतपणे पडून राहायचे. 'काय होतंय् ?' असे विचारले तर मान हलवून 'काही नाही' म्हणून सांगायचे. 'कसं वाटतं ?' या प्रश्नाला 'बरं वाटतं' असे मानेनेच उत्तर द्यायचे. आम्ही अनुभवलेले त्यांचे हे पहिले आजारपण. पण या आजारपणातही त्यांचा आम्हाला काही त्रास झाला नाही. डॉक्टरांनासुद्धा त्यांच्या नि.शक्त शरीराने सर्व सहकार्य दिले. शेवटचे दहा–बारा दिवस ग्लानीतच गेले. तशातही भेटायला आलेल्याला ते ओळखत. नमस्कार करीत. काहीतरी बोलण्याचा प्रयत्न करीत, आशु हा त्यांचा मर्मबिंदू होता. कितीही ग्लानी असली, तरी तो आल्याचे सांगताच डोळे उघडीत. त्याच्या डोक्यावर हात ठेवीत. त्याचा चेहरा गोंजारीत. ग्लानी शरीराची होती. मन सावध होते. एकदा हाताला सलाइन लावल्यामुळे त्यांचा हात धरून ठेवलेला होता. मधेच त्यांनी तो पांघरुणातून उचलला. सुई निसटेल या भीतीने आम्ही तो दाबून ठेवला. काळजीने विचारले, "काय पाहिजे, भाऊसाहेब ?" ते म्हणाले, "काही नाही. शंकराचा श्लोक म्हटला.

टाळी वाजवायची होती." मन सावध होते, इतकेच नव्हे, तर परमेश्वराशी तल्लीन झाले होते. जणू आमच्या हाकेपुरते ते या जगात येत.

तसे भाऊसाहेबांचे लक्ष बरेच दिवसांपासून या जगातून उडून गेलेलेच होते. सर्व आवरसावर आटोपत आली होती मनाने सारी निरवानिरव केली होती. देहाने तेवढे ते आमच्यामध्ये होते. होते तोपर्यंत देहाची गरज भागवीत होते. तेवढ्यापुरताच जणू आमच्याशी संपर्क ठेवला होता. आमच्या जगात केवळ ते उपकारापुरते उरले होते. नेत्र कधीच पैलतिरी लागले होते. मन आधीच तिथे जाऊन स्थिरावले होते. थकलेला देह फक्त नेमलेल्या क्षणाची वाट पाहत होता. तो क्षण परगावी येऊ नये, प्रवासात येऊ नये, दवाखान्यात येऊ नये– अचलपूरला यावा, मंदिरात महाराजांच्या पायाशी यावा, अशी त्यांची आर्तता होती.

महाराजांनी त्यांची ही इच्छा पूर्ण केली. सव्वीस मे ला सकाळी बाळासाहेबांनी आंघोळ आटोपून भाऊसाहेबांच्या बाजूला अठरा अध्यायांची गीता म्हटली, ईशावास्योपनिषद व चतुःश्लोकी भागवत म्हटले. त्याचे तीर्थ भाऊसाहेबांना दिले. आदल्या दिवशी भाऊसाहेबांनी काहीच घेतले नव्हते. चहा, दूधभात, पाणीसुद्धा निर्धाराने नाकारले होते. विष्णुसहस्रनामाचे व गीता पाठाचे तीर्थ तेवढे घेतले. त्यानंतर काही वेळाने त्यांचा श्वासोच्छ्वास मंद होऊ लागला. डॉ. विवेक व डॉ. अशोकने आशूच्या साह्याने शेवटचे निर्वाणीचे उपचार सुरू केले. पण त्यांना दाद न देता आमच्याकडे पाहत पाहत भाऊसाहेबांनी शांतपणे डोळे मिटले.

गेल्या चौपन्न वर्षांच्या आयुष्यात मी प्रत्यक्ष मृत्यू इतक्या जवळून पहिल्यांदा पाहिला. माझ्या दुर्दैवाने तो भाऊसाहेबांचाच होता. चौतीस साली बाई गेली. त्यावेळी मी अडीच वर्षांचा होतो. त्यानंतर तेवीस वर्षांनी सत्तावन्नमध्ये आजी गेली. त्यानंतर अठ्ठावीस वर्षांनी सव्वीस मे एकोणवीसशे पंचाऐंशी रोजी भाऊसाहेब गेले. वाढत्या वयात सर्व दिशांनी आलेले हे पोरकेपण फार फार जीवघेणे वाटले.

■ ■

# घाऱ्या डोळ्यांचा माणूस !

घाऱ्या डोळ्यांचा हा माणूस मला पहिल्यांदा मी हायस्कूलमध्ये असताना भेटला. कुणीतरी ' आदेश ' साप्ताहिक आणले होते. त्याच्या पहिल्या पानावर मोठे पानभर शीर्षक होते ! ' अविद्याच्या हातून मूर्तिपूजा करणे म्हणजे मानवधर्म नव्हे ! ' या दरडावणाऱ्या शीर्षकाने माझे कुतूहल चाळवले गेले आणि मी अधाशीपणाने तो लेख वाचून काढला. तुकडोजी महाराजांनी कुठेतरी गणेशोत्सवातील गणपतीची स्थापना काँग्रेस सेवादलाच्या सुलेमानखां पठाण ह्यांच्या हस्ते करवली होती. एवढे कारण घाऱ्याचे तांबडे डोळे व्हायला पुरेसे होते. आणि हा संतप्त माणूस आपल्या घणाघाती शैलीने तुकडोजी महाराजांवर तुटून पडला होता. पुढे केव्हातरी असाच ' आदेश 'चा एक उन्हाळी पाव्हणा अंक हाती पडला. त्याच्या दर्शनी पानावर डोळे वटारून ना. सी. फडक्यांना बजावले होते, ' फडके, जरा अत्र्यांचे शेण खा ! '

ही या माणसाची पहिली दबकावणारी ओळख. नंतर या माणसाबद्दल अनेक गोष्टी कळल्या. त्याचे कडवे हिंदुत्वप्रेम, त्याची सावरकरनिष्ठा, त्याचे रोमहर्षक वक्तृत्व, त्याचे इंग्रजीवरचे प्रभुत्व, त्याचे उंची सिगारेटचे व्यसन, त्याचा सुगंधाचा षौक, शानषौकीने राहण्याची आवड, त्याचे सावष्टंभ व्यक्तिमत्त्व, त्याची ताम्रगौर कांती, त्याचा संतापी स्वभाव, त्याच्या विद्यार्थिदशेतील प्रोफेसरांनी त्याच्याबद्दल काढलेले कौतुकोद्गार, त्याची खिळवून ठेवणारी देखणी लेखनशैली. बापरे, एखादी सबंध मैफल या माणसाबद्दलच्या आख्यायिकांनीच गजबजून जायची. खाजगी गप्पाष्टकांमधील या माणसाने केलेल्या चावट विनोदाच्या खऱ्याखोट्या गोष्टीही या बैठकीत चवीने सांगितल्या जायच्या. त्यामुळे याला पाहण्यापूर्वीच आमची पौगंडावस्था त्याच्यावर नकळत प्रेम करू लागली होती.

त्यानंतर याचा फोटो पाहायला मिळाला. याच्या तोंडभरून, दिलेल्या शिवीसारखाच चांगला पानभर. ‘मनोहर’ मासिकाच्या मुखपृष्ठावर, आत त्याचे दोन परिचयलेख होते. त्यात एक बाबुराव गोखल्यांनी अनौपचारिक शैलीत लिहिलेला व्यक्तिचित्रात्मक होता. त्यात त्याच्या घाऱ्या डोळ्यांचे, त्याच्या ऐसपैस नागपुरी स्वभावाचे, त्याच्या देहभान विसरणाऱ्या व विसरायला लावणाऱ्या तुफान वक्तृत्वाचे तृप्त वर्णन होते. फोटोतील घाऱ्या मिष्कील डोळ्यांनी अगोदर गारुड केलेच होते. परिचयलेखातील तपशिलांनी मूळचे अबोध आकर्षण अधिक गहिरे केले.

आणि एक दिवशी ‘रक्त आणि अश्रु’ हाती पडले. त्याने तर आमूलाग्र आरपार झपाटला गेलो. पुस्तकाचे नाव, अर्पणपत्रिका, लेखांची शीर्षके, लेखांची सुरुवात, कधी टीकेचा आसूड ओढणारी तर कधी वक्रोक्तीचे पिरगाळणारे चिमटे घेणारी, कधी उपहासाच्या अश्लील गुदगुल्या करणारी, तर कधी काव्यात्मतेची हळुवार रोमांचक फुंकर घालणारी ती नटरंगी भाषाशैली— हे पहून काही दिवस वेडयापिशासारखाच होऊन गेलो. त्या दिवसात माझा मी नव्हतोच. या माणसाच्या कामरूपिणी आज्ञाधारक लेखणीने मला पार गुलाम करून टाकले होते. शब्दांमध्ये, त्याच्या नेमक्या न्यासामध्ये, अचूक फेकीमध्ये त्याच्या नादामध्ये काय सामर्थ्य असते आणि केवढे भुलवणारे सौंदर्य असते, हे यापूर्वी शिवरामपंतांनी नि अच्युतरावांनी दाखवले होते. पण आत्ताचा हा झपाटा काही वेगळाच होता. भाषेच्या माध्यमातून हा माणूस आपल्यावर जणू अनावर आवेगाने पावसासारखा कोसळत होता. वादळासारखा सैरभैर करून टाकत होता. कधी कोवळ्या किरणासारखा ऊबदारपणे कुरवाळत होता. लेखनाचा विषय कोणताही असो, त्या वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने, त्या विविध लेखांमधून तऱ्हेतऱ्हेची रूपे घेऊन हाच माणूस परत परत आपल्याला भेटत होता. विषय बिचारे कमनशिबी —लेखात कसेबसे चोरून अपराधी मुद्रेने उभे होते नि संपूर्ण लेखभर हाच गुरकावत, बोचकारत, आकाशपाताळ एक करत वावरत होता.

याच्या या सर्व रूपांवर त्या वयात याने आम्हाला प्रेम करायला लावले. ही प्रेमयाचना करतानाही याने कधी कोमल आर्जवांचा आश्रय घेतला नाही. त्याहीवेळी हक्काची वस्तू अधिकारवाणीने मागण्याची जरब त्याच्या आविर्भावात होती. बुद्धी बधिर करून, मने अंकित करणारा शैलीदार भाषाप्रभू वक्ता म्हणून याची राजवट अनेक दिवस आमच्या उमलत्या तारुण्यावर गर्जत— गाजत होती.

पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर याच्या लेखणीचे एक आगळेच अनोखे रूप ‘सत्यकथे’ने नेमाने प्रगट करण्याची प्रथा सुरू केली. हे रूप अकल्पित होते.

एका झुंजार नेमबाज सेनानीचे पाहता पाहता परीकथेतील स्वप्नसुंदर राजपुत्रामध्ये रूपान्तर व्हावे, तसे काहीतरी अघटित घडले होते. हा पूर्वीचा शब्दधारी हल्लेखोर आता चक्क कथाकार बनला होता. आणि तोही सत्यकथेचा कथाकार ! या नव्या नात्याने सत्यकथेशी संलग्न असणे त्या काळी साहसाचे मानले जाई, तसेच उपहासाचेही. या पठ्ठयाने बदनामीपुरस्सर हे साहस उघडया डोळयांनी पत्करले. तिथेही पूर्वीच्याच युयुत्सू वृत्तीने खिंड लढविण्याचा इतिहास निर्माण केला.

त्याचे हे नवे जग न्यारेच होते. यौवनाची सर्व वेडे त्यात होती. त्यात सौंदर्याचा वेध होता, प्रेम होते, प्रेमाची आर्तता, व्याकुळता होती. स्वप्नांची धूसरता, रम्यता होती, उत्कट ध्येयवाद होता, वांड उच्छृंखलपणाही होता, बेहिशेबी साहस होते, नि हौतात्म्याचे आकर्षणही होते. त्यातूनच स्वप्न, ध्यास, रूप, पय, सीमेवर, पाषाण, मादाम पिशी, सौभाग्य सावल्या—यासारख्या धुंद कथांचे जन्म झाले. मुक्ती या कथेचे आकाशगामी उड्डाणही त्यातूनच झाले. अकुलीना, वर्षाव, अंतराळ यासारख्या कादंबऱ्या, नि विषकन्या, स्वामिनीसारखी नाटके हे लेखणीचे नानारंगी इंद्रजाळसुद्धा आमच्यावर वेळोवेळी चेटूक करून गेले.

हा नागपुरी माणूस नंतर नागपूर सोडून गेल्याचे ऐकले. गांधी–हत्येनंतर हिंदुत्ववाद्यांची जी फाणाफाण झाली, त्यामुळे नागपूरचा हा नामांकित आखाडाही ओस पडला. याने डोंबिवलीला स्थलांतर केले. वि. घ. देशपांडे हस्तिनापूरला आणि बाळशास्त्री हरदास संघात गेले. हिंदुसभेच्या तीन गाजलेल्या मुलुखमैदान तोफांची तीन दिशांनी पांगापांग झाली.

लहानपणापासून ज्या माणसाबद्दल ऐकत राहिलो, तरुणपणी सापडेल तिथे ज्याला हावरेपणाने वाचत गेलो, त्याला प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळण्याअगोदरच याने नागपूरचा निरोप घेतला होता. एम. ए. साठी नागपूरला आलो. सोनीगल्लीसमोरच्या मॉरिस कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. आणि नागपूरच्या नव्या आख्यायिकांच्या विळख्यात सापडलो. याच्या कथा–कादंबऱ्यांतील सर्व नागपुरी ठिकाणांना भेटी दिल्या. डिसेंबरच्या कडाक्याच्या थंडीत, उनी कपडे घालून मध्यरात्री एंपायर हॉटेलमधून मद्यप्राशन करून उंची सिगारेटचे झुरके घेत मित्रांसमवेत तेलंखेडीच्या जंगलात जाणाऱ्या याच्या कथेतील नायकासाठी तेलंखेडीवर जाऊन आलो. याच्या कादंबरीतील सी. के. नायडूचे नाव कोरलेला विद्यार्थिदशेतला बाक शोधण्याचा प्रयत्न हिस्लॉप कॉलेजमध्ये केला. 'पैज' कथेतील रक्त गरम करणारी घटना मॉरिसमध्ये झाली होती की हिस्लॉपमध्ये ? 'पसतीस'मधील नायिकेच्या मोटारचा नंबर काय होता, तिचे घर कोणते, ती विशिष्ट खोली कुठे असेल, इतवार बाजारात अजूनही 'फुलवा' दिसेल का,

वगैरे अनेक गोष्टींचा अभ्यास आम्ही त्या पदव्युत्तर वर्गात मनापासून करीत होतो आणि एक दिवस माझ्या नैष्ठिक अभ्यासाला फळ आले. अचानक हा माणूस दिसला तोही प्रत्यक्ष नागपुरातच.

सायं चहासाठी वर्डीवरच्या 'दीपक' हॉटेलमध्ये शिरत असताना दारातूनच मित्राने आनंदून सांगितले. 'अरे, ते बघ भावे.' मी उत्सुकतेने पाहिले. लहानपणापासून कुतूहल पेटवणारे ते घारे डोळे पाहून एकदम ओळख पटल्यासारखे वाटले. आपल्याला दंतकथांतून, वाङ्मयातून परत परत भेटणारा, पण प्रत्यक्षात चकवा देणारा हाच तो माणूस. त्यांच्या बाजूच्या टेबलवर आम्ही जाऊन बसलो तिथून भावे सहज दिसत होते. कटलेट खात मित्राशी बोलत होते. तो मित्र ? ते पां. ब. गाडगीळ होते का ? त्या दिवशीचा चहा कसा होता, तो मी घेतला की नाही, तें काही आता आठवत नाही त्या दिवशी तरंगत तरंगतच खोलीवर आलो.

त्यानंतर त्यांचे व्याख्यान ऐकले. त्यांच्या त्याच मुक्कामात आमच्याच कॉलेजमध्ये, शारदा मंडळात. गर्द निळ्या रंगाचा सूट घालून आले होते. डॉ. कोलते परिचयपर प्रास्ताविक करीत असताना तोंडातील पान चघळत, त्यांच्याकडे मिष्कीलपणे पाहत खुर्चीवर बसले होते. त्यानंतरचे त्यांचे व्याख्यान. मॉरिसच्या मुलांसमोर मॉरिसचे विद्यार्थी त्यावेळी आख्ख्या मध्यप्रदेशात आपल्य अभ्यासबाह्य चौफेर कर्तृत्वाबद्दल गाजत होते. त्यांच्यासमोर, त्यांच्याकडे बोट दाखवीत भावे व्याख्यानात बोलत होते, 'तुम्ही मूर्ख आहात. तुम्हाला वाङ्मयाची आवड नाही. कलेची चव कळत नाही. तो माकडतोंड्या ××× तुमचा आवडता नट. ती घोडमुखी ××× तुम्हाला आवडते. तुमचा आवडता लेखक म्हणजे बाबुराव अर्नाळकर !' मॉरिसच्या मस्तवाल मुलांपुढे भावे आवेशाने सपासप कोरडे उडवीत होते आणि विद्यार्थी तेही आवडीने, तन्मयतेने ऐकून घेत होते. नंतर भाव्यांनी तरुणपणात खरोखरी काय आवडायला हवे, कशाचा ध्यास हवा, कशाचे वेड हवे याचे बहारदार बेभान वर्णन करायला सुरुवात केली आणि श्रोत्यांनाही होष हरपल्यासारखे झाले. माझे मित्र मधुसूदन वैराळे माझ्याजवळ बसले होते. त्यांना मी म्हणालो, "मघाशी भावे आपल्याला शिव्या देत होते. त्यावेळी एखादा विद्यार्थी संतापाने त्यांना मारायला उठला असता तर ?" वैराळे म्हणाले– "भाव्यांना ते आवडले असते. तरुण पिढीचे रक्त गरम आहे, हे पाहून त्यांना आनंद झाला असता." भावे इतके मनापासून बोलत होते की मला मधूचे म्हणणे एकदम पटले. आपल्यावरच्या संतापाची वा हल्ल्याची पर्वा न करता भाव्यांनी खरेच अशा विद्यार्थ्याला प्रेमाने मिठीच मारली असती !

भाव्यांना आता जवळून पाहणे झाले होते. ऐकलेही होते. अशाच एका

अपरात्री व्हेरायटी चौकावरच्या एका हॉटेलबाहेर लेखकमित्रांच्या कंपूबरोबर त्यांना चहापूर्वक गप्पा मारताना पाहिले. आता भाव्यांबद्दल इतरांजवळ बोलण्यासाठी माझ्याजवळही बरीच प्रत्यक्ष माहिती जमा झाली होती. भावे आता आमच्या भावजीवनाचे एक भागच बनले होते.

त्या उन्हाळयात गावी असताना रात्री वाचण्यासाठी एक दिवाळी अंक हाती आला. भाव्यांची 'सावल्या' नावाची दीर्घकथा त्यात होती. तिसऱ्या मजल्यावरच्या गच्चीवर अंथरूण पसरून एकटाच पडलो होतो. 'सावल्या'तील नायकाबरोबर वाहत जात होतो. आपण आपल्या हातानी कौतुकाने रांगोळचा काढाव्या. आणि आपणच आपल्या पायांनी त्या पुसून टाकाव्यात, या विपण्ण अनुभवातील नायकाच्या यातना मनाला पीळ पाडीत होत्या. . . अशाच एका उन्हाळी सुटीत नात्यातल्या नायिकेच्या घरी मुक्कामाला असताना रात्री सर्व निजानीज झाली. बाहेर उघड्यावरच्या अंथरुणावर गप्पा मारणाऱ्या नायकाने नायिकेचे लक्ष एकदम आकाशातील एकाकी चंद्राकडे वेधले, त्या चंद्राकडे पाहत तिने आपले हात त्याच्या केसात खुपसले, नि तिच्या मांसल हाताची उशी करूनच त्यान अनिच्छेने पापण्या मिटल्या. . .

हे वर्णन वाचले, अन् कथा मिटवून आकाशाकडे पाहिले. उत्तररात्रीचा एकाकी चंद्र माझी तशीच अवस्था न्याहाळत जागत होता. मी मासिक तिथेच मिटवून ठेवले. दिवा विझवला नि आभाळातल्या चंद्राकडे पाहत उरलेली रात्र तशीच जागून काढली !

वाशीमला एका वर्षाकरिता मास्तरकी करायला गेलो. तेव्हा आठवणीने साऱ्यांचे घर हुडकून काढले. बाईंच्या परवानगीने घरभर फिरलो. माडीवर गेलो. तिथल्याच एका अडगळीच्या खोलीत 'सावल्या'तील नायक भर उन्हाचा अलगुज वाजवीत बसला नव्हता का. . . ?

. . .भावे प्रत्यक्ष सहवासात येण्यापूर्वीच त्यांच्या लेखनाने नि लौकिकाने आम्हाला असे पछाडून टाकले होते. भावे सहवासात आले तेही असेच योगायोगाने. नांदेडला आमच्या कॉलेजच्या गॅदरिंगकरिता त्यांना बोलावले होते. पहिल्यांदा ते कबूल करतात की नाही याची चिंता, कबूल केल्यावर येतात की नाही याची काळजी, आल्यावर त्यांचे आपले जुळेल की नाही याची भीती. असा सतत दडपणाखाली मी होतो. कारण भावेंच्या कडवेपणाची, स्फोटक स्वभावाची कीर्ती खूप ऐकली होती. त्यांच्या चोखंदळ नि उच्चभ्रू आवडीनिवडींना आपण पुरू की नाही हीही एक काळजीच होती. भावे कुणाशीही कसल्याही परिस्थितीत तडजोड न करणारे कट्टर हिंदुत्ववादी, मी तसा नव्हतो. आमचे कॉलेजही स्वामी रामानंद तीर्थांचे. साधारणपणे डावीकडे झुकलेले. आल्यावर संभाषणातून,

भाषणातून भावे काय बोलतील, काही पेचप्रसंग निर्माण होईल का–अशा धडधडत्या मन:स्थितीतच मी भाव्यांचे स्वागत केले. भाव्यांनी आल्याआल्याच त्यांचे स्वागत करायला स्टेशनवर गेलेल्या इतिहासाच्या पंजाबी प्राध्यापकाला इंग्रजीत प्रश्न केला– 'महंमद बिन कासिम हिंदुस्थानात केव्हा आला ?' या सलामीपासूनच हिंदुमुस्लिम प्रश्नावर घरी पोहोचेपर्यंत त्यांची चांगलीच जुंपली होती. ती पाहून आम्ही हबकून गेलो. घरी पोचल्यावर स्थानापन्न होत नाहीत तोच त्याच सुरात भाव्यांनी मला सांगितले, "शेवाळकर, मी कानांनी बहिरा आहे. मोठ्याने बोलावं लागतं, नाहीतर लोकांचे विनाकारण गैरसमज होतात ! – " पण हेही त्यांनी दमदाटीच्या स्वरात सांगितल्यामुळे लोकांचे गैर-समज विनाकारणच होत असतील, असे मला वाटले नाही. त्यानंतर दोनतीन दिवस ते माझ्याकडे होते. प्रत्यक्ष सहवासात त्यांच्याबद्दलच्या अनेक भल्याबुऱ्या खऱ्याखोट्या दंतकथांची सत्यता पडताळून पाहता आली आणि बरेच भ्रम वितळून गेले. वाटले होते तितके भावे भयप्रद नव्हते. ते पुष्कळसे समजूतदार, ऐकून घेणारे नि अतिशय प्रेमळ निघाले. आमचा आशू त्यावेळी तीनचार वर्षांचा होता. त्याच्याशी तर भावेकाकांची अशी दोस्ती जमली की कुणाचे वय किती हा घरच्यांना प्रश्न पडावा !

भाव्यांचे कार्य, साहस, ध्येयवाद, धैर्य, वक्तृत्व, लेखन, राहणीमान हे सर्वच मोठे आहे. त्यामुळे त्यांना कीर्ती, विरोध नि लोकप्रियताही मोठीच लाभली. परंतु साहित्याइतकेच आणि साहित्याहूनही माणूस म्हणून भावे फार मोठे आहेत. आमच्यातील वयाचे, विचारांचे नि गुणांचे अंतर पाहतापाहता विरून गेले, ते त्यामुळेच !

■ ■

# बाबा

अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात मी त्यावेळी बी. ए.ला होतो. 'सह्याद्री'मध्ये माझा बाणभट्टावरचा लेख आला होता. 'सह्याद्री'च्या त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे त्यावर माझा फोटो आणि त्रोटक परिचयही होता. त्यामुळे त्यानंतरचे काही दिवस मी हवेत तरंगत असतानाच माझ्या हाती एक अंतर्देशीय पत्र पडले. पत्रात लेखाबद्दल माझे कौतुक केले होते. वर्धेला कधी आल्यावर मला भेटण्यास आग्रहाने सुचवले होते. पत्रावरचे अक्षर म्हाताऱ्या वळणाचे होते. आणि संपूर्ण पत्रात मला एकेरी संबोधिले होते. पत्राखाली 'मो. स. करंदीकर' अशी सही होती. अक्षरांवरून नि अनोळखी असतानाही एकेरी लिहिण्याच्या वृत्तीवरून मी करंदीकरांच्या वयाचा अंदाज बांधला. आणि एका वडीलधाऱ्याला लिहावे, तसे उत्तर लिहिले.

त्यानंतरच्या उन्हाळ्यात ताईकडे वर्धेला गेलो, तो कळवल्याप्रमाणे करंदीकर मला एके दिवशी सकाळी भेटायला आले. त्यावेळी मी त्यांना पहिल्यांदा पाहिले. उंच, गोरापान, निर्लोम मस्तक नि गुबगुबीत देह. या दृश्याने वयाबद्दलचा माझा अंदाज थोडा चुकविला होता. पण वृत्ती आणि वागणे बाकी तसेच वडीलधारे, थोडेसे ओब्लायजींग असे वाटले. एकरंगी तलम धोतर नि वर हाफशर्ट अंगावर होते. करंदीकर आमच्या घरात आपणहून आलेले दिसले, नि आजूबाजूच्या घरांतही उत्सुकता नि धांदल उडाली. आणि असे ते समारंभपूर्वक मला भेटायला आल्यामुळे साहजिकच मला जमिनीवर उतरायला थोडा वेळ लागला.

ही ५१–५२ सालची गोष्ट असेल. तेव्हापासून पाव शतकभर त्यांचा माझ्यावर अखंड लोभ होता. हळूहळू त्यांचा परिचय वाढत गेला. घरातल्यांशीही ओळख झाली. आणि कौटुंबिक संबंधामध्ये रूपांतर झाल्याने

मी 'बाबासाहेब' वरून 'बाबा' वर केव्हा येऊन पोचलो, हे लक्षातही आले नाही.

बाबा घरचा चांगला होता. महादेवपुऱ्यात त्याचा मोठा दुमजली वाडा होता. वडील नामांकित वकील आणि अग्रगण्य सामाजिक व राजकीय कार्यकर्ते. आईसुद्धा सामाजिक कार्यात रस घेणारी. एक भाऊ त्यावेळी बार्शीला होता. बाकीची भावंडे शिकत होती. बाबा घरात क्रमाने दुसरा. मी त्यावेळी वीस–एकवीसच्या घरात असलो तर बाबा पंचविशीत असेल. पण बाबाचे व्यक्तिमत्त्व, विशेषत: टक्कल, वागणे–बोलणे, आवाज, धोतर यामुळे तो वयाने वडील वाटे. घराच्या पुण्याईमुळे असेल, पण गावातही त्याला 'बाबासाहेब'च म्हणत असत. बाबा त्यावेळी कुठेतरी हौस म्हणून मास्तरकी करीत होता. त्यानंतर त्याने माझ्याबरोबर मिरतला मराठीचे एम्. ए. केले. मी संस्कृतला होतो. त्यामुळे त्याच्याशी माझ्या नित्य भेटी होत.

बाबाचे वाचन वाचण्याची आवड, त्यासाठी पुस्तके गोळा करण्याचा झपाटा, मोठमोठ्या लोकांशी संपर्क, हे सारेच अफाट. कोणतेही नवे मासिक, साप्ताहिक, वर्तमानपत्र त्याच्या नजरेतून निसटले नाही. कोणतेही आणि कोणत्याही विषयावरचे नवे पुस्तक वाचल्याशिवाय, निदान त्याची सांगोपांग माहिती करून घेतल्याशिवाय तो राहिला नाही. भेटी, मुलाखती, चर्चा हे त्याच्या बहुश्रुतपणाचे फार मोठे भांडवल होते. त्यातून मिळवलेले ज्ञान आपली मर्दुमकी म्हणून संदर्भपूर्वक पुन्हापुन्हा इतरांना सांगण्याचीही त्याला आवड होती. त्यामुळे ते त्याच्या अनायासे लक्षात राहून जाई. बाबा एवढ्यात कुणाला भेटून आला, हे त्याच्या या सवयीमुळे तोपर्यंत जगात जाहीर होऊन गेलेले असे. म्हणून त्याच्याबद्दलच्या लोकादरात गुंजभर भर पडायची. बाबाच्या या संपर्क–वर्तुळात कोण नव्हते ? वर्धेचाच रहिवासी असल्याने सेवाग्राम, पवनारशी संबंधित सर्व नामवंत नेते तर त्यात होतेच. पण कोणत्याही निमित्ताने वर्धेमध्ये रेल्वेने जाणारे राष्ट्रीय ख्यातीचे लेखक, विचारवंत, तज्ज्ञही असत. अमुक अमुक हे या गाडीने कलकत्ता हैद्राबाद वा नागपूरला जाणार हे त्याला नुसते कळण्याचा अवकाश, बाबा स्टेशनवर जाऊन त्यांना भेटत असे. जमल्यास त्यांच्या डब्यात पुढील स्टेशनपर्यंत तिकीटपूर्वक जाऊनही बसे. बाबाच्या खजिन्यात अशा भेटींचे व भेटीतून खूप भांडवल जमा झालेले होते. गांधी, नेहरू, विनोबा, राजेंद्रप्रसाद ह्यांच्याही भेटीच्या आख्यायिका बाबांच्याजवळ होत्या. आणि त्या खऱ्याही असण्याचा संभव होता. कारण नानासाहेबांचे–बाबाच्या वडिलांचे या सर्वांशी संबंध होतेच. हिंदुस्थान सोडण्यापूर्वीची सुभाषबाबूंची शेवटची सभा वर्धेला व नानासाहेबांच्या अध्यक्षतेखाली झाली होती.

पुढे बाबाने पीएच. डी. करावयाचे ठरविले, आणि श्रीपाद कृष्ण हा विषय घेतला. त्यानिमित्ताने कोल्हटकरांच्या सहवासात आलेल्या सर्वांना त्याने पत्रे तर लिहिलीच पण भेटीही मागितल्या. त्यानुसार नानासाहेबांकडून 'ट्रॅव्हल ग्रँट' मिळवून तो खरोखरच त्या सर्वांकडे जाऊनही आला. त्यांना अनेक प्रश्न विचारून नि त्यांच्याकडून प्रचंड माहिती व आठवणी गोळा करून तो परतला. आता बाबाजवळ खुद्द कोल्हटकरांना नि या सर्वांना भेटून आल्याच्या फर्स्टहँड आठवणी जमा झालेल्या होत्या. बाबाचा मूळचा चौकस बहुश्रुतपणा आता खूपच वाढला होता.

बाबाचा ग्रंथसंग्रहही भरगच्च होता. कुणाकुणाकडून आणलेली विविध विषयांवरची कितीतरी पुस्तके त्यात होती. ती बाबाने वाचून टाकलेली असत. त्याच्या नोट्सही काढलेल्या असत. त्याचे हे वाचनाचे नि भेटीचे व्यसन वरचेवर वाढत गेले. त्यावर आवर न घातल्याने पीएच. डी. चे मुदतबद्ध कामही लांबत गेले. त्या कामाच्या नावावर बाबाने आत्तापर्यंत इतके संपादन करून ठेवले होते, की त्याच भांडवलावर तो खूप होता. परिणामी पीएच. डी. मधला रसच कमी कमी होत गेला. मुदत वाढवून देणे बंद करण्याची विद्यापीठाने तंबी दिली तेव्हा कुठे बाबा लिहायला बसला. प्रबंध हातावेगळा करून त्याची टंकमुद्रित प्रत विद्यापीठाच्या स्वाधीन करून तो मोकळा झाला. त्यानंतर त्याचा त्या प्रबंधाशी सबंध संपला. तोपर्यंत त्याची कोल्हटकरांबद्दलची मते व विवेचनाची प्रमेयेही बदलली होती. त्याचे प्रतिबिंब प्रबंधात पडणे अटळ होते. विद्यापीठाने नेमलेल्या परीक्षकांमध्ये त्यामुळे दुमत होणेही स्वाभाविकच होते. नियमाप्रमाणे तिसऱ्या परीक्षकांकडे प्रबंध पाठविण्यात आला. त्यांचेही मत अनुकूल न पडल्याने शेवटी बाबाची डॉक्टरेट नामंजूर झाली. परीक्षकांच्या सूचनेप्रमाणे काही भागाचे पुनर्लेखन केले असते तर पुनर्विचार शक्य होता. पण ते बाबाच्या स्वभावात बसत नव्हते. परिणामी डॉक्टरेट मिळविण्याची बाबाची दीर्घकाळची धडपड त्यामुळे पार वाया गेली.

या धडपडीमुळे अजून एक झाले; त्याची नोकरी तर सुटलीच, पण त्याचे लग्नही लांबणीवर पडत गेले. 'आधी लगीन कोंडाण्याचे', या बाण्याने बाबाने 'डॉ.' होण्याचा ध्यास घेतला होता. घरातल्या सर्वांच्या आग्रहाला न जुमानता लग्नाचा विचार डावलून त्याने पीएच. डी. चा पिच्छा पुरविला होता. घरचा चांगला असल्यामुळे नोकरी न केली तरी त्याचे भागण्यासारखे होते. म्हणून थोरामोठ्यांच्या चांगल्या मुली सांगून येत. आईवडिलांची तळमळ होई. पण, बाबाच्या रामदासी निग्रहामुळे त्यांचा नाइलाज होता. शेवटी डॉक्टरेटचे अमर्याद लांबल्यामुळे बाबाचे लग्नाचे वयही निघून गेले. मुली येण्याचे थांबले. बाबाचा हा उजाड ब्रह्मचर्याश्रम पाहतच त्याच्या आईने शेवटी निराशेने डोळे मिटले.

पत्नीच्या निधनामुळे नानासाहेबांची उभारी ओसरून गेली. तेही खचल्यासारखे झाले. व्यवसायाचा निरोप घेऊन आपल्या शेतीच्या खेडेगावी सामाजिक कार्य करण्यासाठी त्यांनी वर्धा सोडले. वर्धेला राहिला एकटा बाबा, त्याचा अवाढव्य वाडा आणि डॉक्टरेटचे त्याचे वांझ स्वप्न !

बहीण, भावंडं संसाराच्या वा निर्वाहाच्या दिशेने निघून गेली होती. या दोन्हींना मुकलेला बाबा, तो वाडा आणि आपली पुस्तके सांभाळीत राहिला. बाबाच्या रिकामेपणामुळे नि स्वभावामुळे पुढे घरच्याशी त्याचे मतभेद झाले. अशा कौटुंबिक द्वंद्वाच्या नैसर्गिक विकासक्रमाप्रमाणे ते वाढत गेले व घराच्या इस्टेटीच्या वाटणीच्या वेळी त्याचे कटू पडसाद उमटले. बाबाच्या वाट्याला अधिकृतपणे काही आले नाही. पण बाबाने अनधिकृतपणे वाडा आपल्याकडे ठेवून घेतला. प्रकरण कोर्टकचेऱ्या व पोलिसापर्यंत गेले. बाबाने वाडा सोडला नाही. पण कुटुंबापासून बाबा पूर्णपणे तुटला. एवढा मोठा वाडा ताब्यात असून बाबा निराधार झाला. वाडा बाबाने भाड्याने दिला नाही. सार्वजनिक उपयोगासाठी, जेवण मिळण्याच्या कबुलीवर, बाबाने वाडा वापरू देण्यास सुरुवात केली एका प्रजासत्ताकदिनी तर बाबाने जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आपला वाडा देशाला दान करून टाकला. त्याची इच्छा एकच होती. 'वर्धा हे देशाचे मध्यवर्ती ठिकाण आहे. गांधी–सुभाषांच्या नावाने केंद्र सरकारने तिथे एक विद्यापीठ काढावे. त्याच्यासाठी या जागेवर पाणी सोडण्यास बाबा तयार झाला होता.

आई व डॉक्टरेट गेल्यानंतरचे बाबाचे आयुष्य फरपटल्यासारखेच गेले. त्याचे वाचन लेखन चालूच होते. पण त्याला दिशा नव्हती, मुख्य म्हणजे देहाचे व अस्तित्वाचे तातडीचे प्रश्न समोर आ वासून उभे होते. तात्पुरत्या व जुजबी उपायांनी खळगी भरण्याने समाधान मिळवून दिवस रेटणे चालू होते. गावात फिरणे, मिळेल ते जमेल तिथे वाचून काढणे, वर्तमानपत्रांना पत्रे लिहिणे, गावातल्या लोकांशी चर्चा करणे, आणि एरव्ही वाड्यावर पडून राहणे हा जीवनक्रम सुरू झाला. घरातील वादळाचा वृत्तांत कर्णोपकर्णी सगळ्यांना कळलाच होता. त्यांना बाबाच्या वाऱ्यावरच्या आयुष्याचा अर्थ लावणे सोपे गेले त्यामळे त्याच्याशी वागण्याचे धोरणही त्यांनी ठरवून टाकले. बाबा दिसला की त्याला टाळायचे, भुकेच्यावेळी तो भेटतो, हे नेमके कळल्यामुळे तेवढ्या वेळा सांभाळायच्या, इतरांना त्यांच्यापासून भ्रातृभावाने सावध करायचे, व त्याच्या डोक्यात फरक पडल्याची वार्ता सगळ्यांनी विश्वासात घेऊन हळहळत सांगायची–ही गावकऱ्यांनी आपल्यापुरती त्याच्या बाबतीत लाइन ऑफ ॲक्शन निश्चित केली.

त्या काळात अफाट कल्पनांनी बाबाच्या मनात घर केले होते. गांधी–सुभाषांच्या नावाने विद्यापीठ, ही एक कल्पना, वर्धा ही भारताची राजधानी करावी, ही दुसरी कल्पना आणि सर्वांत भव्य कल्पना म्हणजे अखंड भारत ! अखंड भारताच्या पुनःस्थापनेबाबत त्याची एक उपपत्ती होती. ती त्याला ठिकठिकाणी मांडायची होती. ती प्रत्यक्षात आणण्यासाठी निधी गोळा करायचा होता. सर्वांत शेवटी अखंड भारताच्या आपल्या उपपत्तीकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधण्यासाठी युनोपुढे आमरण उपोषण करण्याची त्याची कल्पना होती. या सर्वांसाठी पैसा पाहिजे होता.

पैसा !–हाच त्या काळात बाबाचा सर्वांत मोठा प्रश्न होता. किरकोळ कामे सदिच्छेवर, मैत्रीवर, दयेवर भागून जायची. मोठ्या कामासाठी पैसा पाहिजे होता. पुढे पुढे तर उपजीविका हेही बाबासमोर मोठे काम होऊन बसले होते. प्रबंध टंकमुद्रित करून घेण्यासाठीही त्याच्याजवळ पैसा नव्हता.

वर्धेला गेलो की बाबाबद्दल तऱ्हेतऱ्हेच्या दंतकथा ऐकायला मिळायच्या. जीव कळवळून जायचा. पण प्रत्यक्ष भेटीमध्ये ऐकलेल्याची एकही खूण त्याच्या वागण्याबोलण्यात सापडत नव्हती. बोलण्यातील युक्तिवाद, तर्कसंगती पूर्वी-सारखीच यथास्थित होती. वागणेही विकृत नव्हते. भुकेच्या बाबतीत कसलीही लाचारी वा वखवख आढळली नाही.

माझ्याबरोबरच तो अनाहूत जेवायला बसायचा. पण त्यात लाज, चोरटे-पणा; ओशाळपणा वा निगरगट्टपणाही नव्हता. सर्व काही स्वाभाविकच जाणवत होते. अस्मादिकांचे प्रत्यक्षाशी जुळतच नव्हते.

अशाच एके दिवशी नागपूरच्या गुरुदेव सेवा मंडळातून बाबाचे मला एक पत्र आले. तो तिथे आजारी पडला. कुणीतरी त्याला गुरुदेव सेवाश्रम मंडळात आणून टाकले. तिथेच औषधोपचार नि विश्रांती घेत असताना त्याने ते पत्र लिहिले होते. त्याचा कोल्हटकरांवरील प्रबंध प्रकाशित करण्यासाठी एखादा प्रकाशक पाहण्याबद्दल त्याने त्यात गळ घातली होती. आख्खी कोल्हटकर जन्मशताब्दी उलटून गेली होती. बाबाने तेव्हा ढिम्म हालचाल केली नाही. आणि आज रुग्णशय्येवर त्याला अचानक पुस्तकप्रकाशनाची उचकी लागली. मी त्याच्याजवळचे टंकमुद्रित मागवून आणून एका मुद्रक मित्राला खर्चाचा अंदाज विचारला. काही दिवस तो प्रबंध तिथेच पडून होता. आणि बाबाचे मला सेवाग्राम मेडिकल कॉलेजमधून पत्र आले. तो आता तिथल्या दवाखान्यात होता. त्याने माझ्या भेटीची इच्छा व्यक्त केली होती. मी सेवाग्रामला त्यानुसार जाण्याचे ठरवीतच होतो. तेवढ्यात अजून एक पत्र व तारही आली.

मी लगबगीने सेवाग्रामला गेलो. जनरल वॉर्डमध्ये बाबाचे अंथरूण शोधत असतानाच त्याची हाक कानी आली.

बाबा खूपच कृश झाला होता. खांद्याजवळचा पाठीचा काही भाग कापून तपासणीसाठी कलकत्त्याला पाठविण्यात आल्याचे त्यानी सांगितले. त्याची अवस्था एकूण बरी दिसली नाही. मी चरकलो. पण बाबाची प्रसन्नता कायम होती. आपल्या सुखसोयीबद्दल एखाद्या सम्राटाने बोलावे, तसा तो दवाखान्यातील व्यवस्थेबद्दल मिजाशीत सांगत होता. खाण्यापिण्याचे हाल होते, त्याही काळात याची हीच मिजास मी अनुभवली होती. जणू त्याला काहीच झाले नव्हते, त्याचा आनंद वाढावा यासाठी जणू त्याला एखाद्या शाही विश्रामगृहात आणून ठेवले होते.

बाबाला भेटून आलो नि मामा गंधेंना बाबाचे पुस्तक त्वरेने छापायला घेण्याबद्दल गळ घातली. पुस्तक तयार झाले तेव्हा प्रकाशक म्हणून सौ. विजयाचे नाव टाकले. नि लगेच अचलपूरच्या साहित्य संमेलनात त्या पुस्तकाचे प्रकाशनही संमेलनाध्यक्षांच्या हस्ते करून घेतले. त्याच्या पाच प्रती बाबाकडे रवानाही करून दिल्या. श्रीवत्स प्रकाशनाचा जन्म असा झाला !

माझी भीती खरी ठरली. बाबाला कॅंसर झाला होता. डॉक्टरेटचा नसला तरी प्रबंध प्रकाशित झाल्याचा आनंद मृत्युशय्येवरून पत्राने त्याने मला कळविला, आणि एकदा मला भेटून घेण्याची इच्छा व्यक्त केली.

त्यानुसार एका सकाळी वर्धेला गेलो. वाड्याची कळाच गेली होती. सर्वत्र ओसाड वाटत होते. आत गेलो तर त्याची मोलकरीण समोर आली. तिनेच त्याचे शेवटच्या काळात निष्ठेने सगळे काही केले. बाबा बाजेवर बसला होता. त्याने समोरच्या उशीवर मस्तक टेकले होते. तिने त्याला मी आल्याचे सांगितले. मी जाऊन बसलो. अंथरूण चुरगळलेले होते. त्याच्यावर व बाबाच्या अंगावरही मलीन कपडे होते. खोलीला काही रयाच राहिली नव्हती. एकेकाळी मी याच खोलीत बसून बाबाचे घरातील सुख व संपन्नता मनसोक्त अनुभवली होती. बाबाच्या प्रेमळ आईच्या हातून श्रीखंडाच्या वा हापूसच्या वड्या खाल्ल्या होत्या. त्यावेळी या खोल्याखोल्यांतून समृद्धी आणि तृप्ती ओसंडत होती. आज त्या घराकडे वा खोलीकडे मला पाहवेना. मी बाबाला हाक मारली. बाबा उशीवर तसाच पडून होता. त्याचे टक्कल पडलेले डोके आक्रसून लहान झाल्यासारखे वाटत होते. बाजूचे तुरळक केस त्यात रुतल्यासारखे चिकटलेले होते. खूप वेळाने बाबाने डोके वर केले, आणि माझ्याकडे पाहिले.

आणि मी हादरूनच गेलो. बाबाची नजर चमत्कारिकच दिसत होती. जणू त्यावर मृत्यूची अकाळी सावली पडली होती. त्याही अवस्थेत बाबा

हसला. त्याचे त्यावेळचे हसणेही फार भयानक वाटले. ते पाहून मी गलबलून गेलो. त्याला म्हणालो, 'बाबा, काय झालं रे हे ?' मला खरंच त्याची ती दशा पहावेना. एकेकाळचा तो गोरापान, तुकतुकीत राजबिंडा देह आता इतिहासजमा झाला होता. त्याचे उद्ध्वस्त अवशेष शिल्लक राहिले होते. त्याने बोलायला सुरुवात केली. आवाज फारच क्षीण होता. मला त्याच्या अगदी जवळ सरकावे लागले. त्याला बोलताना फार क्लेश होत होते. एक–दोन वाक्ये झाली की तो शिणून पुन्हा डोके उशीवर टेकवायचा आपल्या हयातीत पुस्तक प्रकाशित झालेले पाहिल्यामुळे त्याला फार बरे वाटले होते. मित्रकर्तव्य बजावल्याबद्दल त्याने माझे कौतुक केले...म्हणाला, "तुझे उपकार जन्मभर फिटणार नाहीत" जरावेळाने डोके वर करून त्याने विचारले : "मला काय झालंय तुला माहीत आहे ?" मी मानेनेच हो म्हटले. थोड्यावेळाने पुन्हा डोके वर करून तो म्हणाला, "बनहट्टी कॅन्सरने गेले. मामा कॅन्सरने गेले. मीही कॅन्सरनेच जातो आहे."

पुन्हा त्याने मान खाली केली. म्हणाला—"वेदना फार होतात रे." गेल्या कित्येक दिवसात त्याने काही खाल्ले नव्हते. तहान लागली की तोटीच्या भांड्याने घोटभर पाणी प्यायचा. तासन्तास तसाच पडून रहायचा. काही वेळ बसून मी जाण्यासाठी उठलो. तिथे फार वेळ बसवतही नव्हते. त्या बाईकडून दवाखान्यातून आल्यापासूनची हकिकत कळली. मेजरसाहेब– (कंदू–बाबाचा लहान भाऊ) एकदा येऊन गेल्याचेही कळले. मी बाबाला थोपटल्यासारखे केले न् म्हणालो, 'निघतो.'

तो नीट बसला. त्याने हात पुढे केला. ती त्याची नेहमीची पद्धती होती. मी त्याचा हात हातात घेतला. त्याने आपला हात सोडवून घेतला. आणि अचानक खाली वाकलेल्या माझ्या डोक्यावर ठेवला. त्याच्या अखेरच्या आशीर्वादाचा तो स्पर्श जाणवताच मला एकदम भडभडून आले. आणि रडत रडतच मी तिथून बाहेर पडलो.

बाबाचे आता काही खरे नव्हते. क्षणाक्षणाने तो माझ्यापासून दूर जात असल्याचे जाणवत होते. त्याच्यामध्ये आता बोलण्याचे त्राण नव्हते. जगण्याची इच्छा नव्हती. शेवटी शेवटी त्याने कुणाची आठवण काढली का, त्याला कुणाला भेटावेसे वाटत होते काय ते कळले नाही. पण माणसांच्या, पुस्तकांच्या गर्दीत सदैव रमणारा बाबा आता कुणाचाच राहिला नव्हता. त्याचे बोलणेही मला खूप दुरून, पैलतीरावरून आल्यासारखे वाटले.

वर्धेतला तोपर्यंतचा माझा कोणताही मुक्काम बाबाशी रात्ररात्र मनसोक्त गप्पाष्टकांची मैफल झाल्याशिवाय गेला नाही. मैफल संपल्यावर एकमेकांना

घरापर्यंत पोचवण्यातच रात्र निघून जायची. वर्धेत पाऊल ठेवल्यापासूनच बाबा मला ताब्यात घ्यायचा.

ही पहिली वेळ—ज्यावेळी बाबाने मला लौकर सोडले.

वणीला परतल्यावर काही दिवसांनी बाबाने हे जगही सोडल्याची तार मला मिळाली !

■ ■

# पंत

पंतांना पहिल्यांदा पाहिले ते स्वातंत्र्याच्या जवळपासच्या काळात. अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात मी त्यावेळी इंटरला असेन. एक दिवशी होस्टेलमध्ये कोट, टोपी व हातात छत्री या सरंजामातली एक सावळी ठेंगणी आकृती डॉ. मा. गो. देशमुखांकडे आली होती. डॉ. देशमुख त्यावेळी आमच्या होस्टेलाचे पर्यवेक्षक होते. तिथून ते भागवत नावाच्या उमरखेडच्या एका विद्यार्थ्याची चौकशी करीत आले. त्यावेळी, तेच बळीरामपंत एकबोटे असल्याचे कळले. त्यापूर्वी त्यांचे नाव अमरावतीच्या 'उदय' या वृत्तपत्रातून या ना त्या संदर्भात खूपदा वाचल्याचे आठवत होते. त्यानंतर व्यवसायानिमित्त यवतमाळला असताना केव्हातरी पंचावन्न साली उमरखेडला व्याख्यानासाठी गेलो, त्यावेळी पंतांची पहिली भेट झाली. यवतमाळला मी काही दिवस 'भारत' नावाच्या साप्ताहिकाचे काम पाहत होतो. 'भारत'कडे आलेली पंतांची लांबलचक साक्षेपी पत्रे वाचण्यात आली होती. पंतांचे उमरखेडचे पहिले दर्शन एक जागरूक नि चोखंदळ श्रोता म्हणून झाले. या चोखंदळपणात वक्तृत्वगुणाची चोख जाण होती. तेव्हापासून उणेपुरे पावशतक श्रोता म्हणून, वक्ता म्हणून, सामाजिक कार्यकर्ता म्हणून, पत्रकार म्हणून, एक ज्येष्ठ वत्सल स्नेही म्हणून पंतांचा वरचेवर गाढ संबंध येत गेला. आणि त्यांच्या कधी न कोमेजणाऱ्या यौवनाची मनावरची भुरळ वाढत गेली.

वास्तविक उमरखेड गाव केवढे, यवतमाळ जिल्ह्यातील टोकाचे एक खेडेप्राय गाव. तालुक्याचे सुद्धा भाग्य त्या गावाला लाभले नाही. शहर आणि खेडे या दोन्ही वातावरणांच्या खांद्यावर हात टाकून चालणारी जी गावे असतात, त्यापैकी एक. खेड्याचा देह आणि शहराचा मोह अशी तडजोड तिथेही दिसते. त्यामुळे गावात मठमंदिरे, साधुसंन्यासी, सोवळेओवळे, व्रतवैकल्ये, चातुर्मास,

काकड-आरती, पंगती-ह्यांची परंपरा जपून ठेवलेली. बळीरामपंत अशा घरातून, गावातून वाढले. पण या चक्रात रेंगाळले नाहीत. रत्नागिरीतील सावरकर हे त्यांचे त्यावेळचे आकर्षण होते. त्यामुळे जुन्या कुडीत नवे रक्त खेळविण्याचा खटाटोप तेव्हापासूनच चालू होता. हे गाव तसे फारच एकीकडे. सगळ्या गजबजलेल्या जगापासून तुटलेले. जिल्ह्याच्या केंद्रापासूनही एकशेसात मैल अंतरावर.

रेल्वे नाही, धड रस्ते नाहीत, त्यामुळे लोक यायला नाखूष असत. गरजू नोकरदार आणि सोशिक सासुरवाशिणी-हीच तेवढी बाहेरली आवक. सरकारी खात्यात तर उमरखेडची बदली म्हणजे काळ्यापाण्याची शिक्षाच मानीत असत. बळीरामपंतांनी त्याही काळात या अंदमानाचे आनंदमानात रूपांतर केले. एखादा हौशी, रसिक, प्रमोदयात्री असतो. त्याला स्वतःला कलांचे, ज्ञानाचे, सामाजिक कार्यांचे वेड असते. हे व्यक्तिगत वेड तो स्वकष्टाने आख्ख्या पंचक्रोशीत पेरीत जातो. त्यातून त्या परिसराचे सांस्कृतिक स्पंदन निकोपपणे अविरत चालू राहण्यास मदत होते. पुढे पुढे त्या एखाद्याची आवड ही साऱ्या गावाची आवश्यकताच बनते. किती पुढारी, समाजसेवक, विद्वान, कलावंत त्याही अनवट काळात उमरखेडात आपली हजेरी लावून गेले. सावरकरबंधूंचे ज्वालामय विभूतिमत्त्व, खापर्डे घराण्याचे व्यासंगपूत वक्तृत्व, बापुजी अण्यांचे सुजाण कुटुंबवत्सल नेतृत्व, वि. ध. -बाळशास्त्री-भाव्यांची स्फोटक आतषबाजी, विविध-पक्षीय राजकारण्यांचे वाक्चापल्य, अनेक गायकवादकांचा नादविलास, ऋषितुल्य समाजसेवकांच्या पदयात्रा-बळिरामपंतांमुळे एका ग्रामकुळाची ज्ञानेंद्रिये कशी तरबेज आणि अभिरुचिसंपन्न होत गेली.

काहीही चांगले पाहिले, ऐकले, अनुभवले की पंतांना त्याची उमरखेडी आवृत्ती काढण्याची अस्तोशी लागून राहते. कोणत्याही निमित्ताने, कोणत्याही पीठावरून आपल्या अनुभूत आनंदाचा, धन्यतेचा साक्षात्कार गावकऱ्यांना घड-विण्यासाठी त्यांची तडफड आणि धडपड चालू होते. गेल्या वीसेक वर्षांपासून त्यांनी आपली राजधानी यवतमाळला हलविल्यामुळे उमरखेडशी त्यांची बांधिलकी आठवड्यातून तीन दिवसांची उरलेली आहे. पण म्हणून आवडत्या माणसांना तिथे नेऊन वाजवण्याचा उरक उणावलेला नाही.

पंतांचे यवतमाळचेही घर चांगले राबते आहे. येणारेजाणारे असतातच. शिवाय आणवले जाणारे असतात. उमरखेडपेक्षा यवतमाळला येणाऱ्यांना वाव साहजिकच जास्त. पण गांधीनगरमधील उमरखेडी अगत्यशील आतिथ्याला आश्रय दिल्याखेरीज त्यांची सुटका नाही. मग तो नेता, कार्यकर्ता, साहित्यिक, कलाकार कुणीही असो. या अगत्याने भारावून एकदा गाफील राहिला, को

उमरखेडच्या आमंत्रणाचा हूक पंतांनी त्यांच्या गळ्यात अडकविलाच. पंतांमुळे यापैकी बहुतेकांनी उमरखेड पाहिले. उमरखेडलाही यांना पाहायला मिळाले.

हे विश्वाश्लेपी अगत्य हा पंतांच्या वत्सल व्यक्तित्वाचा वक्तृत्वाइतकाच विलोभनीय पैलू आहे.

वक्तृत्व हा पंतांचा एक स्वतंत्र बाज आहे. व्यासंग, ज्ञान, माहिती–या व्याख्यानाच्या प्रमुख आधारांच्या अनुपस्थितीतही पंतांचे व्याख्यान रंगते. पंतांनी एखादा विषय घेतला, त्याची बैठक मारून तयारी केली व टिपणांच्या साहाय्याने विद्वत्ताप्रचुर व्याख्यान दिले, असे कधी होत नाही व असे होत नाही म्हणूनच त्यांचे व्याख्यान हमखास रंगते. त्यांना व्याख्यानाचा धीटपाट खटाटोप केला असता तर श्रोत्यांनी त्यांच्यावर बहिष्कार टाकला असता. बळीरामपंतांचे भाषण म्हणजे वाणीचा एक हृदयंगम विलास असतो. ते उभे राहिले की त्याची खुलावट आपोआप सुरू होते. काय बोलायचे हे त्यांनी स्थूलमानाने ठरवलेले असेलही. कसे बोलायचे ह्याचेही अस्पष्ट आडाखे त्यांच्या मनात असतील. पण व्याख्यानाला सुरुवात झाल्यानंतर त्याला जो आकार येतो, त्यामध्ये समयस्फूर्ततेचा भाग मोठा असतो. मग शब्दांची निवड, वाक्यांचा विन्यास, मुद्यांचा बिनतोडपणा–अशा वाक्यारवाची लीला सुरू होते. भावनेला आवाहन करणाचे शब्दांचे, त्यांच्या उच्चारांचे सामर्थ्य काय असते, ते मग पंतांच्या रसवंतीतून अनुभवावे. साहित्य, संगीत, गौरव–कशाचीही सभा असो. पंतांच्या वाणीचे इंद्रजाल तिथे आपले कसब दाखविल्याशिवाय राहत नाही. कोणत्याही निमित्ताने झालेले त्यांचे व्याख्यान ऐकणे, हा एक आल्हादक आस्वाद असतो.

हा वक्तृत्वगुणच पंतांच्या लेखनात उतरला आहे. 'स्वदेश' सुरू झाले, आणि पंतांना झरा फुटला. त्याअगोदरही मोजके लेखन त्यांनी केले असेल. पण नियमाने दर आठवड्याला विविध विषयांच्या अनुषंगाने 'स्वदेश'मुळेच पंत वाचायला मिळू लागले. 'स्वदेश' हा पंतांचा एकखांबी तंबू आहे. प्रेमापोटी मिळणाऱ्या वेचक जाहिराती सोडल्या तर सर्व अंक एकहाती अवतरलेला असतो. बातमी असो, तिच्यावरील भाष्य असो, संपादकीय टिपण असो की अग्रलेख असो–त्यावर पंतांचा घरंदाज स्पर्श जाणवत असतो. जे मनोमन भावले, ते कुणाचीही दरकार न बाळगता लिहिण्याचे पंतांनी सोडले नाही. लिहिले ते तळमळीने, क्वचित आवेशानेही लिहिले. पण त्यात कुठेही कटुता येऊ दिली नाही. विरोधाशी शरणागती पत्करायची नाही, लाचार तडजोडही करायची नाही आणि ती व्यक्त करताना विकारांचा विटाळ त्याला होऊ द्यायचा नाही. अभिजात सुसंस्कृतपणा न सोडता समतोलपणे मतभेद वा विरोध व्यक्त

करण्याचा हा वारसा त्यांनी लोकनायकांकडून घेतला. पंतांच्या लेखनातून ऋजुतेची पूजा करणाऱ्या पंतांचेच दर्शन होते. 'स्वदेश'च्या माध्यमातून तेच दर आठवड्याला परिचितांच्या भेटीला ओढीने येतात. सर्व स्वदेशचे स्वरूपच त्यांनी स्वतःसारखेच अनौपचारिक, कौटुंबिक ठेवले. सर्वच जणू बापूजींच्या एका विशाल कुटुंबातले. आपसातच त्यांनी एकमेकांबद्दलचे हार्द प्रकट करावे, तसे जिव्हाळ्याचे सिंचन सर्व अक्षरांवर झालेले. अलीकडे तर आपुलकीनेही ही अक्षरे ओलावलेली असतात आणि पंतांच्या या आपुलकीला उंबरठा नाही. जे जे चांगले ते आपले मानण्याची त्यांना सवय, आणि जे एकदा या कारणाने 'आपले' होऊन बसले, त्यांच्या पंतांना आवडलेल्या चांगलेपणाचे कौतुक पंतांनी किती करावे ? एवढे मात्र झाले, पंतांच्या 'स्वदेश'मुळे जिल्ह्यातील सत्कार्याच्या अणुरेणूंना आधार मिळाला. आज सार्वजनिक जीवनातून सत्प्रवृत्ती पोरकी झाल्याच्या काळात असा एखादा निश्चल दिवा केवढा दिलासा देतो !

काही मूल्यांवर, त्या मूल्यांचे मूर्तीकरण झालेल्या विभूतीवर असलेल्या निष्ठेतून ते बळ येते का ? एरव्ही पंत या वयातही अशी धडपड कसे करू शकले असते ? आज कुठेही चांगले काम दिसले की पंत धावून जातात. कुठे मदत करण्यासाठी, कुठे धीर देण्यासाठी, कुठे सांत्वन करण्यासाठी, कुठे शाबासकी देण्यासाठी आणि कुठे नतमस्तक होण्यासाठी !

वयाच्या पंचाहत्तरीमध्ये इतका प्रवास, इतकी दगदग, एवढा सार्वजनिक व्याप आणि घरचा उमरखेड ते यवतमाळ असा द्विदल राज्यकारभार नित्य सांभाळीत नेमाने बुधवारी 'स्वदेश' एकहाती प्रकाशित करण्याची किमयाही पंत या निष्ठेपोटीच करीत नाहीत काय ?

चांगल्या गोष्टींवर लुब्ध होण्याचे, त्यांच्यावर जीव तोडून प्रेम करण्याचे, प्रेमासाठी पडेल ते मोल देण्याचे, खरे म्हणजे पंतांचे आता वय नाही. पण वृत्ती आहे. तिचा टवटवीतपणा अजून जराही कोमेजलेला नाही. वाढत्या वयाबरोबर ते उत्तरोत्तर नव्याने तरुण होत चालले आहेत. चढतीवरच वार्धक्याने गाठलेल्या आमच्या पिढीबद्दल त्यांना फारच चिंता वाटते. मला व्याख्याने, दौरे, दगदग, जाग्रणे कमी करण्याचा ते अनेकदा कळवळून सल्ला देतात. व्याख्यानाला कुठेही जाऊ नका म्हणून गळ घालतात आणि पत्र संपल्यावर त्याच ओघात 'ता. क.' मध्ये उमरखेडच्या व्याख्यानाचे आग्रहाचे आमंत्रणही देतात. सोबत रातोरात ट्रकने यवतमाळपर्यंत पोचण्याचे आश्वासनही !

कारण माझे दुसरे दिवशी कॉलेज बुडू नये याची त्यांना काळजी असते ना!

■ ■

# अनिलांचे मंदावलेले दिवस

ते ५२–५४ चे दिवस होते. मी मॉरिसमध्ये संस्कृतच्या एम. ए. ला होतो. नागपूरविषयीच्या वाङ्मयीन आकर्षणाने भारून मॉरिसमध्ये प्रवेश केला होता. माडखोलकर, पी. वाय., भावे, कुसुमावतीबाई, अनिल, मुक्तिबोध या नावांनी भारलेल्या वातावरणात वाढत्या उत्सुकतेने व ओढीने गाव सोडले.

मॉरिसमध्ये पहिल्यांदा कुसुमावतीबाई दिसल्या. सडपातळ, देखण्या व रुबाबदार अशा कुसुमावतीबाई कोटामुळे अधिकच भारदस्त वाटत होत्या. मॉरिसच्या त्या काळच्या ख्यातनाम टारगट वातावरणावर बाईंचा एक अबोल पण गूढ असा वचक होता. बाईंचे वागणे बोलणे नेमस्त, मर्यादशील व सुसंस्कृत वाटायचे. अनिलांना या फुलवातीचे आकर्षण का वाटले असेल ते ध्यानात यायला वेळ लागत नसे. अनिलांच्या 'नव्हाळीतल्या कविता' बाईंच्या नितळ प्रीतीने उजळ झालेल्या आहेत. तेव्हा बाईंच्या रूपाने अनिलांची चालती–बोलती कविता आढळली की हटकून अनिलांची आठवण येई. अनिलांची आठवण आली की त्यांच्या प्रेमकवितेबरोबरच त्यांचा गाजलेला प्रेमविवाह, तेलंगखेडी तलाव, चमन आणि पेरिना या प्रेमी युगुलाचा अंत, या प्रसंगावरची अनिलांची दीर्घ-कविता, गडकऱ्यांच्या 'प्रेम आणि मरण' या प्रसिद्ध कवितेला प्रत्युत्तर म्हणून 'प्रेम आणि जीवन' या कवितेमध्ये प्रगट झालेला उद्दाम आशावाद या सगळ्या गोष्टी निघत. गडकरी हे प्रेमाचे शाहीर असले तरी ते मुख्यत: प्रेमभंगाचीच शाहिरी करीत. अनिल हे बाकी प्रेमसाफल्याचे पोवाडे गाणारे कृतार्थ कवी होत अशी आम्ही मल्लीनाथीही करीत असू. अनिलांच्या प्रेम-कवितेप्रमाणेच त्यांच्या प्रेमजीवनावरही आमचे प्रेम होते. म्हणून रोज मॉरिसमध्ये बाईंना वावरताना पाहिले की अनिलांची हटकून आठवण येई.

अनिलांची भेट बाकी पुढे केव्हातरी पावसाळ्यात वर्धेला झाली. ते त्यावेळी तेथे डिस्ट्रिक्ट जज्ज होते. आमचे मित्र मंगेश पाडगावकर व बाबा करंदीकर यांच्याबरोबर सायंकाळी फिरत फिरत आम्ही अनिलांच्या बंगल्यावर गेलो. त्या पावसाळी अंधारात बंगला प्रशस्त पण एकाकी वाटत होता. दोन–तीन खोल्या आतून उजळलेल्या होत्या. दिवाणखान्यात अनिलांची भेट झाली. शेजारच्या स्टुलावरच्या एका वशीत प्राजक्ताची ताजी फुले होती. बोलताना अधूनमधून ती वशी हातात घेऊन ती फुले हुंगायची त्यांना आवड दिसली. मध्येच त्यांच्याकडे एक लष्करी अधिकारी गप्पा मारण्यासाठी आले. गलेलठ्ठ व झुबकेदार मिशांच्या त्या अधिकाऱ्याबरोबर अनिल सैनिकी जीवनावर बोलू लागले. सैन्यातील त्यांच्या वैमानिक मुलाचा विषय काढून अनिल मोठ्या अभिमानाने त्याच्याबद्दल बोलत राहिले. मुद्दाम त्याचा फोटो आणून त्यांनी त्या अधिकाऱ्याला व आम्हाला दाखविला. काव्य सोडून इतर सर्व विषयांवर अनिलांना त्या दिवशी ऐकले.

त्यानंतर दोनच महिन्यांनी त्यांच्या मुलाचे अपघाती निधन झाल्याचे वृत्तपत्रात वाचले. अनिलांचा त्या रात्रीचा वात्सल्याचा उमाळा आठवून मी सुन्न होऊन गेलो. त्यानंतर अनिल दिसले तेव्हा त्यांचा सर्व शिरोभाग शुभ्र झालेला दिसला. "अजून यौवनात मी" असे चिरयौवनाचे गाणे गाणारा हा कवी पाहता पाहता वृद्ध होऊन गेल्याचे पाहून मला कसेसेच वाटले.

पुढे अनिलांच्या भेटी वरचेवर होत गेल्या. ते दिल्लीला समाजशिक्षणाचे सर्वोच्च अधिकारी असताना एकदा प्रवासात आम्ही भेटलो. त्यांनी त्यानिमित्ताने होणाऱ्या जगप्रवासाची व आपल्या नव्या प्रकल्पांची माहिती उत्साहाने सांगितली. एका हळुवार कविमनाला हे बहिर्मुख प्रवृत्तीचे सामाजिक उद्योग कसे जमतात याचे मला कुतूहल होते. अनिल म्हणाले, "अहो, तीही एक निर्मितीच आहे. आपण काही तरी नव्याने आकाराला आणत आहोत, त्यात सृजनाचेच समाधान मी मिळवीत असतो." त्या काळात अनिलांचे लेखन खरोखरच मंदावले होते. सामान्यपणे कविजनांना अप्रवेश्य अशा 'नांगरल्याविण भुईवर' अनिलांचे त्या काळात प्रयोग चालू होते.

न्यायाधीश, संशोधक, साहित्यमीमांसक, देशाच्या समाजशिक्षणयोजनेचा शिल्पकार, साहित्य संघाध्यक्ष–कवीव्यतिरिक्त किती वेगवेगळ्या भूमिका अनिलांनी समरसून पार पाडल्या. या प्रत्येक क्षेत्रात त्यांना कवितेसारखाच निर्मितीचा आनंद मिळाला असेल का ?

■ ■

# ओघावेगळे नाघ

ना. घ. देशपांडे हे नाव त्याच्या प्रसिद्धिपराङ्मुखतेमुळे लक्षात राहिले. मेहकरसारख्या वऱ्हाडातील आडवळणाच्या गावी राहत असल्याचे कळल्यापासून त्यांच्याबद्दल आपुलकी उत्पन्न झाली. सत्यकथेतील कविता ही प्रेम जुळवून आणते. त्यांची रानावनात गेलेली प्रसिद्ध शीळ आमच्या कानावर कधी आलीच नव्हती. लहानपणी आमच्याकडे पाहून, निराशेने ती परस्पर निघून गेली असावी. नंतर बाकी त्याच्या ओळींनी लळा लावला तो कायमचा. "नदी किनारी डाव मांडून मांडून खेळ मोडू नको", "फार नको वाकू जरी उंच बांधा–फार नको झाकू तुझा गौर खांदा", "ढवळी ढवळी वर बगळयांची संथ भरारी ग", "एकदा पाहिले लागली माया माझी रे कोवळी वाळली काया" "पक्षी मुरडून मान घेत असे तान गगन गमनाची" "काळचा गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे–आलीस तू एकटी बांधून सारे चुडे",

"हुंकारला पारवा
तेजाळला काजवा
हालून गेला जरा
काळोख चोहूंकडे"

यासारख्या असंख्य ओळी मनात घर करून बसल्या. या कवीला एकदा पहावे, भेटावे असे वाटू लागले. ५४ साली वाशिमला असताना तो योग आला. मनोहर नौकरीनिमित्त तेव्हा मेहकरला होता. एकदा त्याच्याकडे गेलो तेव्हा त्यांना पहिल्यांदा पाहिले. कोर्टाच्या आवारात कोर्टाच्या काळ्या कोटात भेटलो. मग घरी सवडीने भेट झाली. पुढे भेटी पुन्हा पुन्हा होत गेल्या. त्या रस्त्याने जाण्याची वेळ आली की मी त्यांना भेटून घ्यायचा. व्याख्यानाच्या निमित्ताने, कविसंमेलनाच्या निमित्ताने त्यांच्या वारंवार भेटी होऊ लागल्या.

एकदा अचलपूरला घरीही आले होते. प्रत्येक भेटीत कवितांची मैफल व्हायची. हळूहळू कवितेप्रमाणेच कवींवरही प्रेम बसले.

मेहकरसारख्या गावात आपला वकिलीचा व्यवसाय कसोशीने सांभाळून नाघ कवितेची एकांतसाधना निष्ठेने करू शकले. शहरी संस्कृती त्यावेळी रेल्वे एवढीच लांब होती. त्यामुळे तिकडचे विदेशी वारे येऊन पोहचण्याचे भय नव्हते. कोणत्या वातावरणाचे वा कुणाच्या सहवासाचे वा प्रभावाचे मोह पडण्याची दूरान्वयानेही शक्यता नव्हती. रानातल्या शिवाळयातील निवांत बिल्वपूजेची शुचिता त्यामुळेच निष्कलंक सांभाळली जात होती. भरल्या वाडयातील नववधूचे पातिव्रत्य घेऊन कविता वाढत होती. तिला गावाची, वातावरणाची, पोषणाची, प्रोत्साहनाची दखल नव्हती. गरजही नव्हती. आपल्याच नादाने ती फुलत होती. भरात येत होती. तरी आपल्यातच दंग होती.

मेहकर हे एकीकडचे आडवळणाचे विदर्भातील गाव. गावाचे वळण जुने, परंपरानिष्ठेचे, भावभक्तीचे व आचारविचार जपण्याचे. खानदानी पीळ असलेले व वाडा संस्कृतीचा ऐसपैस स्वभाव लाभलेले हे उदारमनस्क गाव, वीज व वाहतुकीच्या विपुल सोयी झाल्यानंतर अलीकडे शहरीपणाकडे झुकले आहे. ना. घ. ज्या वेळी तरुण होते त्या वेळी मेहकरचे गावपण कायम होते. दिवसाची सुरुवात काकडआरतीने व शेवट बालाजीच्या आरतीने होण्याची सवय झालेला तो काळ होता. पूजा, अर्चा, सणवार, व्रतवैकल्ये नेमाने व निष्ठेने पाळण्याची गावाला आवड होती. संतवाङ्मयापासून टिळक, गांधींपर्यंतचे महापुरुष वैचारिक प्रबोधनाची जबाबदारी सांभाळीत होते. तुरळक वकील, डॉक्टर्स, मोजके शासकीय अधिकारी ह्यांच्या रूपाने ह्या गावाला आधुनिकतेची इस्त्री लाभलेली होती. "किर्लोस्कर"सारखे एखादे पाखंडी मासिक गावामध्ये येत असे. बाकी नित्याचा राबता केसरीचा व जास्तीत जास्त चित्रमय जगताचा. वागीश्वरी, प्रतिमा हे वाङ्मयक्षेत्रातले. फॅशनेबल तारुण्य नुकते कुठे भांग पाडू लागले असेल. अद्याप मौज, सत्यकथेची ऐट सरावाची व्हावयाची होती. अशा वेळी व अशा वातावरणात लेखनवाचन झालेच तर ते भक्तिसंप्रदायाचे किंवा पारंपरिक तत्त्वज्ञानाचेच व्हावे. बसायला पाट, टेकायला पाट व मांडीवर ग्रंथ हे चित्र बदलून आरामखुर्चीवर बसून रोमांचकारक मुखपृष्ठाचे मासिक चाळणाऱ्या विरंगुळयाचे चित्र मेहकरने नेमके केव्हा पाहिले असेल? कंदिलाच्या प्रकाशात ग्रंथ लावण्याच्या काळात, दासबोधाची नजर चुकवून प्रेमकाव्य कसे अवतरले असेल? राधाकृष्णांचा सोवळा आडोसा सोडून आपली प्रेमभावना थेट व्यक्त करणाऱ्या धीट नायिकेचा हा चवचालपणा तुळशीवृंदावनापुढच्या रांगोळी संस्कृतीने कसा पचनी पाडला असेल!

ऐहिक आयुष्याच्या रुचिरपणाची चव तशी अमृतरायांनी कटावाच्याद्वारे दाखविलीच होती. ती शब्दकळाही विलोभनीय होती पण तरी ही छलांग सामान्य नव्हे. गावातील सर्वच रस्ते ज्या काळी बालाजीकडे वळत होते, त्या काळी कंचनीच्या महालाकडे जाणारी एक बुजरी पाऊलवाटही फुटावी हा एक आल्हाददायक चमत्कार होता. मेहकरच्या जुनाट वार्धक्याला यौवनाचा वासंतिक मोहर फुटल्याचा तो उन्मादक पुरावा होता. सुरुवातीला तुच्छतेने, तिरस्काराने, ह्या वाटेकडे वळणाऱ्या नजरा पाहता पाहता नकळत आपली नित्याची दिशा सोडून कंचनीच्या महालाचे उसासे ऐकून आल्या. "काळ्या गढीच्या जुन्या ओसाड भिंतीकडे" जाऊन आल्या. ती "प्रेमजलाची बारव" पाहून आल्या. जुन्या श्रद्धाकेंद्राची जागा हळूहळू नव्या आकर्षण केंद्रांनी घेतली. मेहकरच्या वाचनाभिरुचीला एक नवी टवटवी आली. आरतीच्या आवाजा-प्रमाणेच नवे अनोखे आमंत्रण, आवाज मोह घालू लागले. आता "रानारानात गेलेली शीळ" ऐकण्यात पाप वाटेनासे झाले. "अवतीभवती नव्हते कोणी" अशा सांजकाळी ढवळ्या पारव्यांची आकाशातील संथ भरारी पाहण्यात "नदी किनारी" रमून जाणे आता संकोचाचे राहिले नाही. परमार्थाच्या, वैराग्याच्या व धर्मनिष्ठेच्या वातावरणात, प्रेमाच्या प्रणयाचा, वैवाहिक आनंदाचा हजारी मोगरा केव्हा फुलला हे लक्षात आले नाही. त्याचा गंध सूक्ष्म होता. जरासा उग्रही होता. निर्माल्याच्या मलूल वासामध्ये तो उन्मादकही ठरत होता.

हा कायाकल्प घडविला ना. घं. च्या कवितेने. त्यांच्या एकान्तिक व नैष्ठिक काव्यसाधनेने बाहेरच्या जगातील झगमगीत प्रसारमाध्यमाची किरणे येऊन पोहचण्याआधी समईतील ज्योतीला साक्षी ठेवून ना. घं. ची ही अव्यभिचारी साधना चालू होती. हे शब्द कोण ऐकतील, कुणाला ऐकावेसे वाटतील ह्याची अपेक्षा न बाळगता अंतरीचा हा पारदर्शक उमाळा कागदावर उमटत होता. पण ज्या शब्दांना केवळ गृहिणींची हक्काची दाद मिळेल असे गृहीत धरले गेले, त्या शब्दांच्या सुगंधाने घराघरातील गृहिणी सुखावल्या व संसार रोमांचित झाले. ह्या शब्दांना न राहवून सुरांनी मिठी मारली व पाहतापाहता हे शब्द मराठी रसिकांचे आवडते कर्णभूषण बनले. गायकांना लळा लागावा व श्रोत्यांची ओढ वाढावी असे भाग्य वातीच्या उजेडातील ह्या साधनेला लागले. एक अबोध अस्वस्थता, एक अनामिक हुरहूर व एक गूढ विलोभन, ना. घं. च्या कवितांनी मराठी मनात रुजविण्यात यश मिळविले.

सामान्यपणे सभासंमेलने व गर्दीचे कार्यक्रम ह्यापासून कटाक्षाने अलिप्त राहण्याचा ना. घं. चा पिंड आहे. प्रकृतीचाही अलीकडे असहकार चालू आहे. जीवन-सहचरीचा चिरवियोग हा आघात साथीला आहेच. त्यामुळे गेल्या कित्येक

वर्षांत ते घराबाहेर पडलेले नसावेत. तरीसुद्धा विदर्भ साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी त्यांची मान्यता मिळविता आली ही भाग्याची गोष्ट आहे. अध्यक्षांनी साहित्य-संमेलनाला जाणे, हा आतापर्यंतचा सर्वपरिचित रिवाज होता. पण संमेलनाने अध्यक्षांकडे येणे हा चमत्कार ह्या भाग्ययोगामुळेच घडून आला.

■ ■

# लोकनायक अणे

वणीसारख्या एका मध्यमवर्गीयांची वस्ती असलेल्या तालुक्याच्या गावी १८८० मध्ये कृष्णाष्टमीच्या पारण्याला एका वैदिक कुटुम्बात बापूजी अणे ह्यांचा जन्म झाला. आजोबांनी त्यांना संहिता शिकवायला सुरुवात केली. पण त्यांच्या मृत्यूमुळे बापूजींना वैदिक बनवायचे त्यांचे स्वप्न अपुरे राहिले. आजोबांनी बालपणी दिलेल्या संहितेच्या संथेमुळे वेदांवरची बापूजींची श्रद्धा बाकी आयुष्य-भर टिकून राहिली. शिक्षण पूर्ण झाल्यावर अमरावतीच्या काशीबाई प्रायव्हेट हायस्कूलमध्ये बापूजींनी शिक्षकाची नोकरी पत्करली. तिथे त्यांची अंध सत्पुरुष श्री गुलाबराव महाराजांशी गाठ पडली. महाराजांना पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे ग्रंथ वाचून दाखविण्याची, ते मराठीत समजावून सांगण्याची जबाबदारी बापूजींनी सानंद तत्परतेने पत्करली. पण महाराजांचे तेवढ्यावर समाधान नव्हते. पौर्वात्य तत्त्वज्ञानाच्या प्रकाशात त्यांना विदेशी विचारप्रणालींचे वेगळेपण व वैशिष्टयही समजावून घ्यायचे होते. त्यासाठी बापूजींनी त्यांच्याशी चर्चा करावी, अशी महाराजांची अपेक्षा होती. वैदिक वाङ्मयाच्या आवडीबरोबरच प्राच्य दर्शनांचा सखोल व्यासंग त्यामुळे आपोआपच घडून आला. संचालक मंडळातील मत-भेदामुळे अमरावतीची शिक्षकाची नोकरी बापूजींना सोडावी लागली. पुढे त्यांनी यवतमाळला वकिली करायला सुरुवात केली. त्यापूर्वी विद्यार्थिदशेत १९०२ मध्ये नागपूर मुक्कामी लोकमान्यांनी त्यांच्या आयुष्यात प्रवेश केला होता. प्रि. ताम्हणकरांच्या अध्यक्षतेखाली बापूजींनी आयोजित केलेल्या व्याख्यानातच गीतेचे लोकमान्यांना गवसलेले रहस्य बीजरूपाने मांडले गेले. लोकमान्यांची विद्वत्ता, सूक्ष्म चिकित्सक दृष्टी, चतुरस्र व्यासंग नि लोकसंग्रहादी गुण पाहून त्या उमलत्या वयात बापूजी प्रभावित झाले. त्यांचे अंतर्बाह्य अस्तित्व लोकमान्यांच्या विभूतिमत्त्वाने भारावून गेले आणि बापूजींनी

लोकमान्यांचा आपले गुरू म्हणून मनोमन स्वीकार केला. परिणामी सार्वजनिक कार्याची दीक्षा स्वीकारणेही ओघानेच आले. शिक्षकाची खाजगी नोकरी वा वकिलीसारखे स्वतंत्र व्यवसाय निर्वाहासाठी निवडण्याचे कारणही, सार्वजनिक कार्य निर्वेधपणे करता यावे हेच होते. या आपणहून ओढवून घेतलेल्या सामाजिक व्यापापायी वकिलीकडेही नीट लक्ष देणे जमण्यासारखे नव्हते. सरकारी रोषामुळे एक वर्ष सनद रद्द झाली, तर महाभारतावर प्रवचने करून पोट भरण्याचा आपला इरादा बापूजींनी जाहीर केला. पुढे तुरुंगवासात महाभारताचे सूक्ष्म अध्ययन घडले. टिपणेही काढून झाली.

## पांडित्याला पावती मिळाली

जिल्ह्यातील कास्तकार, आदिवासी, बलुतेदार, वेठबिगार ह्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी बापूजींनी १९१६ मध्ये यवतमाळला जिल्हा सभेची स्थापना केली व सर्वत्र जिल्हा परिषदांची मोहीम उघडली. वऱ्हाडात तर परगणा परिषदा घेण्यापर्यंत आपल्या कार्याचे विकेंद्रीकरण केले. हक्कविषयक जागृती अगदी तळापर्यंत पोचविली. टिळकांच्या होमरूल चळवळीला व बॅ. चित्तरंजन दासांच्या वृत्तपत्राला सगळ्यात मोठा प्रतिसाद वऱ्हाडातून व त्यातही यवतमाळ जिल्ह्यातून मिळाला. ह्याचा स्वाभाविक परिणाम बापूजींची जिल्ह्याच्या राजकारणातून प्रांताच्या राजकारणात पदोन्नती होण्यात झाला. स्वत: टिळकांनी "विदर्भाचे हे पाणी" पुण्याला परिचित करून दिले. पुण्यातील बापूजींच्या पहिल्या व्याख्यानानेच बापूजींचे पांडित्य "सोळा आणे" असल्याची ग्वाही अच्युत बळवंत कोल्हटकरांना द्यावीशी वाटली !

टिळकांच्या प्रभावळीत बापूजींना पुढे इतके महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले की, केळकरांबरोबर विलायतेत जाण्यापूर्वी, आपल्या पश्चात आपल्या कार्याची नि "केसरी"ची जबाबदारी सांभाळण्यासाठी पुण्याला येण्याचे आमंत्रण लोकमान्यांनी बापूजींना दिले !

## सामान्यांवरही प्रभाव

दादासाहेब खापर्डे नि बापूजी अणे ह्यांच्यामुळे सर्व वऱ्हाड त्यावेळी टिळकमय झाला होता. टिळकांच्या कार्याचा नि विचारांचा संदेश बापूजींनी आपल्या वाणीद्वारे खेड्यापाड्यांपर्यंत इतक्या प्रभावी रीतीने पोचविला होता की, वऱ्हाडातील सर्वसामान्य रयतेने टिळकांना देवत्वच बहाल करून टाकले. टिळकांच्या दोन्ही विदर्भदौऱ्यांत ह्याचा काठोकाठ प्रत्यय आला. वणीला लोकमान्यांचा मुक्काम येथील संतशिरोमणी आप्पाजीमहाराज ढुमे ह्यांच्या वाड्यात होता. महाराज त्यावेळी पाटणबोरीला होते. म्हणून घरापर्यंत येऊनही

टिळकांची त्यांच्याशी भेट झाली नाही. पण परततांना वाटेत पांढरकवड्याला महाराज मुद्दाम लोकमान्यांना भेटायला आले. अकोल्याच्या वाटेवर पळसोद मुक्कामी बाबासाहेब महाराज गडीकरांनी टिळकांची भेट घेतली आणि हार घालून त्यांचा सत्कार केला. अकोल्याच्या सभेमध्ये तर शेगावचे श्रीगजानन महाराज व्यासपीठावरच होते. देवमान्यांनी केलेल्या लोकमान्यांच्या या गौरवाचा प्रभाव सामान्य प्रजाजनांवर पडणे अपरिहार्यच होते.

## अचूक मूल्यमापन

लोकमान्यांच्या महाप्रस्थानानंतर त्यांच्या स्मारकनिधीला विदर्भात तीन–चार लक्षांचा भरघोस प्रतिसाद अल्पावधीत दिला. टिळकयुग अशा रीतीने बापूजींनी विदर्भात सप्राण केले. म्हणूनच "विदर्भ टिळक" म्हणून उत्तर· काली बापूजींना यथार्थ ख्याती मिळाली.

लोकमान्यांच्या अस्तानंतर भारतीय राजकारणात उदय पावलेल्या गांधी-जींच्या नेतृत्वगुणांचे नि विभूतिमत्त्वाचे बापूजींनी अचूक मूल्यमापन केले होते. त्यामुळे त्यांनी पुकारलेल्या असहकाराच्या आंदोलनाला बापूजींनी सक्रिय पाठिंबा दिला. अरविंद घोष आणि लो. टिळक यांच्या विचारांचा मागोवा घेत १९०६ मध्येच यवतमाळच्या "हरिकिशोर" पत्रात "निःशस्त्र प्रतिकारा"वर एक लेखमाला लिहून बापूजींनी १९२० नंतरच्या गांधीजींच्या राजकारणाचे जणू सूतोवाचच करून ठेवले होते. म्हणूनच टिळकभक्त असूनही गांधीशरण झाल्याबद्दलच्या स्वजनांच्या टीकेला उत्तर देताना बापूजींनी, आपल्या चौदा वर्षांपूर्वीच्या त्या लेखमालेतील विवेचनाची आठवण करून देऊन, टिळक–गांधी ह्यांच्यातील वैचारिक ऋणानुबंधावर नेमके बोट ठेवले होते. दोन्ही बापूजींनी चौदा वर्षांच्या अंतराने निःशस्त्रांच्या राजकारणाचे मर्म अचूक ओळखले होते. त्यामुळे मार्गही समान दाखविला होता. साधनांबद्दल तेवढे बापूजींनी गांधीजीं-पेक्षा वेगळे मत सकारण नोंदवले होते. गांधीजींशी बापूजींचे मतभेदाचे प्रसंग पुढेही बरेचदा आले. साधनशुचितेचा आग्रह, राजकारणातही स्वतःच्या आंतरिक प्रश्नांचा कौल जनमतापेक्षा श्रेष्ठ मानायचा स्वभाव, जातीय निवाड्याबाबतची भूमिका, कौन्सिल बहिष्कार, विद्यार्थी व वकील वर्गालाही समाविष्ट करण्या-इतकी असहकाराच्या संकल्पनेची–ताणलेली व्याप्ती–याबाबतची आपली वेगळी मते महात्म्याच्या विभूतिमत्त्वाचे दडपण मनावर येऊ न देता, बापूजींनी निर्भयपणे वेळोवेळी मांडली. एवढेच नव्हे तर त्यासाठी लोकमत संघटित करण्याचे प्रयत्नही केले. अपयश वा अपकीर्तीची पर्वा न करता बापूजी आपल्या मतांवर अविचल राहिले. विरोधाच्या या चक्रीवादळात गांधीजींच्या लोकोत्तर नेतृत्वाचे भान त्यांनी दृष्टिआड होऊ दिले नाही, त्याचप्रमाणे त्यांच्याबद्दलची

आदरभावनाही शबलित होऊ दिली नाही. सुदैवाने गांधीजींना बापूजींच्या मतभेदामागील निर्मळ मनाची जाणीव होती. म्हणूनच दोघांच्याही जिव्हाळ्यात या तात्कालिक वादळामुळे अंतराय उत्पन्न झाला नाही. १९४१ मध्ये 'यंग इंडिया 'मधील एका लेखात गांधीजींनी बापूजींशी होणाऱ्या चर्चेचा गौरवून उल्लेख केला नि बापूजींनी आपले नैतिक सामर्थ्य वाढविल्याचा अनुभव मोकळेपणाने नमूद करून ठेवला. बापूजींच्या काही भूमिकांमुळे देशभर त्यांच्या विरोधात वेळोवेळी टीकेचे मोहळ उठले. बंगालमध्ये सुभाषबाबू व सेनगुप्ता ह्यांच्यातील अंतःकलह पेटला, तेव्हा गांधीजींनी लवाद म्हणून बापूजींची नियुक्ती केली. उभय पक्षांकडून बापूजींविरुद्ध गांधीजींकडे तक्रारी आल्या, तेव्हा बापूजींच्या निःपक्षपातीपणावरचा आपला निःशंक विश्वास गांधीजींनी जाहीर केला !

गांधी युगामध्ये बापूजींचा प्रादेशिक राजकारणातून व्यापक अशा राष्ट्रीय क्षेत्रात प्रवेश झाला. गांधीजींच्या मिठाच्या कायदेभंगाला वैदर्भीय पर्याय म्हणून बापूजींना जंगल सत्याग्रहाचे प्रतिभाशाली स्फुरण झाले व १० जुलै १९३० रोजी पुसद तालुक्यातील धुंदीच्या जंगलात बापूजींनी कायदेभंग करून आंदोलनाचे रणशिंग फुंकले आणि त्यासाठी शिक्षा भोगली. या सत्याग्रहाने बापूजी "लोकनायक" झाले.

### क्षितिज विस्तारले

पुढे कॉंग्रेस कार्यकारिणीचे सभासद व १९३३ मध्ये अ. भा. कॉंग्रेसचे अध्यक्ष असे बापूजींच्या कर्तृत्वाचे व मान्यतेचे क्षितिज विस्तारत गेले. व्हाइसरॉयच्या सल्लागार मंडळाचे सभासद म्हणून नियुक्ती बापूजींनी स्वीकारली, तेव्हा बापूजींना चौफेर टीकेला नि विरोधाला तोंड द्यावे लागले. राष्ट्राची मनःस्थिती स्वातंत्र्यसंग्रामासाठी तप्त झाली असताना बापूजींसारख्या देशभक्ताने ब्रिटिशांची गुलामगिरी पत्करण्यासाठी तयार व्हावे, ह्याचा अनेक सहकाऱ्यांना बोध होईना. त्यात पुन्हा बेचाळीसच्या आंदोलनावरील शासकीय नियंत्रणाचे समर्थन जबाबदार मंत्री म्हणून बापूजींना करावे लागले. यामुळे तर आगीत तेलच पडले. पण सरकारी धोरणाचा निषेध म्हणून येरवड्याच्या बंदिवासात गांधीजींनी उपोषण सुरू केल्याचे कळताच, त्यांना पाठिंबा व्यक्त करण्यासाठी आपल्या मंत्रिपदाचा तात्काळ राजीनामा देऊन बापूजी तडक पुण्याला आगाखान प्रासादात गांधीजींना भेटण्यासाठी आले.

या त्यागपत्रामुळे बापूजींबद्दलचा प्रक्षोभ निवळत असतानाच सिलोनच्या हायकमिशनरपदाचे आमंत्रण स्वीकारून बापूजींनी पुन्हा लोकक्षोभाला तोंड दिले. भारताबाहेरील भारतीयांचे प्रश्न सोडविण्यासाठी बापूजींनी या विरोधसंकुल

संधीचा उपयोग करून घेतला. स्वातंत्र्याच्या उष:काली बापूजी लंकेहून परत येऊन घटना समितीचे सभासद झाले. नेहरू रिपोर्टाचे शिल्पकार म्हणून स्वतंत्र भारताची घटना स्थूलरूपाने करण्याचा अनुभव गाठीशी होताच. पुढे बिहारचे राज्यपाल म्हणून बापूजींची नियुक्ती झाली.

## बिहारी जनतेला दिलासा

अतिवृष्टी व महापुरामुळे आलेल्या दुष्काळात गांजून गेलेल्या ग्रामीण बिहारला या राज्यपालाने हत्तीवरून, उंटावरून व प्रसंगी खटाऱ्यातूनही जाऊन प्रत्यक्ष भेट दिली व तात्काळ उपाययोजना करण्याचे अधिकाऱ्यांना आदेश देऊन प्रजेला दिलासा दिला. बिहारची जनता अशा वर्तनाने या राज्यपालाने किती अंकित करून ठेवली होती याचे कृतज्ञ पुरावे मुद्रित स्वरूपात उपलब्ध आहेत.

पाटलीपुत्रालाच जीवावरच्या दुखण्याने बापूजींना गाठले व राज्यपालपदाचा निरोप घेऊन बापूजींना महाराष्ट्रात परतावे लागले.

२६ जानेवारी १९६८ रोजी मुंबईला बापूजींनी शेवटचा श्वास घेऊन ७८ वर्षांच्या अश्रांत देशभक्तीला पूर्णविराम दिला. गुरूचे महानिर्वाण जिथे झाले, तिथेच शिष्यानेही देह ठेवला. चौपाटीवरील गुरूच्या पुतळ्याचे अनावरण करणारे धन्य हात त्या दिवशी कायमचे स्तब्ध झाले !

आजोबांच्या मृत्यूमुळे बापूजी वैदिक होऊ शकले नाहीत. संचालक मंडळातील कलीमुळे ते शिक्षकही होऊ शकले नाहीत. सार्वजनिक कामाच्या व्यापामुळे वकीलही राहू शकले नाहीत. जन्मभर स्वराज्याची वकिली करावे लागलेले बापूजी शेवटपर्यंत स्वतःला वेदानुयायी म्हणवून घेण्यात धन्यता मानीत. ज्ञानाच्या यात्रिकाला याखेरीज आणखी काय हवे असते ?

■ ■

# शांतमूर्ती

मामा क्षीरसागरांचे नाव पहिल्यांदा ऐकले तेव्हा मी हायस्कूलमध्ये असेन. वसंतराव, चंदू, कृष्णा यांच्या सहवासात आलो, तेव्हा हे नाव पुन्हा पुन्हा निघायचे. हे तिघेही त्यावेळी दर्यापूरच्या प्रबोधन विद्यालयाचे विद्यार्थी तिथल्या वातावरणाने भारावले होते. प्रबोधनचे विद्यार्थी, शिक्षण, तेथील वेगवेगळे उपक्रम, शिस्त, संस्कार या विषयांवर तिघेही भान हरपून बोलत. या सर्व भान हरपण्याच्या मुळाशी प्रामुख्याने दोन नावे होती. एक मामांचे व दुसरे बाबा रेडीकरांचे. मसुराश्रमातून आलेले दोन रामदासी दर्यापुरात विरक्त वृत्तीने राहून नव्या पिढीवर देशभक्तीचे व ध्येयवादाचे संस्कार करणारी शाळा चालवीत आहेत. या माझ्या तोपर्यंतच्या समजुतीला या मित्रांच्या भावभरल्या आठवणींमुळे अधिक सजीव व गडद स्वरूप आले. या दोघांची तपःपूत दिनचर्या, समर्पित जीवन, सत्त्वशील आचरण, व्यासंग व मुलांवरील प्रेम याबद्दलच्या आख्यायिका हे मित्र पुन्हा पुन्हा ओथंबून सांगत. ऐकताना त्यांचा हेवा वाटे. पुढे कॉलेजमध्ये पांडव, बांगडे भेटले, नातुबाई भेटल्या. या सर्वांचा प्रबोधन हा मर्मबिंदू होता. या सर्व ऐकिवातून प्रबोधनचे, तेथील वातावरणाचे व ते वातावरण घडवणाऱ्या मामा व बावांचे एक गूढ पण विलोभनीय चित्र मनात तयार होत असे. मामांना पहिल्यांदा पाहिले मी एकोणीसशे पन्नासमध्ये. अचलपूरला गीताजयंतीसाठी त्यांना बोलाविले होते. मामांच्या भेटीने माझ्या मानसचित्राला एकदम उठाव आला. प्रबोधनच्या स्नेहसम्मेलनासाठी गेलो, तेव्हा मामांना अजून जवळून पाहिले, पण त्यांचा माझ्या भावजीवनात प्रवेश व्हायला अजून काही दिवस जावे लागले. आनंदवनात मित्रमेळाव्याच्या वा अन्य निमित्ताने आमच्या भेटी होत. अशा एका भेटीत ते विद्याविश्वातील अराजकाबद्दल माझ्याशी काळजीच्या सुरात बोलले. विनोबांनी नुकतेच त्यांच्या-

वर महाराष्ट्राच्या आचार्यकुलाचे काम सोपविले होते. एके दिवशी त्यांनी मला आचार्यकुलाचे माहितीपत्रक व संकल्पपत्र पाठवले. शिक्षक हा ज्ञाननिष्ठ, समाजनिष्ठ व विद्यार्थिनिष्ठ असावा, असे त्यात एक कलम होते. पण मला सगळ्यात भावले ते त्यातले ते कलम – ज्यात शिक्षक हा सत्तेच्या व पक्षीय राजकारणापासून अलिप्त असण्याची अपेक्षा व्यक्त केली होती. मी त्या संकल्पपत्रावर माझी स्वाक्षरी करून ते मामांकडे पाठवून दिले. अशा रीतीने महाराष्ट्रातील आचार्यकुलाचा मी पहिला सभासद झालो. आचार्यकुलाने मला मामांच्या अधिक जवळ नेले. त्या सहवासातून मामा जे कळले, त्याने माझे जीवन उन्नत झाल्यासारखे मला वाटते.

मामा मूळचे रायगड जिल्ह्यातील रोह्याचे. सर चिंतामणराव देशमुखही तिथलेच. एकोणीसशे तीनमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील वैद्यकीय व्यवसाय करीत असत. कॉलेज शिक्षणासाठी मामा मुंबईला गेले. एलफीस्टन कॉलेजचे ते स्कॉलर होते. त्या वेळच्या सर्व मुलांवर लोकमान्यांच्या विभूतिमत्त्वाचा प्रभाव मोठा होता. एकोणीसशे वीसमध्ये लोकमान्य गेले, तेव्हा मामा जेमतेम सोळा वर्षांचे होते. त्या दिवशी चौपाटीवरच्या लोकमान्यांच्या धडाडत्या चितेसमोर उभे राहून, मिटल्या डोळ्यांनी प्रणामपूर्वक त्यांनी संकल्प केला, "तुझ्या समचि आमुची तनुहि देशकार्यी पडो।" संसाराचे पाश मागे लावून न घेता विरक्त वृत्तीने देशाची आमरण सेवा करायची–ही चितेला साक्ष ठेवून केलेली प्रतिज्ञा शेवटच्या श्वासापर्यंत मामांनी निष्ठापूर्वक पाळली. त्यानंतर गांधीजींनी असहकाराचे आंदोलन छेडले. मामांनी आपल्या कॉलेज–जीवनाला रामराम ठोकून अंधेरीच्या साधकाश्रमात प्रवेश केला. बॅ. केशवराव देशपांडे, आचार्य काका कालेलकर, आचार्य जुगलकिशोर यांच्या मार्गदर्शनाचा तिथे त्यांना लाभ झाला. एकोणीसशे चोवीसमध्ये त्यांची मसूरकर महाराजांशी भेट झाली. एकोणीसशे सव्वीसपासून मामांनी मसुराश्रमाचे कार्य करायला सुरुवात केली. आश्रमात त्यांचे नाव "ब्रह्मचारी शांतमूर्ती" होते. "दासबोध" मासिकाचे ते पाच वर्षे संपादक होते. गावोगाव त्यांनी नमस्कार मंडळे चालविली. धर्मनिष्ठा व बलोपासना यावर भर देणारे अनेक उपक्रम हाती घेतले. गोव्यामध्ये ख्रिश्चनांनी जबरदस्तीने हजारो हिंदुकुटुंबे बाटविली, तेव्हा मसूरकर महाराजांच्या प्रेरणेने मामांनी गोव्यात जाऊन शुद्धीकरणाची मोहीम हातात घेतली व तिच्या अनुभवावरून "गोमंतक शुद्धीचा इतिहास" हा बृहद्ग्रंथ सिद्ध केला. या ग्रंथाला स्वा. सावरकरांची प्रस्तावना आहे. पुढे मामांनी सातपुड्यातील भिल्लांमध्ये सेवाकार्य केले. अक्राणीमहाल भागात त्यांनी अकरा मारुतींची स्थापना केली. हे अकराही मारुती पोलादाचे होते. शंकरराव किर्लोस्करांनी ते ओतून दिले होते. पण त्या वनवासातील मलेरिया-

मुळे जर्जर झाल्याने मामांनी हे सेवाकार्य मध्येच सोडले व शैक्षणिक कार्याकडे दृष्टी वळवली. विदर्भातील दर्यापूरला येऊन तेथील राममंदिरामध्ये बाबांसह मुक्काम ठोकला. मनाचे श्लोक, साष्टांग नमस्कार, दासबोध पाठ या उप-क्रमाद्वारे जनसंपर्क वाढवून पुढे त्या ठिकाणी प्रबोधन विद्यालयाची स्थापना केली. एकोणीसशे चौपन्नमध्ये कोल्हापूरला ग्रामसेवाश्रम उभारला व बाबांच्या मदतीने वेगवेगळ्या प्रवृत्तीद्वारे जनसामान्यांचे प्रश्न हाताळण्यास सुरुवात केली. त्यानंतर मामांनी विनोबाजींच्या प्रेरणेने सर्वोदयाचे काम हाती घेतले. त्यांनी सोपवलेली भूदान व ग्रामदानाची विविध कामे केली. भूदान यात्रेमध्ये विनोबांच्या महाराष्ट्र संचाराचे व्यवस्थापक मामाच होते. शंकरराव देवांच्या भारत-पेकींग मैत्रीयात्रेमध्ये आसामपर्यंत ते बरोबर होते. विनोबांना आचार्य-कुलाचे स्फुरण झाले त्यावेळी महाराष्ट्रातील काम बांधण्यासाठी विनोबांनी मामांची नेमणूक केली.

आयुष्यात फार मोठ्या लोकांशी मामांचा संबंध आला. लोकमान्यांपासून त्यांनी स्वसुखनिरभिलाषतेची प्रेरणा घेतली. म. गांधी, पं. मदनमोहन मालवीय, तात्यासाहेब केळकर यांसारख्या थोरांचे संस्कार त्यांच्यावर झालेच, पण...खरा प्रभाव पडला तीन विनायकांचा. त्यातले पहिले विनायक महाराज मसूरकर, दुसरे बॅ. विनायकराव सावरकर आणि तिसरे आचार्य विनोबा. वृत्तीची आध्यात्मिकता त्यांनी मसूरकर महाराज व पं. मालवीयांकडून घेतली. ज्वलंत देशभक्तीसाठी लोकमान्य व स्वातंत्र्यवीरांचा आदर्श समोर ठेवला व विधायक सेवाकार्यासाठी गांधी व विनोबांच्या संप्रदायात त्यांनी स्वतःला झोकून दिले. अनासक्ती व निर्लोभीवृत्ती लहानपणापासूनच मामांनी अंगी बाणवली होती. तेव्हापासूनच ते देशभक्तीच्या गोष्टी मुलांना सांगत. त्यांच्यामधला अस्मितेचा स्फुल्लिंग जागृत करीत. मामांचा गळा चांगला होता. मसूराश्रमामध्ये असताना ते प्रभातफेऱ्यांमध्ये "हे घनःश्याम श्रीराम। मदात्माराम" यांसारखी देश-भक्तीने रसरसलेली गीते मोठ्या आवाजात म्हणत व म्हणवून घेत. लोक-मान्यांच्या चितेला साक्षी ठेवून घेतलेल्या शपथेनंतर मामांनी कॉलेज सोडले, घरही सोडले. आई, वडील, भाऊ, बहीण हे सगळे मायापाश निर्धाराने बाजूला सारले. मसूराश्रमात असताना एकदा ते रोह्याला आले. रामदासी वृत्तीनुसार घरी उतरले नाहीत. गावाबाहेर देवीच्या देवळात उतरले. प्रथेप्रमाणे भिक्षा मागायला गावात येत असत. एके दिवशी स्वतःच्या आळीतच ते भिक्षेसाठी निघाले. कोवळे वय, मोकळे केस आणि मानेमागे गाठ मारलेले एक वस्त्र या वेषात मामा भिक्षेसाठी आले त्यावेळी आळीतली सगळी मंडळी कुतूहलाने जमा झाली होती. एकेक घरी भिक्षा घेत घेत मामा स्वतःच्या घरासमोर आले. त्यांनी खणखणीत आवाजामध्ये श्लोक म्हटला—

"समर्थांचिया सेवका वक्र पाहे ।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ॥
जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही ।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी ॥"

शेवटी "जयजय रघुवीर समर्थ" अशी आरोळी ठोकून मामांनी मोठ्याने भिक्षा मागितली. जांभळ्या रंगाचे टोपपदरी लुगडे नेसून त्यांची आई – सौ. मथुताई दारात उभीच होती. त्यांच्याप्रमाणे अंगात सदरा व डोक्याला रुमाल बांधून वडीलही उभे होते. "ओम् भवति भिक्षां देहि" अशी हाक मामांनी मारताच त्यांच्या आईने हातातली तांदळाची दुरडी त्यांच्या झोळीत रिती केली. भिक्षा घेतल्यावर मामा थोडे पुढे झाले. त्यांनी आई-वडिलांच्या पायावर डोके ठेवले. पुन्हा "जयजय रघुवीर समर्थ" अशी ललकारी देऊन ते पुढच्या घराकडे वळले !

ध्येयासाठी नाती सोडली, ती शेवटपर्यंत. मामांना स्वतःचे घर व कुटुंब असूनही घर व कुटुंब नव्हते, किंबहुना सर्व देशच त्यांचे घर होते व सर्व विश्वच त्यांचे कुटुंब होते. महाराष्ट्रात तर गावोगाव मामांना घरे होती. मामांचे अनेक मानसपुत्र व मानसकन्या स्वतःच्या आई-वडिलांपेक्षाही मामांना फार मानत असत. मामांचे खरे नाव : शंकर धोंडो क्षीरसागर. घरचे लोक त्यांना "तात्या" म्हणत. त्यांचे मामा हे नाव मनुताई नातूंचे मामा असल्यामुळे रूढ झाले, असे मी परवा परवापर्यंत मानीत होतो. पण मामांच्या अमृत महोत्सवाच्या वेळी मनुताईकडून कळले की, मामांचे व त्यांचे काहीच नाते नव्हते. पण लहानपणी वडील गेल्यानंतर...मामाच त्यांचे आई-वडील बनले. पोटच्या पोरापेक्षाही मामांबद्दल पितृभाव व मातृभाव बाळगणारी अशी अनेक माणसे मी पाहिली. शेवटच्या काळात मामांना कॅन्सर झाला, तेव्हा शिल्लक राहिलेल्या एकमेव वडील भावाने त्यांना उरलेला काळ स्वतःजवळ काढण्याची गळ घातली. त्याही वयात व त्याही अवस्थेत वडील भावाच्या कळकळीच्या इच्छेला मामांनी स्वच्छ नकार दिला. घर सोडल्यापासून जन्मभर ज्या जगाने त्यांना घरच्यासारखे पोसले, त्यांच्याशी आयुष्याच्या संध्याकाळी रक्ताच्या नात्याखातर इमान सोडायला मामा तयार झाले नाहीत. आयुष्यभराच्या दगदगीमुळे त्यांचे शरीर आता थकले होते. एका मोटार अपघातात सापडल्यापासून कंबरेचे दुखणे केव्हाही उमळत असे. सारखे फिरण्यामुळे व ठिकठिकाणचे अन्न, पाणी व हवामान यातील बदलामुळे शरीरावर व्हायचा तो परिणाम होतच होता. अंगकाठी व्यायामाची असल्यामुळे ते पुष्कळ दिवस तग धरू शकले, एवढेच.

मामा कॅन्सरने आजारी आहेत, हे कळल्यापासूनच आम्ही त्यांची धडपड-णारी मुले गलबलून गेलो. मुंबईला त्यांना भेटायला गेलो, तेव्हा आम्हालाच आवरेनासे झाले होते. पण मामा शांत होते. शांतपणे सर्व वेदनांना तोंड देत होते. त्यांच्या आध्यात्मिक पिंडामुळेच त्यांनाही देहातीत मनःशांती लाभत होती.

लोकमान्य, गांधी, मसूरकर, सावरकर, विनोबा, जयप्रकाश अशा विविध भांडवांखालून मामा गेले, पण कुणाचेही वैचारिक दास्य त्यांनी पत्करले नाही. बावनकशी देशभक्ती व अंतःकरणात जनसामान्यांबद्दलच्या कळवळ्याचा जिवंत झरा – यासारख्या बाबींवर मामांचे मन झेपावत असे. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यागीवृत्तीने चालवलेली सर्व विधायक कार्ये व्यापक जागृतीच्या दृष्टीने त्यांना स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नासाठी पूरकच वाटत असत. आताचे तात्त्विक वा वैचारिक मतभेदाचे श्लेष त्यावेळी फारसे निघत नसत, नाही तर गांधी, सावरकर, मसूरकर व विनोबा या टोकांमधला तोल ते सांभाळू शकले नसते. प्रभावकाळात सुद्धा मनाला न पटलेल्या बाबीत त्यांनी आपला बाणा राखला. विनोबावर नितांत श्रद्धा असूनही त्यांची बिहार आंदोलनाबद्दलची भूमिका मामांना मान्य नव्हती. शरीर विनोबांकडे, चित्त जयप्रकाशांकडे अशी त्यांची त्यावेळेला द्विधा अवस्था झाली होती. आणीबाणीबाबतचे विनोबांचे मनही मामांना कधी कळले नाही. निःपक्षता सिद्ध होण्यासाठी मतदानातसुद्धा सहभागी न होण्याचा विनोबांचा आग्रह मामांनी जुमानला नाही. महाराष्ट्र आचार्यकुलाने मामांच्या नेतृत्वाखाली म्हणूनच आणीबाणीच्या व मतदानविषयक विनोबांच्या भूमिकेचा विरोध करणारा ठराव पारित केला होता.

मनाने, वाणीने वा कृतीने दुसऱ्याला एवढेसेही न दुखवण्याची काळजी घेणारे, अहर्निश दुसऱ्यांच्याच सोयीचा, सुखाचा व हिताचा विचार करणारे, आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण लोकोपयोगी कामांकरिताच खर्च व्हावा याचा ध्यास घेतलेले दुर्मिळ मातृवत्सल मन मामांना लाभले होते. "अंतरी ज्ञाने उजळिला । भीतरी कर्मे प्रक्षाळिला" असे स्वतःचे अंतर्बाह्य शुद्धिकार्य मामा अखंड करीत होते, त्यामुळे मामांना आयुष्यात वैफल्य कधी स्पर्श करू शकले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात अत्यंत त्याग व पराक्रम केलेल्या अनेकांना स्वातंत्र्योत्तर काळात निराशेने व वैफल्याने आरपार ग्रासून टाकले. अशांच्या करपट उच्छ्वासांनी सर्व वातावरण दूषित होऊन गेले. स्वप्नभंगाच्या यातना तर अनेकांना झाल्या. केलेल्या त्यागाचा व बलिदानाचा मोबदला अपेक्षिणाऱ्या सर्वांनाच हे असे अवसेचे अनुभव आले. मामांना एकदा मी याबाबत छेडले, तेव्हा ते म्हणाले, "मला निराशा कधीच आली नाही, कारण स्वातंत्र्यापासून

स्वातंत्र्याव्यतिरिक्त माझी कसलीच अपेक्षा नव्हती. त्यामुळे अपेक्षाभंगाची झळही मला कधी लागली नाही."

शेवटच्या काळात दोन बाबींबद्दल मामा सतत अस्वस्थ असत. येणाऱ्या-जाणाऱ्यांजवळ तोच विषय पुन्हा पुन्हा काढीत. मतदानाबाबत विनोबांना आपली भूमिका आपण पटवू शकलो नाही, ही एक खंत त्यांना होती. दुसरी हळहळ बाबा आमटयांच्या थोर कार्याला शिक्षित वाचिवीरांकडून होणाऱ्या विरोधाबद्दलची होती.

बॅ. रामराव देशमुख निधन पावल्याचा मामांना फार धक्का बसला. मामांना त्यांच्याबद्दल फार आदर होता. मामांच्या प्रबोधन विद्यालयाचे ते अध्यक्ष होते. त्यांचे वय तसे बरेच झाले होते. अलीकडे थकलेही खूप होते. आजारीही होते. त्यामुळे त्यांचा मृत्यू तसा अनपेक्षित नव्हताच, पण त्याचा आघात मामांवर किती व्हावा? दुसरे दिवशी सकाळी प्रबोधनमध्ये दुखवटयाची सभा झाली. त्या सभेत भाषण करण्याची मामांची तयारी नव्हती. लोकांनी त्यांना बोलण्याचा आग्रह केला. मामा बोलले, शोकसभा संपवून मुख्याध्यापकांच्या कार्यालयात आले. लोकमान्यांच्या प्रतिमेखाली ठेवलेल्या कोचावर बसले. शिणून जाऊन त्यांनी एक पेलाभर पाणी मागितले, पण पाणी येईपर्यंतही त्यांनी धीर धरला नाही. अकल्पितपणे मामांनी मान खाली टाकली नि जगाचा निरोप घेतला. त्यांचा कॅन्सर डाव साधेल, अशी आम्हाला भीती होती, पण शेवटी निमित्त झाले ते हृदयविकाराचे. लोकमान्यांच्या चितेसमोर त्यांनी देशाकरिता देह वाहण्याची शपथ घेतलेली होती. ती शपथ पूर्ण करून लोकमान्यांच्याच प्रतिमेच्या साक्षीने एका टिळकभक्ताच्या पाठोपाठ मामांनी आपलाही देह ठेवला.

■ ■

३३६५ निबंध २६६० ५-३-१९७०

# बुवा

नांदेडला गजाननराव जोशी यांच्याबरोबर म. म. यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांच्याकडे पहिल्यांदा गेलो. तिथे रंगनाथबुवांचे पहिले दर्शन झाले. त्यांची निर्दन्त, उघडीबंब तुंदिलतनू मूर्ती तेव्हापासून लक्षात राहिली दासभटजी अयाचित यांचा मृत्यू किती " उत्तम झाला " याचे ते तपशीलवार वर्णन करीत होते. मृत्यू हा त्यांच्या बोलण्यातून भयप्रद वा दुःखद विषय उरलाच नव्हता, इतके त्यांचे वर्णन आनंददायक होते. त्याच भेटीत कुरुंदकरांचे वर्णन त्यांनी जीवंत बुद्धीचा माणूस म्हणून केले. त्या भेटीपासून रंगनाथबुवा चांगले लक्षात राहिले. पुढे परस्परांच्या घरी येणे जाणे वाढले, घरोबा वाढला. त्यांच्या तबलावादनाइतकीच त्यांची खाद्यप्रियता, चवीतील चोखंदळपणा व वृत्तीची अविचलित प्रसन्नता, ह्यांच्यावर मी नकळत प्रेम करू लागलो. घरात मुले लहान होती. ओढाताण नेहमीच असे. तरी त्याचा परिणाम बुवांच्या चेहऱ्यावर वा वृत्तीत कधी आढळला नाही. बुवांना मी कधी कोणत्याही कारणाने उद्विग्न पाहिले नाही.

आयुष्यातील अनेक चढउतार त्यांनी पचवले होते. उपासमारीपासून तो राजवैभवापर्यंत सर्व सोहळे भोगून झाले होते. देगलूरला संत चूडामणी महाराज यांच्या घराण्यात त्यांचा जन्म झाला. आई, वडील, आजी, आजोबा, असे पाच जणांचे कुटुंब होते. बुवांना पाठीपोटी कुणी भावंड नव्हते. जन्मभर तसे ते एकाकीच होते. त्यांच्या वयाच्या पहिल्या वर्षी आजी व तिसऱ्या वर्षी आई गेली. घरात बाईमाणूस शिल्लक उरले नाही. आठवे वर्षी वडिलांनी त्यांचे मौंजीबंधन केले. बाराव्या वर्षी अगोदर वडील आणि नंतर आजोबा गेले. आणि बुवा पूर्णपणे एकटे पडले. उदगीर तालुक्यातील नेमगावला पूर्वी बुवांची जहागीर होती. देगलूर येथील चूडामणी महाराज संस्थानालाही बेताचेच पण

उत्पन्न होते. अल्पवयीन बुवांना ही संपत्ती लाभी ठरली नाही. नातलगांनी तिची आपसात विल्हेवाट लावून टाकली.

बुवांचे वडील पट्टीचे गायक होते. पेटी, तबला आणि शास्त्रीय संगीतात त्यांची फार गती होती. उत्सवप्रसंगी त्यांचे गाणे असल्याचे कळताच भल्या भल्या गवयांनी निराशेने परत जावे असा त्यांच्या गायकीचा दरारा होता. त्यांच्या मृत्यूनंतर बुवांना घरही उरले नाही. शिक्षण आपोआपच संपुष्टात आले. महादेव आप्पा जंगम नावाच्या वडिलांच्या शिष्याजवळ बुवांनी संगीतसाधना सुरू केली. संगीतक्षेत्रातील महत्त्वाकांक्षेचा उदय त्यावेळी झाला. त्याकाळी देगलूरला गुंडा महाराजांच्या वार्षिकोत्सवात नामांकित गवई येत. हैद्राबादचे विख्यात तबल्याचे मार्तंडबुवा काळे आणि पेटीवादक विठ्ठलराव नारकळ यांचे कसब अशाच एका उत्सवात बुवांना पाहायला मिळाले. मार्तंडबुवांजवळ त्यांनी तबला शिकण्याची इच्छा व्यक्त केली व १९२० मध्ये त्यासाठी ते हैद्राबादला निघूनही गेले. त्यावेळी त्यांचे वय जेमतेम सतरा वर्षांचे असेल.

बुवांची विद्येची आराधना सुरू झाली. हुसेनी आलमवरील नारायण महाराजांच्या मठात राहणे, माधुकरी मागून पोट भरणे आणि मार्तंडबुवांच्या घरासमोर ठाण मांडून बसणे, त्यांच्या प्रत्येक लहरी परीक्षेला उतरणे असा क्रम सुरू झाला. पाच वर्षांत तबल्याचे सर्व प्रकारचे शिक्षण बुवांनी घेतले. त्याकाळच्या हैद्राबादेतील गणेशोत्सवाच्या स्पर्धेत तबलावादनाचे सुवर्णपदकही त्यांनी मिळवले. हैद्राबादमधील प्रसिद्ध कीर्तनकार व कवी पद्माकरबुवा यांनी त्यांना नेमके उचलले व डाबलपूरपर्यंत फिरवून आणले. पद्माकरबुवांबरोबर हुमणाबादला गेले असताना प्रभूंच्या दरबारात त्यांना नारायणबुवा मंगळवेढेकर यांचे तालशास्त्रावरचे विवेचन ऐकायला मिळाले. त्याचा व एलिचपूरला ऐकलेल्या सवाई गंधर्वांच्या गाण्याचा प्रभाव बुवा कधी विसरू शकले नाहीत.

एव्हाना तबलावादनाबद्दलचा पुरेसा आत्मविश्वास झाला होता. स्थैर्य व शाश्वती यांच्याबद्दलची बेदरकारी त्यांच्यामध्ये मुळातच होती. कलावंताचा दर्प आणि कलंदरपणा याची जोड आता नव्याने मिळाली. तबलावादनातील प्रावीण्य व त्याआधारे निर्वाह एवढ्यावर आता त्यांचे समाधान नव्हते. तालशास्त्राचे सिद्धांत आत्मसात करून तबलावादनाची उपपत्ती पचवण्याचे त्यांच्या मनाने घेतले व प्रात्यक्षिकाबरोबर सैद्धान्तिक तयारी करण्याच्या उद्देशाने सत्तावीस साली ते नारायणबुवांकडे पंढरपूरला गेले. एकोणविसशे पस्तीसपर्यंत ते नारायणबुवांच्या सहवासात होते. पोटासाठी माधुकरी व आत्मतृप्तीसाठी संगीतसाधना असा त्यांचा जीवनक्रम सुरू झाला.

इथेच त्यांची जगन्नाथबुवा पंढरपूरकरांशी मैत्री झाली. हळूहळू त्यांनी

पेटीही शिकून घेतली. एवढेच नव्हे तर पेटीवादनात प्रभुत्व संपादन केले. नारायणबुवा, जगन्नाथबुवा, दत्तोपंत मंगळवेढेकर, यांच्याबरोबर बुवांनी कोल्हापूर, मिरज, सांगली, बेळगाव, गोवा या भागात दौरा केला. संगीताच्या अनेक मैफिली रंगवल्या. या दौऱ्यातच सांगलीला जगद्गुरू विद्यालयातर्फे बुवांना सन्मानपूर्वक मानपत्र अर्पण करण्यात आले. आता बुवांची तशी ददात मिटली. माधुकरीचे दिवस संपले. शिकवण्या व कार्यक्रमांच्या द्वारे आवश्यकतेपेक्षा अधिक मिळवण्याचे दिवस आले. संचयाची वृत्ती मुळातच नव्हती. त्याचवेळी प्रसिद्ध शांता आपटे यांचा परिचय झाला. त्यांच्या पार्टीबरोबर बुवा दिल्ली, आग्रा, कानपूर, लखनौ, रावळपिंडी, अमृतसर, बनारस, अलाहाबाद, सिमला इत्यादी ठिकाणी जाऊन आले. सगळीकडे आपल्या पेटी व तबलावादनाची छाप बसवून आले. पार्टीत शांता आपटे यांच्या नृत्य-गायनाचा कार्यक्रम असे. त्यात त्यांचे नृत्यशिक्षक दत्तोपंत हे तबल्यावर, बुवा पेटीवर आणि कल्लनखान सारंगीवर असत. याखेरीज बुवांच्या पेटी, तबला व जलतरंग यांच्या सोलोवादनाचाही कार्यक्रम असे. या दौऱ्याने बुवांना संपत्ती व कीर्ती विपुल मिळवून दिली. महाराष्ट्राच्या पहिल्या श्रेणीतील पेटी व तबलावादकांत आता त्यांची गणना होऊ लागली. पैसा आला आणि गेला, कला आणि विद्या तेवढी शिल्लक राहिली.

शांताबाई सिनेमाकडे गेल्यावर त्यांची मंडळी बंद पडली. बुवा पुन्हा निष्कांचन व एकाकी उरले. मार्तंडबुवांच्या दर्शनासाठी ते पुन्हा हैद्राबादला आले. तेथे जम बसण्यास त्यांना फारसे कष्ट पडले नाहीत. त्यांनी शिकवण्या सुरू केल्या. दीडशे रुपयांपर्यंत मासिक आमदानी सहजपणे सुरू झाली. "लाथ मारू तिथे पाणी काढू" हा आत्मविश्वास आता बळावला. कलावंताच्या स्वभावाप्रमाणे हळूहळू आत्मविश्वासाचे उग्र अहंकारात रूपांतर झाले. जोडीला मूळचा मानीपणा होताच. आयुष्यात अडचणी आल्या, त्या या स्वभावदोषाच्या आडोशानेच आल्या. एकोणविसशे अडतीसमध्ये बिंदुमाधव पगडी यांच्या मध्यस्थीने हैद्राबादचे राजपुत्र मोअज्जम जहांबहादूर यांची ओळख झाली. बुवांच्या तबलावादनावर लुब्ध होऊन युवराजांनी त्यांना राजाश्रय दिला. प्रतिष्ठा वाढली. विविध वाटांनी पैसा हाती येऊ लागला. असे चैनीत आठ महिने गेले. पुढे त्यांच्या मानी स्वभावाला आश्रिताची लाचारी न मानवल्यामुळे युवराजांशी भांडून बुवांनी पैसा व प्रतिष्ठेवर पाणी सोडले. पुन्हा एकदा कफल्लक अवस्थेत ते राजूर--माणिकगडला बाबुराव देशमुखांकडे आले.

एकोणचाळीसमध्ये नागपूरच्या तात्याजी वझलवारांच्या पुढाकाराने इथेच त्यांचे लग्न झाले. एकोणचाळीस ते बेचाळीसपर्यंत ते सहकुटुंब हैद्राबादला

होते. चरितार्थापुरत्या शिकवण्या करून उरल्या वेळात त्यांनी तबल्याची साधना केली. हजारो नवे बोल तयार केले, लिहून काढले, त्यातील सातहजार वेचक बोल वेगळे काढून त्याचे पुस्तक प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला. पूर्वी पुण्याला वारकरी संप्रदायातील अभंग, शास्त्रीय संगीतात बसवण्याचा त्यांनी असाच प्रयत्न केला होता. त्यापैकी सुमारे तीनशे सांप्रदायिक अभंग त्यांनी विविध सत्तर रागांत बसवून त्यांचे विस्तृत नोटेशन व साथीसाठी तबल्याचे अनेकविध बोल तयार केले होते. त्यांचे हस्तलिखित, रुक्मिणी पांडुरंग विद्यालयाचे दिवाळे निघाल्यानंतर एका अरसिकाने रद्दी म्हणून विकून टाकले. इतके दिवसांचे सर्व परिश्रम पाण्यात गेले. सात हजार बोलांचा हा संग्रहही रझाकारांच्या धामधुमीत बिरकुरला एका मित्राकडून गहाळ झाला. तालशास्त्रावरील ग्रंथ व वारकरी संप्रदायाला शास्त्रीय संगीताचे अधिष्ठान देणारे सशास्त्र विवेचन अशा प्रकारे प्रकाशनापूर्वीच काळाच्या रोषाला बळी पडले.

वेचाळीसमध्ये संजीवनपेठच्या राजेसाहेबांनी त्यांना आश्रय दिला. या स्थैर्याचा उपयोग व्यासंग व ग्रंथलेखनासाठी करण्याचे मनात असतानाच राजेसाहेबांच्या अनुपस्थितीत खाजगी कारभाऱ्यांच्या आगाऊपणाचे निमित्त होऊन बुवांनी संतापाने संजीवनपेठलाही रामराम ठोकला व आपल्या मुला-बाळांनिशी निष्कांचन अवस्थेत पुन्हा एकदा अंधारात उडी घेतली. सुखदु:खाचे असे अनेक सोहळे बुवांनी पाहिले व साहिले. शिकवण्या, कार्यक्रम, यांच्या आधारावर दिवस रेटण्याचा प्रयत्न केला. नागपूरला आध्यात्मिक साधना करण्यात पाच वर्षे घालवली. लागोपाठ उपासमार काय असते, याचाही कुरतडणारा अनुभव घेतला. पुढे ते नांदेडला आले.

त्यांच्या चेहऱ्यावर या खाचखळग्यांची खूण नव्हती. शरीरावर ओरखडा नव्हता. हातातले कसब व डोक्यातील धुंदी तीच होती. वागण्यातले स्वत:-बद्दलचे भान कायम होते. सुखाचे शिखर व दु:खाचे डोंगर पाहून झाले होते. त्यामुळे आता कशाबद्दलच हर्षखेद नव्हते. त्यांच्याबरोबर त्यांच्या बायको मुलांचीही फरफट झाली. याचेही त्यांना वैषम्य नव्हते. अर्धपोटी अवस्थेतही त्यांनी लाचारी कधी स्वीकारली नाही. दीनवाणेपणा त्यांना शिवला नाही व ओठावरचे हास्य विरले नाही. अशा परिस्थितीत तुमच्याकडे ते हक्काने व आपुलकीने जेवतील. स्वत:च्या घरी अगत्याने बोलावतील. प्रसंगी शिधासामग्रीची वर्गणी करून तुम्हालाच चुलीवर बसवतील, आणि तुमच्या पाकसिद्धीला दाद देण्यासाठी आपल्याबरोबर अजून दोनचार मित्रांना बोलावतील. शिवाय या सर्व खटाटोपाचे जगाजवळ हसत हसत कौतुक करतील. कसलीही खंत नाही, ओशाळेपणा नाही. जीवनाच्या सर्व इष्टानिष्ट रूपांचा आकंठ आस्वाद घेण्याची उत्सुकता त्यांच्या सर्व हालचालीतून जाणवत राहील.

बुवांनी सुरांवर प्रेम केले, तालांवर प्रेम केले. पेटी, तबला, जलतरंग यामध्ये प्रावीण्य व लौकिक संपादन केला. आवाज अनुकूल नसताना गाण्याची आराधना केली व त्यातही मातबरांना चकित करील असे नैपुण्य प्रगट केले. प्रपंचात तेवढा त्यांचा सूर लागला नाही व तालही सांभाळता आला नाही. पण न लागलेल्या सुरांवर व हरवलेल्या तालांवरही त्यांनी प्रेमच केले. त्यांचे संगीताचे जीवन अशा यशापयशाने भरलेले होते. पण जीवनाचे संगीत बाकी आनंदाच्याच आलापीत अखंड रंगलेले होते.

या आजन्म रंगलेल्या मैफिलीची भैरवी ऐकायला मी नव्हतो, ही खंत मला नेहमी बेसूर वाटत आलेली आहे.

■ ■

# भाऊकाका

आमच्या लहानपणी भाऊकाका म्हणजे माळवेसपुऱ्याचे नवाब होते. एकूणच एलिचपूरच्या देशपांडे घराण्याभोवती नवाबीचे वलय होतेच. मोठमोठे वाडे, जमीनजुमला व सुखासीन राहणी...त्यामुळे सर्व श्रीमंत देशपांड्यांबद्दल उर्वरित समाजामध्ये एक दबदब्याचे वातावरण होते. त्यांच्या घरात सर्व-सामान्यांना प्रवेश नसे. अंतःपुरातील प्रवेशासाठी तर पूर्वजन्मीचे संचितच लागे. त्यामुळे अशा घरांमध्ये प्रवेश व वावर असणाऱ्या गावातील भाग्यवंतांनाही आपोआपच इतरांबद्दल तुच्छता वाटे. या लोकांशी आपला असलेला घरोबा हे त्यांच्याही दृष्टीने एक प्रदर्शनीय भूषण ठरे. आपआपल्या वाड्याबाहेर अशांचे दर्शन क्वचितच होई. झालेच तर ते त्यांच्या टांगा किंवा दमणी अशा वाहनातूनच होत असे. एखाद्याजवळ असे स्वतःचे वाहन असणे, हेही त्या काळात श्रीमंतीचे लक्षण मानले जात होते. स्वतःच्या वास्तूतला त्यांचा वावर तर एखाद्या संस्थानिकासारखा असे. या संस्थानिकांच्या आवडीनिवडी, सवयी व लहरी याबद्दलच्या आख्यायिका अधूनमधून वाड्याबाहेर झिरपत. सामान्यपणे त्यांच्यापासून दूर राहण्याची आणि दिसल्यावर त्यांच्याशी अदबीने वागण्याची लोकांना आपोआपच सवय पडलेली असे.

भाऊकाका याला अपवाद होते. भाऊकाकांबद्दल दरारा निश्चित होता. ऐहिक मोठेपणाचे वलयही होते. आदब होती. पण दूरत्वाची भावना नव्हती. एक देवघर व सोवळेओवळे सोडले, तर त्यांच्या घरात सर्वांना मुक्त प्रवेश असे. अचलपूरच्या घरंदाज देशमुख, देशपांड्यांमध्ये भाऊकाका हा त्या काळचा एक लोकाभिमुख संस्थानिक होता. भाऊकाकांना माणसाच्या घोळक्यात राहणे आवडे. या लोकांशी भाऊकाका फार मोकळ्या मनाने वागत. लोकांना मात्र त्यांच्याशी तेवढ्या मोकळेपणाने वागणे जमत नसे. भाऊकाकांना जे विविध

शौक होते, त्यात माणसांच्या घोळक्यांचा शौक हा प्रमुख होता. त्यामुळे घोळका दिसेल त्याठिकाणी भाऊकाका बिनदिक्कतपणे जात किंवा त्यांच्याभोवती घोळका आपोआप जमे. त्यामुळे भाऊकाकांचे दिवाणखान्यातले पानाचे तबक नेहमी आल्या-गेल्यांच्या सेवेला सज्ज असे. पानदान हे तात्कालिक वऱ्हाडाचे किमान आतिथ्य होते. चहा प्रसंगविशेषी होई, किंवा व्यक्तिविशेषांसाठी होई. बैठकीमध्ये अखंड बोलण्याचे, थट्टामस्करी करण्याचे, दुसऱ्यांना चिडवण्याचे भाऊकाकांना व्यसन होते. तोंडातली पानाची पिंक थुंकण्यापुरते तेवढे ते बाहेर येत. याखेरीज त्यांना पत्ते खेळण्याची आवड होती. पहावे तेव्हा त्यांच्या बैठकीत बिझिक किंवा ब्रिजचा डाव मांडलेला असे. आम्हा मुलांना अशावेळी तिथून जाण्याचा धाक वाटे. भाऊकाकांना पतंगाचाही शौक होता. हिवाळ्यात मोठमोठे पतंग गच्चीवरून उडवायचे, दुसऱ्या पतंगाची काटा-काटी करायची, ही त्यांना आवड होती. त्यासाठी ते स्वत: लक्ष घालून मांजा तयार करून घेत. भाऊकाकांच्या त्या पतंगाच्या शौकात आमचा सगळा मोहल्ला सहभागी होत असे. त्यासाठी तो पतंग भाऊकाकांचा राहतच नसे. सगळ्या मोहल्ल्याचा होत असे. त्या पतंगाच्या अभिमानापोटी भांडणे ओढवून घेणे ओघाने आलेच. तीही घरच्यासारखी करण्याची मोहल्ल्याची हौस असे. आपल्या मांज्यामुळे दुसऱ्याचा पतंग कापला गेला तर जणू आपणच पराक्रम केल्याचा उन्माद मोहल्ल्याला चढत असे. क्वचित आमचा पतंग कापला गेला तर त्याचा अपमान दोन-तीन दिवस तरी आमच्या मनात धुमसत असे.

भाऊकाकांना कबुतरांचाही शौक होता. ती पाळणे, सकाळ, सायंकाळी उडविणे, आ-आ करून बोलावणे, तसेच पोराबाळांमध्ये खेळणेही त्यांना आवडे. त्यांच्याबरोबर तेही मूल होत. आखाडे व कुस्त्या यांचाही त्यांना शौक होता. कुस्त्यांच्या दंगली भरविणे, पहिलवानांना उत्तेजन देणे यामध्ये त्यांना आनंद वाटे. साप मारण्याचीही भाऊकाकांना आवड होती. कुणाच्या घरी साप निघाल्याचे कळले की काकांना चेव चढे. एक लहानशी कमची घेऊन ते तिथे जात, नि लपलेल्या सापाला हुडकून, बाहेर खेचून, साध्या कमचीने त्याला मारून टाकीत. तोपर्यंत हीऽऽ गर्दी तिथे जमलेली असे. त्यांच्यासमोर हा रोमहर्षक पराक्रम चालायचा. त्यानंतरच्या मैफलीत मग या अशाच इतर मर्दुमकीच्या गोष्टी निघायच्या.

मोहल्ल्यातील सर्व घरांवर, कुटुंबांवर भाऊकाकांचा रुबाब चाले. कोणत्याही कुटुंबातील अडचणी तर आपणहून सोडवण्याचा त्यांचा स्वभाव होता. कुटुंबप्रमुखापेक्षा आपला अधिक अधिकार ते वेळोवेळी गाजवीत असत. लोकही तो न कुरकुरता मान्य करीत असत. त्यामुळे कोणाच्या मुलाने काय करावे व

कुणाच्या सुनेने काय करू नये, हेही भाऊकाकाच ठरवीत व त्यानुसार वागवून घेत. कुणाच्या घरातील गुलाब वाढला, तर मालकाला न विचारताच भाऊ-काका घरून कात्री आणून तो कापून टाकीत. भाऊकाकांच्या अशा व्यवहारात ब्र काढण्याची कुणाची हिंमत नसे.

त्यांच्या घराबाहेर एक तक्तपोस होता. त्या तक्तपोसावर एक सतरंजी टाकलेली असे व एक भरलेले पानदान ठेवलेले असे. मोहल्ल्यातील म्हाताऱ्यांचा संध्याकाळचा रोजचा अड्डा तिथे जमे. पत्ते, गावगप्पा यामुळे बैठकीत विड्या-सारखी रंगत चढे. भाऊकाकांचा आवाज मोठा होता. मोहल्ल्यातल्या कुणालाही बोलवायचे झाले की ते त्यांच्या घरी जात नसत. निरोपही पाठवत नसत. बसल्या जागेवरूनच त्यांच्या नावाने मोठ्याने आरोळी ठोकत. त्यात नाव मोठ्याने, पण विलंबित लयीत उच्चारले जाई. भाऊकाकांची ही आरोळी हा त्यांच्या गावातील अस्तित्वाचा पुरावा असे. ती जर ऐकू आली नाही तर ते गावात नाहीत, असे समजायचे. गावाहून येतायेताच ते सगळ्यांच्या घरासमोरून त्यांच्या नावाने आरोळ्या ठोकतच घरी जायचे. म्हणजे घरी गेल्या-गेल्याच, हातपाय धुणे होत नाही तोवर बैठक हजर.

भाऊकाकांचा वाडा खूप मोठा होता. एक आख्खा मोहल्ला मावेल, एवढा त्याचा व्याप होता. वाड्याला दोन मोठे दिंडी दरवाजे होते. आत विस्तीर्ण बगीचा होता. दिवाणखाने, माड्या, देवघर सगळे मोठेच होते. एकेकाळी खरोखरच हे देशपांडे अचलपुरात नबाबाच्या तोडीचे श्रीमंत मानले जात. दिल्लीच्या पंचम जॉर्ज बादशहाच्या बारा डिसेंबरच्या दरबाराला रावसाहेब देशपांडे यांना आमंत्रण होते. त्यांचाही गावातला रुबाब फार मोठा होता. बाहेर जायला निघाले तर त्यांच्या टांग्यासमोर दोन माणसे धावत जात.

त्यांच्या श्रीमंतीमुळेच देशमुखांशी त्यांचे सोयरसंबंध जुळले होते. त्यांच्या काळात घरात लक्ष्मी अक्षरशः लोळत होती. त्यामुळे पुष्कळदा केर काढताना मोलकरणींनाही तिचा लाभ होई. घरंदाज श्रीमंतीमुळे घरातले सगळेच लोक 'साहेब' होते. भाऊसाहेब, दादासाहेब, आबासाहेब सोडाच, पण आईसाहेब, माईसाहेबही होत्या. भाऊकाकांचे व्यक्तिमत्त्व धारदार, सावळे पण तेज होते. स्वभावही तेज होता. आवाज गडगडता होता. कुणाचे एवढेही ऐकून घेण्याची त्यांना सवय नव्हती.

हे वैभव कालवशात हळूहळू ओसरत गेले व वाडा ओस पडला. पुढे वाड्यातीलच एका लहान भागात भाऊकाका आपल्या कुटुंबासहित राहत. पूर्वीचे वैभव गेले, तरी रुबाब तोच होता. कान गेले तरी भोके कायम होती. आदर कमी झाला तरी, अजूनही काळ चालता होता. त्यामुळे घरातील सणवार,

कुळकुळाचार पहिल्याच गाजावाजासहित चालू होते. भाऊकाकांच्या घरी नरसिंहाचे कुलदैवत होते. हे दैवत फार कडक व सोवळे ! वैशाखात नरसिंहाचे नवरात्र सर्वच देशपांड्यांकडे जोरात व्हायचे. या नवरात्रासाठी स्वतंत्र देवघर व नरसिंहाची आरती खूप गर्दीत गर्जून होत असे. आरतीच्यावेळी कधी कधी कुणाच्या अंगात येत असे. त्यावेळी त्या माणसाचे सर्वांग धडाधडा कापत असे. देहभान नाहीसे झाल्यासारखे तो थयथया नाचत असे, आरोळ्या ठोकत असे. शेवटी वाकडे तिकडे अंग होऊन खाली निपचित पडत असे. अंगात येण्याच्या या प्रकाराचे आम्हाला फार भय वाटे. त्यामुळे एकूणच आरती, त्यावेळच्या धुपाचा भपकारा, गंभीर वातावरण, आरतीचे रुद्र स्वर, घंटीचा व झांझांचा नाद व एका तालात टाळ्यांचा आवाज या सर्वच बाबींकडे आम्ही उत्कंठेने पाहत असू. एकदा आरती करताना खुद्द भाऊकाकांनीच आरोळी ठोकली. झाले, एकदम हलकल्लोळ माजला. इकडे बाहेर अडकिणे भटजींच्या अंगात आले. ब्राह्मणांमध्ये एकदमच खळबळ माजली. पटापट ते सोवळ्यात झाले व त्या दोघांनाही त्यांनी आवरले.

नरसिंह जयंतीच्या दिवशी सर्व देशपांड्यांच्या घरात नरसिंह अवताराचा प्रसंग व्हायचा. कीर्तन चालू असतानाच एकजण राजा व्हायचा. राजाच्या वेशात तो हातात तलवार घेऊन बसायचा, त्यांच्या शेजारी प्रल्हाद बसला असे. राजा सारखा आतल्या आत घुमल्यासारखा दिसे. अधूनमधून तो मोठ्याने आरोळ्या ठोकायचा. त्यावेळी प्रल्हादाने तेवढ्यात मोठ्या आवाजात "नारायण" अशी ललकारी द्यायची असे. पण प्रल्हाद बहुतेक त्यांच्या आरोळ्यांमुळे भयभीत झाला असे. त्यामुळे त्याच्या नारायणाच्या आवाहनात आपोआप कापरेपणा येई. काही वेळाने समोरच्या कापडी स्तंभात नरसिंहाची स्वारी येई. स्तंभाचे दार पोकळ असे व त्यावर कागद चिकटविलेला असे. नऊ दिवस कडकडीत उपवास करून व बीजमंत्राची साधना करून अंगात संचार झालेल्या अवस्थेत नरसिंहाला ब्राह्मण सोवळ्यात घेऊन येत. स्तंभात "जयजय रामराज "चा घोष व घुंगरांचा आवाज ऐकू येऊ लागला की, नरसिंह आल्याचा सुगावा लागून राजा संतापाने आपल्या जागी उठून आरोळ्या ठोकीत तलवार फिरवीत स्तंभाकडे येऊ लागे. त्याला आवरून धरायला एक-दोन माणसे असत. आणि त्यामागून "नारायण" अशी मोठ्याने ललकारी देत प्रल्हाद. एव्हाना कीर्तनाकडे दुर्लक्ष होऊन सर्व लोक उभे राहून गर्दी करीत. आम्ही मुले त्या गर्दीत अंग चोरून धडधडत्या छातीने चवड्यावर उभे राहून हे दृश्य पाहत असू. राजाच्या तलवारीचा प्रहार स्तंभाच्या कागदी दारावर झाला की आतला नरसिंह प्रगट होत असे. त्या नरसिंहाच्या उग्र दर्शनापुढे गर्दीत दिसेनाशा झालेल्या राजाची कोणाला आठवणही राहत नसे. स्तंभाचा फाडून

आणलेला कागद किंवा त्याचा कपटा घराघरात श्रद्धेने जपून ठेवला जाई. घरात मूल घाबरले की तो कागद पाण्यात बुडवून ते पाणी त्या मुलाला प्यायला देत. त्या कागदाच्या प्रभावाने मुलाचे भय पळ काढते, अशी त्यावेळी आमची श्रद्धा होती.

या उत्सवात भाऊकाकांचा रुबाब प्रेक्षणीय असे. त्यांच्या दाट भुवया, करडी नजर व झुपकेदार मिशा असलेला चेहरा त्यावेळी सगळ्यांच्या आकर्षणाचा व आदराचा विषय असे. त्यावेळी वाड्यातला असा एक उत्सव लहानपणी पाहिल्याचे मलाही आठवते. वैभव ओसरल्यावर वाडा ओस पडला. पडझडही बरीच झाली. मग त्या उद्ध्वस्त व भग्न वास्तूमध्ये संध्याकाळनंतर जाण्याची कोणाची हिंमत होईना. अशा ओसाड वाड्याबद्दल नित्याच्या दंतकथांचा व अफवांचा वापर तिथे मुक्तपणे सुरू झाला. एकेकाळच्या वैभवाच्या खुणा जपत हे उद्ध्वस्त विश्व नंतर निराशेचे सुस्कारे सोडू लागले.

भाऊकाका हे त्या सरत्या ऐश्वर्याचे बळी होते. देशपांडेपणाचा खानदानी आळस, गलथान कारभार, बदलत्या काळाच्या हाका ऐकण्याबद्दलची उदासीनता व फिचरसारखे व्यसन या विविध वाटांनी त्यांचे पिढीजात वैभव वाहत गेले. एवढ्या मोठ्या वाड्याची भग्न मालमत्ता, थोडीशी जमीन, राहते घर, वतनदारीचा लवाजमा व एकेकाळच्या मोठेपणाचा दिखाऊ कैफ, या केविलवाण्या गोष्टी त्यानंतर शिल्लक राहिल्या. भाऊकाकांचे बाल्य आणि तारुण्य हे वैभव सर्वांगाने भोगण्यात गेले. मध्यमवयामध्ये लक्ष्मीने पाय काढता घ्यायला सुरुवात केली. या वाड्याला अंगठा दाखवून ती निघून गेली. अतीताच्या आढ्यतेत मान खुपसून पडलेल्या घरंदाजांना त्याची दखल घ्यावीशी वाटली नाही.

मी पाहिलेला काळ हा भाऊकाकांचा ओसरता आणि उतरता काळ होता. बदलत्या काळाने भाऊकाकांच्या मनोवृत्तीवर फारसा परिणाम केला नाही. ताठा तोच होता. पळत्या भूतकाळाला जबरदस्तीने धरून ठेवण्याचा अट्टाहास तोच होता. आवडी त्याच होत्या व आवही तोच. काही दिवस पूर्वलौकिकाने तारून नेले. काही दिवस उपकृतांनी निभावून नेले. त्यामुळे दिनचर्येत फारसा फरक पडण्याचे कारण उरले नाही. पतंगांचा व कबुतरांचा शौक, पत्त्याचा डाव, पानाचे तबक व चाहत्यांचा गराडा हे सर्व अव्याहतपणे चालू राहिले. त्यामुळे आरंभी गेलेल्या वैभवाचा सुगावा बाहेरच्या जगाला फारसा लागला नाही. तो लागू नये असे प्रयत्नही असतीलच. आतून पोखरलेला डोलाराही ताठ दिसण्याचा प्रयत्न करतो, तसे चालत होते. याचे वैषम्य वाटू देऊ नये, घराण्याच्या अस्मितेवर ओरखडा येऊ नये, लोभस आभासांच्या सृष्टीतून बाहेर येण्याची पाळी येऊ नये, अशी तजवीज ऋणाइतांकडून चालू होतीच.

त्यामुळे त्यानंतरचे काही दिवस आत्मवंचनेचे व त्यातून मिळणाऱ्या फसव्या व वांझ समाधानाचे गेले.

पण प्रत्यक्ष ओसाड वास्तव भगदाडासारखे समोर आले, तरी भाऊकाका ढासळले नाहीत, डगमगले सुद्धा नाहीत. पूर्वीच्या सवयीत, आवडीनिवडीत व वृत्तीतही बदल करण्याची आवश्यकता त्यांना फारशी वाटली नाही. त्या वास्तवाचा त्यांनी निःशब्द सोशिकपणे स्वीकार केला व त्याच्या अध्यक्षतेखालीच पूर्वीइतक्याच मस्तीने जगणे सुरू ठेवले. ज्या बेदरकारपणे सुखाचे डोहाळे पूर्ण केले, त्याच निश्चिंतपणे दारिद्र्याचे सोहळेही मनापासून भोगले. दोन्ही पर्वांत मनःपूर्वकता तीच होती. पडत्या काळातही एकटयाने खाणे किंवा जेवणे भाऊकाकांना जमले नाही. भाऊकाकांचे खाणे चांगले होते. खमंग, चमचमीत व फोडणीदार खाद्यपदार्थ त्यांना आवडायचे. बदललेल्या काळात भाजी–भाकरी सुद्धा त्यांनी ऐटीने खिलवली. खायला किंवा जेवायला कुणाला आग्रह करून आणताना, त्याबाबत घरात काही सोय आहे किंवा नाही याचा विचार त्यांना कधी करावासाच वाटला नाही. घरातील माउलीने ते कधी जाणवूही दिले नाही. कुणाच्याही चुका उगाळल्या नाहीत. कुणाच्या डोक्यावर खापर फोडले नाही. कोंड्याचा मांडा करून आला दिवस समाधानाने साजरा केला. गतवैभवाच्या शिळ्या डाळ–भाजीला हिंगाची खमंग फोडणी दिली आणि ते विषण्ण स्थित्यंतर सुद्धा लज्जतदार बनवले. त्या माउलीची सोशिकता मोठी, समजदारी मोठी व क्षमाशीलताही मोठी. तिने कोणत्याही परिस्थितीत घरचे उणे बाहेर दिसू दिले नाही. कुणासमोर ओशाळेपणा पत्करला नाही. घराण्याची इज्जत रस्त्यावर अंथरली नाही. भाऊकाकांच्याही नंतरच्या वागण्यात, त्यांच्याही नंतरच्या परावलंबी जिण्यात कुठेही लाचारी वा ओशाळी वृत्ती नव्हती. मोहल्ल्याच्या प्रेमावर ते सहकुटुंब संतोषाने जगत होते. सकाळपासून रात्रीपर्यंत दिवसाच्या प्रत्येक कार्यक्रमात आपला सराईत कुटुंबवत्सलपणा, सढळपणा व उदारपणा भाऊकाका सांभाळत होते व तोही शेजाऱ्यांच्या विश्वासावर, भूतकाळात मोहल्ल्याला त्यांच्याकडून न मागता पोटभर मिळाले–त्याबद्दलच्या कृतज्ञतेच्या सनईने भाऊकाकांची पहाट उजाडत असे व आपुलकीच्या अंगाईने रात्र निभत असे. पडत्या काळातही भाऊकाकांनी या शेजाऱ्यांना व स्नेह्यांना सोडले नाही. बिट्टया, खिचडी, सुदामपोहे, एवढेच काय मंगळवारच्या बाजारातून आणलेले साधे टरबूजसुद्धा भाऊकाकांनी एकटयाने कधी खाल्ले नाही. स्वतःच्या दारातून आरोळ्या मारून त्यासाठी सगळा मोहल्ला गोळा केला. प्रत्येकाला खायला देऊन शिवाय न आलेल्या त्यांच्या बायका–मुलांकरिता घरी न्यायलाही दिले. एक साधे टरबूज ते काय, पण सगळ्यांच्या घोळक्यात ते समारंभपूर्वक कापणे, त्याच्या फोडी करणे, त्या फोडी

वाटणे व शेवटी आपल्या वाटयाला येईल अशी एखादी फोड खाणे, त्यातल्या प्रत्येक कृतीत संतोष होता, ही साधी गोष्टसुद्धा ते पूर्वीइतक्याच औदार्याच्या आवेशात करायचे. चढता–पडता असे दोन्ही काळ भाऊकाकांनी मनापासून व आकंठ भोगले. चढत्या काळातील गुर्मी पडत्या काळातही कायम ठेवली. पुढे भाऊकाकांना रोजच्या खर्चासाठीही पैसे लागायचे. रोजच्या उपयोगासाठी सामानही लागायचे. पण ते तुमच्याकडे मागण्यात दीनवाणेपणा नव्हता. हक्काचा भाव होता व आत्मविश्वास होता. सतरंज्या फाटल्या, गाद्याच खराब झाल्या, चादरी विटल्या, तरी त्यांच्या बैठकीत दैन्य नव्हते. आहे तेच न संकोचता पण नीटनेटके मांडलेले असे. त्यांच्या मोठ्या दाराशी वाळयाची ताटी खूप जुनी होती. ठिकठिकाणी तिला भोके पडली होती. पण तात्पुरती डागडुजी करून भाऊकाका ती दरवर्षी उपयोगात आणीत असत. ती ओली ठेवण्यासाठी बसल्या जागेवरूनच लहान लोटीने तिच्यावर पाणी फेकीत. त्याने त्य ाजुनाट ताटीतूनही खरोखरच सुगंधी झुळूक येई. ओलावा मिळाल्याबरोबर आहे तेवढा सुगंध देण्याची आपली ताकद त्या जुनाट ताटीनेही जपून ठेवली होती. भाऊ-काकांसारखीच.

आज अचलपुरात भाऊकाकांचा वाडा पूर्णपणे जमीनदोस्त झाला आहे. तो विकत घेणाऱ्यांनी तिथे आता शेती केली आहे. अक्षरशः घरादारावर नांगर फिरला आहे. एकेकाळी त्या जागी एक गाजते, गरजते वैभव नांदून गेले, यावर आता कोणाचा विश्वाससुद्धा बसणार नाही. वऱ्हाडातील असे अनेक नांदते वाडे आता ढासळले आहेत. एकेकाळच्या आपल्या वैभवाबद्दल मूकपणे निःश्वास टाकत आहेत. त्या वाडयातील लक्ष्मी, सरस्वती, कुलदेवता, सौंदर्य, संस्कृती, कर्तृत्व व प्रतिष्ठा हे सर्व वाडयाबरोबरच लयाला गेले. उद्ध्वस्त अवशेषांमधील या आठवणींची स्पंदने आता सहृदयांच्या डोळयांना जाणवतील. त्या असंख्य भर्जरी आठवणींच्या मिरवणुकीमध्ये एक पाऊल अशाच एखाद्या भाऊकाकांचे असेल, सुख–दुःखात जे समचित्त होते व वैभवाइतकेच ज्यांनी विनाशावरही प्रेम केले. ऐहिक ऐश्वर्य ओसरले तरी अंतःकरणाची श्रीमंती काळवंडू दिली नाही. पोळत गेले तरी पीळ कायम ठेवला. म्हणूनच भैरवाकडील चिताभस्मावर लोळत कुबेराला वाकुल्या दाखवणेही त्यांनी सोडले नाही.

■ ■

# वसंत शां. वैद्य

गेल्या जुलैमध्ये वैद्य गेल्याची बातमी वृत्तपत्रात वाचली. दुसऱ्या दिवशी आलेल्या पत्राने तिच्यावर शिक्कामोर्तबही केले. बातमी वाचून धक्काच बसला. नुकतीच त्यांनी आयुष्याची साठ वर्षे पूर्ण केली होती. त्याअगोदर अर्धांगवायूचा आघातही त्यांनी झेलला होता. दोन वर्षांपूर्वी बांदोडकर व्याख्यानमाला गुंफण्यासाठी गोव्यात गेलो. त्या वेळी झालेली त्यांची शेवटचीच भेट. तत्पूर्वी त्यांची अधूनमधून पत्रे यायची. त्यांच्याबद्दलच्या वार्ताही कळायच्या, ते व्यसनाच्या आधीन झाले आहेत, निवृत्त झाले आहेत, वगैरे दंतकथा माझ्यापर्यंत येऊन पोहोचत होत्या. त्यामुळे गोव्याला जाताना त्यांना भेटण्याची उत्सुकता होतीच. व्याख्यानाला वैद्य आले होते. गेल्या गेल्या मी त्यांना भेटलो, त्यांच्याजवळ बसलो. त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. पुन्हा सवडीने भेटण्याचे ठरवून मग व्यासपीठावर गेलो.

भेटीत वैद्य मला विकलांग झालेले दिसले. त्यांचे चालणेबोलणे संथ झाले होते. वैद्यांना मी पहिल्यांदा ऐन उमेदीत पाहिले होते. त्याच्या तुलनेत आताचे वैद्य मला पाहवत नव्हते. वैद्य माझ्या हॉटेलमधल्या मुक्कामी मला सपत्नीक भेटायला आले. गप्पाटप्पा झाल्या. त्यांनी त्यांच्या आगामी आत्मचरित्राचे हस्तलिखित बरोबर आणले होते, तेही मी चाळून पाहिले. व्याख्यानाची वेळ झाली, तेव्हा उठताना वैद्य मला म्हणाले, " माझी एक रिक्वेस्ट आहे. आपण एकत्र फोटो काढून घेऊ." का कोण जाणे, त्यांची ही साधी विनंती ऐकून मला एकदम गलबलून आले. मी चटकन होकार दिला व लगोलग आम्ही स्टुडिओत गेलो. वैद्यांनी तिथे सांगूनच ठेवले होते. आम्ही फोटो काढला. तो पुढे वैद्यांनी माझ्या वणीच्या पत्त्यावर पाठवलाही.

या वेळी वैद्यांनी मला घरी बोलावले नव्हते. तीन-साडेतीन दिवस मुक्काम असून मला जाताही आले नाही. असे यापूर्वी कधी घडले नव्हते. वैद्य जिथेजिथे गेले तिथे तिथे त्यांच्या बोलावण्यावरून मी गेलो. दोनतीनदा त्यांच्या घरीच उतरलो. नाहीतर निदान जेवायला किंवा चहाला तरी गेलो. नगरला जिल्हा ग्रंथालयात वैद्यांनीच माझी व्याख्याने आयोजित केली होती. गोव्यालाही पहिल्या आमंत्रणामागे वैद्यांचेच प्रयत्न होते. त्यांच्या पुण्याच्या नारायणपेठेतील बिऱ्हाडी तर मी कित्येकदा गेलो असेन. पुण्याला त्यांच्या माझ्या भेटी बरेचदा व्हायच्या. अधूनमधून कुठल्या तरी संमेलनातही भेट व्हायची. सभासंमेलने, नाटके, सांस्कृतिक कार्यक्रम यांची वैद्यांना आवड होती. त्यांचा स्वभावही मैफिलबाज होता. कलावंतांना, साहित्यिकांना, नामवंतांना भेटण्याचीही त्यांना ओढ होती. अशांच्या ओळखी करून घेणे, त्या वाढविणे, टिकविणे याबद्दल ते आवर्जून काळजी घेत. ते त्यांचे एक व्यसनच होते.

त्यांची माझी पहिली भेट मी नांदेडला असताना केव्हातरी अठ्ठावन एकोणसाठमध्ये झाली. हैदराबादहून ते नांदेडला बदलून आले होते. आल्या आल्या काही दिवसांतच त्यांनी कुरुंदकरांची अन् माझी ओळख करून घेतली. मला वाटते, कवी गिरिवालला घेऊन ते आले होते. त्यांच्या अंगावर तो निळा कोट होता. उजव्या खांद्यावर तो उसवला असावा. त्यावरची पांढऱ्या दोऱ्याची शिवण उठून दिसत होती. पहिल्या भेटीत वैद्यांनी आपली कविता म्हणून दाखवली. हैदराबादच्या साहित्य व नाट्य क्षेत्रातल्या खूप आठवणी सांगितल्या. या भेटीनंतर वैद्य नांदेडच्या आमच्या बैठकीतले होऊन गेले. त्यातूनच नांदेडचे एक अनौपचारिक कविमंडळ तयार झाले. त्याच्या पाळीने, एकेकाच्या घरी बैठकी होत. चहाफराळाबरोबर नव्या कविता परस्परांना ऐकवल्या जात. त्यातूनच नांदेडचे परिषदसदृश पहिले कविसंमेलन आकाराला आले. संमेलन दोन दिवसांचे होते. कविवर्य दे. ल. महाजन स्वागताध्यक्ष, काणेकर उद्घाटक व कांत अध्यक्ष होते. यशवंतांचा "महाराष्ट्रकवी" झाल्याबद्दल याच संमेलनात भव्य सत्कार झाला. संमेलनाला मराठवाड्यातले लहान मोठे बहुतेक सर्व कवी आवर्जून उपस्थित राहिले. उद्घाटन, अध्यक्षीय भाषण, परिसंवाद, सत्कार व काव्यदर्शन वगैरे संमेलनातील सर्व सोपस्कार होते. निवास-भोजन, कार्यक्रमादी सर्व व्यवस्था नेहमीप्रमाणेच नेटकी होती. संमेलन सर्वार्थाने संस्मरणीय झाले. या संमेलनाने मराठवाड्यातल्या तमाम कवींचा शोध लागला. संमेलनाची स्मृती म्हणून उरलेल्या पैशातून मराठवाड्यातील कवींचा प्रातिनिधिक काव्यसंग्रहही निघाला. या सर्व उपक्रमामागे महत्तम कल्पकता वैद्यांची होती. नवनवे लोक जोडणे, ते एकत्र ठेवणे, वाङ्मय, कला याव्यतिरिक्तही त्यांच्यामध्ये नित्यासाठी आपुलकीचे अनुबंध निर्माण करणे या कामांमध्ये वैद्य नेहमी व्यस्त

असत. त्या काळात नांदेडमध्ये अशा भेटीसाठी बैठकी, मैफली, कविसंमेलने वरचेवर होत असत. आमच्या या बैठकीमध्ये कवींव्यतिरिक्त बबन वडनेरकर, बाबूराव लोखंडे, दादा पेंडसे असे इतर मित्रही आनंदाने सहभागी होत असत. आंबेकर अर्थातच या सर्व उपक्रमांच्या केंद्रस्थानी असत. पुढे पुढे या मैफलींच्या संसर्गाने दादा पेंडसेही कविता करू लागले व वैद्यांच्या प्रयत्नामुळे बबननेही नाटकात काम केले.

साहित्याबरोबरच नाटक हे वैद्यांचे दुसरे वेड होते. नाटक पाहणे, बसवणे, त्यात भाग घेणे, नाट्यचर्चा घडवून आणणे याचग्राही खटपटी ते सतत करत असत. हैद्राबादला असे वातावरण त्यांना मनसोक्त मिळाले. चेन्नापट्टण, सुशीलाबाई फाटक, कालिदास मोहोळकर यांच्या नाट्यविषयक आठवणी ते नेहमी काढत असत. तारऑफिसमध्ये नोकरी करून साहित्य व नाट्य-चळवळींमध्ये इतका विरघळून गेलेला दुसरा माणूस मी तोपर्यंत पाहिला नव्हता. संमेलने आयोजित करण्याची व त्यात मरमर कष्ट करण्याचीही वैद्यांना सवय होती. पंढरपूरच्या साहित्यसंमेलनाच्या वेळी संमेलनाच्या कामासाठी महिनाभर रजा काढून वैद्य पंढरपूरला जाऊन राहिले होते. पंढरपूर ही त्यांची सासुरवाडी. त्यांची पहिली बायको त्या वेळी तिथे आजारी होती. वैद्यांचा वेळ अर्थातच बायकोच्या शुश्रूषेपेक्षा संमेलनाच्या कामात अधिक जायचा. दुर्दैव असे की, संमेलनाच्या ऐन दिवशी तिचे निधन झाले. वैद्यांची लोकप्रियता अशी की संमेलनापूर्वी साहित्यदिंडीसाठी जमलेले डॉ. पेंडसे, काका गाडगीळ यांसारखे सर्व प्रमुख साहित्यिक त्यांच्या पत्नीच्या अंत्ययात्रेसाठी येऊन गेले. वैद्यांचे साहित्यप्रेम असे की पत्नीची अंत्यक्रिया आटोपल्यावर वैद्य संमेलनात हजर झाले. एवढेच नव्हे तर कविसंमेलनात त्यांनी भागही घेतला.

वैद्यांनी कथा, कविता, कादंबरी असे विविध स्वरूपाचे लेखन केले. त्यांचा पहिला काव्यसंग्रह नांदेडमध्येच आंबेकरांनी प्रकाशित केला. त्याला आचार्य अत्र्यांचे आशीर्वादरूप प्रास्ताविक लाभले होते. वैद्य अगदी सहजतेने लिहीत. कोणताही वाङ्मयप्रकार असो, तो हाताळताना आयास पडताहेत असे कधी जाणवत नसे. ते अगदी लीलया हाताशी असलेले लेखन पूर्ण करीत. लेखणी कागदाला लावली की भरभर लिहीत जात. त्यांच्या लेखनातही सहजता होती. एखादी चमकदार कल्पना लक्षात आली की अविलंब त्यांची कविता तयार होई. तार–ऑफिसमध्ये बसल्याबसल्या पाठकोऱ्या तावांवर त्यांचे लिहिणे चालू असे. लिहिल्यानंतर लगेच ते कोणाला तरी वाचून दाखवत. ऐकणाऱ्याला वाङ्मयाचे अंग असायलाच हवे, अशी त्यांची अट नव्हती. ऐकण्याची तयारी असणे एवढे प्रोत्साहन त्यांना पुरेसे होते. वाङ्मयाची आवड असणाऱ्यांपुढे ते लेखन पुढे जाईच. वैद्य हक्काने आपला प्रतिसाद वसूल करून घेत.

वैद्यांचे व्यक्तिमत्त्व खुशदिल होते. त्यांना कधी चिंतेत कोणी पाहिले नाही. चिंता, दु:ख असलेच तर त्यांनाही ते आपल्या लेखनाचे विषय बनवून टाकीत व त्यांचे ओझे हलके करून घेत. बबनकडे जेव्हा पहिल्यांदा फोन आला, तेव्हा दिवसभर आम्ही दोघे फोन असणाऱ्यांकडे फोन करून ही आनंदवार्ता देत होतो. त्या रात्री अडीच वाजता ऐन झोपेत फोनची घंटा वाजली. दचकून उठून बबनने फोन घेतला. वैद्य बोलत होते. म्हणाले, "काही नाही. आत्ता कुठे अडीच वाजले. ड्यूटी संपवून आता घरी चाललो आहे. म्हटलं सहज जाता-जाता तुम्हाला फोन करावा." इथे थोडा वेळ थांबून वैद्य पुढे म्हणाले, "काय, आता कसे वाटते फोन मिळाल्याबद्दल ?"

या स्वभावाने वैद्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांतले अनेक मित्र जोडले. सोलापूर, पंढरपूर, हैद्राबाद, नांदेड, नगर, पुणे, गोवा अशा विविध ठिकाणी नोकरीच्या निमित्ताने ते फिरले. जातील तेथे साहित्यिक व सांस्कृतिक चळवळीविषयी आपली सक्रिय आवड घेऊन गेले. त्या त्या ठिकाणच्या अशा वातावरणात त्यांनी नवा जीव ओतला. तार-ऑफिसमधल्या रूक्ष नोकरीच्या वैषम्याचे सावट आपल्या मनावर पडू दिले नाही. त्यांचे जीवनक्षेत्र साहित्य व नाट्य हेच होते. जीविकेचे क्षेत्र तेवढे तार-ऑफीस हे होते. कुरुंदकर व शेवाळकर हे त्यांचे दोन अतूट जिव्हाळे होते. जिथे जातील तिथे त्यांनी या दोघांना वाजवीत नेले व वाजवून आणले.

परवाचे गोव्याचे आमंत्रण महाराष्ट्र शासनाचे होते. त्यामागे बाकी वैद्यांचा हात नव्हता. या गोवाभेटीत वैद्य मला घरच्यासारखे भेटले नाहीत, पाहुण्यांसारखे भेटले. विकलांग झाले होते. निराशही झालेले दिसले. त्यामुळेच की काय त्यांनी या वेळी घरी बोलावले नाही. त्यांच्या एकषष्टीच्या निमित्ताने त्यांच्यावर लिहायचे ठरवले होते, ते झाले नाही. आणि आता वैद्य कायमचे निघून गेले. गेल्या काही वर्षांत असे अनेक संकल्प उपाशी ठेवून काही जीवा-भावाचे मित्र अर्ध्यातूनच सोडून गेले. त्यांत माडगूळकर-भाव्यांसारखे ज्येष्ठ आहेत, वसंतराव पांडे व कुरुंदकरांसारखे समवयस्क आहेत. यांपैकी कुणीच इतक्या लवकर, अशा वेळी, न सांगतासवरता जायला नको होते. आता मागोमाग आमचे मित्र वसंत शां. वैद्य हेही पाहता पाहता निघून गेले. जाणारे जातात, मुक्त होतात, राहिलेल्यांचे शोकाचे बंधन बाकी अधिकच आवळले जाते !

■ ■

# बालशंकर देशपांडे

बालशंकर देशपांडे हे नाव पहिल्यांदा डोळ्यात भरले त्याला बरीच वर्षे झाली. त्यावेळी मी विद्यार्थिदशेत असेन. बालशंकर देशपांडे यांचे ललित निबंध त्यावेळी वाचण्यात आले. चटकन मनात जाऊन ठसली ती त्यांची शैली. त्या शैलीवर त्यावेळी वि. स. खांडेकरांचा गडद प्रभाव होता. खांडेकरी पद्धतीची अलंकारप्रचुर, सुभाषितबहुल व विषयांतर प्रिय अशी ती शैली होती. माजघरातील शिळोप्याच्या गप्पांसारखे. त्या विवेचनाला एक अनौपचारिक व घरगुती असे रूप होते. त्यांची त्या वेळची भाषा ही कधी सरळ साधी अशी वाटलीच नाही. नटण्यामुरडण्याची त्यावेळी तिला हौस होती. येताना ती लचकत मुरडत यायची. पाठीवरचा शेपटा उडवीत अख्ख्या परिसराला घायाळ करणारे कटाक्ष आजूबाजूला उधळीत अभिप्रेत कामाखेरीज तुलनेने गौण कामांवर लक्ष खिळवीत आपले अस्तित्व हाच आकर्षणाचा विषय बनेल, अशी जाणीवपूर्वक काळजी घेत ती अवतरायची. तिचे येणे व वावरणे लोभावून टाकणारे असे. त्या शैलीने त्या वाढाळू वयात इतरांबरोबरच मलाही जायबंदी केले. खांडेकरांचे जीवनभान, त्यांचा ध्येयवाद, त्यांची समर्पणशीलता व एकंदर त्यांचे सत्प्रवृत्त आयुष्य हे विशेष आत्मसात करण्याची उत्सुकता सामान्यपणे अभावानेच आढळली. खरे म्हणजे त्यांची शैलीसुद्धा अनुकरणसुलभ नव्हतीच. तथापि ज्या थोड्या लोकांनी ती बेमालूम व हातोहात आत्मसात केली त्यात बालशंकरांचा क्रम बराच वरच होता.

अशा गुणांमुळे त्यावेळी विदर्भातील दोन लेखकांनी पाहता पाहता चांगलीच लोकप्रियता मिळविली होती. याबाबतची एक गम्मत मराठी वाङ्मयात सर्वज्ञात आहे. विदर्भातील आवडीचे कादंबरीकार श्री. शरद्‌चंद्र टोंगो हेही त्यावेळी ना. सी. फडके यांची सहजसुंदर शैली सहीसही आत्मसात केल्याबद्दल

प्रसिद्ध होते. या शैलीमुळेच "शोभना देशपांडे" या टोपण नावाने त्यांची जी कथा प्रसिद्ध झाली, तिने खुद्द फडक्यांनाच चकवले व मोहात पाडले. लेखन निनावी, प्रसिद्ध केले तर ते खांडेकर किंवा फडके यांचेच असावे, अशी समजूत होण्याइतपत अभिन्नता या दोघांच्या शैलीत होती.

बालशंकर देशपांडे हे खांडेकरांच्या लेखनशैलीशी एकरूप झाले होते. याचे कारण खांडेकरांच्या वाङ्मयीन व्यक्तित्वावरच ते लुब्ध होते. विशेषतः खांडेकरांच्या जीवनदृष्टीने व साहित्यदृष्टीने त्यांना भुरळ घातली होती. तो पारतंत्र्याचा काळ असल्यामुळे देशभक्ती हे त्या काळातले एक महत्त्वाचे मूल्य होते. त्यामुळे जीवनासाठी कला या खांडेकरांच्या पक्षाला त्यावेळेला आपोआप समर्थन मिळत असे. बालशंकरांचे बव्हंशी ललितलेखन विषय व प्रतिपादन-पद्धती या दोन्ही दृष्टीने खांडेकरांच्या वळणावर गेलेले आहे. 'यमुनाजळी', 'श्रावणातील विजा' यांसारखे त्यांचे सुरुवातीचे संग्रह या प्रभावाचा पुरावा देतील. बालशंकरांचे काव्यलेखन हेही तसे खांडेकरकालीन लोकप्रिय कवितेच्या प्रभावा-खालीच आहे. अगदी उपहासिका लिहायच्या झाल्या तरी त्यांची कविता आजही छंदवृत्तांच्या मर्यादा सोडायला राजी नाही. एखाद्या जुन्या घरंदाज कुटुंबातील संस्कार व रीतिरिवाज कसोशीने सांभाळणाऱ्या कुलीन स्त्रीसारखी त्यांची कविता भारदस्त व मर्यादशील आहे.

बालशंकर देशपांडे यांनी हलक्या-फुलक्या रुचिर अशा ललित लेखना-बरोबरच गेल्या पाव शतकात समीक्षालेखनही केले आहे. "मराठीचे मानकरी", "ललित लेखनाचे तंत्र", "पाश्चात्यांचा प्रतिभाविलास", "असे हे पु. ल.", "महाभारताचे टीकाकार" यासारख्या ग्रंथांमध्ये त्यांच्या व्यासंगपूत विवेचनाचा प्रत्यय येतो. देशपांडे हे पिंडाने शिक्षक. छबिलदासमध्ये अध्यापन करण्यात त्यांनी आयुष्य घालविले. त्यामुळे आपल्याला समजलेला व आवडलेला एखादा नवीन विषय नव्यांना समजून सांगण्याच्या हौसेतून हे लेखन झालेले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करून आपला मुद्दा विद्यार्थ्यांच्या गळी उतरवण्याची हातोटी या लेखनात आढळते. या शिक्षकाची स्वतःची काही ठाम मते आहेत. दृढश्रद्धा आहेत. त्यांचा आग्रही पुरस्कार, त्यांच्या विवेचना-तून वेळोवेळी होत असतो. त्याबरोबरच त्यांच्या बहुविध व्यासंगाची, बहुश्रुत-पणाचीही प्रचीती त्यांच्या लेखनात येते. त्यांच्या प्रतिपादनाचे वजन वाढवले. प्रौढ भाषेमुळे व अलंकरणप्रियतेमुळे मुळात जड असणारे हे विषयही पौष्टिक व आस्वाद्य होऊन जातात.

देशपांडेंची माझी पहिली भेट १९५५-५६ च्या सुमारास भाऊसाहेब माडखोलकरांच्या कार्यालयात झाली. 'वसंत' मासिकातील 'मराठीचे मानकरी' या लेखमालेसाठी भाऊसाहेबांची मुलाखत घ्यायला ते आले होते.

तेव्हापासून त्यांच्या ऋजू स्वभावामुळे हा परिचय स्नेहभावाकडून भातृभावा-पर्यंत प्रवास करत आलेला आहे. त्यांच्या एका लघुनिबंधामध्ये दारव्हा मोटार-स्टॅन्डचा उल्लेख पाहिला, त्याच वेळी ते वऱ्हाडातील असावेत अशी अटकळ बांधली होती. ते उमरखेडचे असल्याचा पुढे शोध लागला व वडिलांकडून त्यांचे नातेही निघाले. नागपूरच्या आमच्या पहिल्या भेटीत या सर्व ऐकीव गोष्टींची उजळणी अर्थातच झाली. पुढे ते 'वसंत' मासिकाचे सहसंपादक झाले. नांदेड-हून मी त्यावेळी 'दीपकळी' नावाचे वार्षिक काढीत होतो. त्या निमित्ताने वसंत व त्याचे संपादक दत्तप्रसन्न काटदरे यांचेशी वरचेवर संबंध यायचा. बालशंकरांची तिथे भेट व्हायची. पुढे केव्हातरी काणेकरांच्यानंतर देशपांडे "साहित्यस्वप्न"चे संपादक झाले. आता तर वसंत मासिक हे त्यांच्या मालकीचेच झाले आहे.

मुंबईला गेलो की सामान्यपणे देशपांडेंची भेट होतेच. पण त्या महानगरामध्ये कामाच्या गर्दीत सापडलेल्या आपल्या माणसाला आपल्या घरी अगत्याने जेवा-यला बोलावण्याची त्यांची वऱ्हाडी सवय अजून सुटलेली नाही. सांताक्रूझवरच्या त्यांच्या एका खोलीच्या संसारात मी सहकुटुंब गेलो तेव्हा त्यांच्या आतिथ्याने भारावून गेलो होतो. त्या एकाच खोलीत त्यांचा सर्व संसार व एवढा अव्याहत लेखनप्रपंच गुण्यागोविंदाने एकत्र नांदताना पाहून मी चकितही झालो. वऱ्हा-डातल्या वाडा संस्कृतीचा ऐसपैस सराव असलेल्या या देशपांड्याने मुंबईतल्या या चिमुरड्या जागेतही सहकुटुंब सुख मानले हे दृश्यच सुखद व कौतुकास्पद होते. आता बोरिवलीला त्यांचा स्वतंत्र फ्लॅट आहे. मुलगी सुस्थळी पडलेली आहे. मुलगा "वसंत"ची व्यावहारिक बाजू सांभाळतो. त्यांचा संसार मार्गी लागला आहे. नातवाला खेळवण्याच्या या वयात अधू दृष्टीची पर्वा न करता मॅग्निफाईंग ग्लासच्या साहाय्याने देशपांडेंचे लेखनवाचन चालूच आहे. वऱ्हाडातले सुखासीन जीवन सोडून त्यांनी मुंबईचे धावपळीचे अर्धपोटी आयुष्य पत्करले, त्याला आज किती तरी वर्षे झाली. ऐहिक अनुकूलतेपेक्षा वाङ्मयाकडची त्यांची ओढ बलवत्तर होती. विस्तृत व बहुविध ग्रंथसंपदा, 'वसंतसारख्या' प्रतिष्ठाप्राप्त मासिकाचे संपादन, थोरामोठ्या कलावंत साहित्यिकांशी जिव्हा-ळ्याचे ऋणानुबंध ही कमाई देशपांड्यांच्या अल्पसंतुष्ट स्वभावाला अपेक्षेपेक्षाही मोठी वाटली तर त्यात नवल नाही. एखाद्या जिल्हा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही काही अशा दीर्घ तपश्चर्येची फलश्रुती म्हणता येणार नाही. त्यांची साहित्यसेवा उपेक्षित राहू नये, एवढ्यापुरती कृतज्ञतेची ती एक नम्र दाद तेवढी ठरेल.

■ ■

# अण्णासाहेब

अण्णासाहेब गेले, अन् नांदेडशी मला भावनिकदृष्टचा जोडून ठेवणारा अजून एक धागा तुटला. मी मराठवाडा सोडल्याला आता बावीस वर्षे झाली. या बावीस वर्षांमध्ये नांदेडला किंवा मराठवाड्यात कुठे ना कुठेतरी गेलो नाही असे एक वर्ष गेले नाही. कोणत्या ना कोणत्या निमित्ताने मराठवाड्याच्या आमंत्रणाचा मोह पडतोच. प्रत्येक वेळी जुने जिव्हाळ्याचे भेटतात. आर्तता तीच असते. अंतरामुळे पीळ अजून घट्ट झालेला असतो. गेल्या बावीस वर्षांत मराठवाड्यातील बहुतेक ओळखीच्या भावांनी आपली जुनी कात टाकली आहे. नवे रंगरूप धारण केले आहे. नवीन चेहरेही बरेच आयात झाले आहेत. या नव्या झगमगत्या कायाकल्पात माझ्यावर प्रेम करणारी जुनी मने शोधताना कित्येकदा गांगरून जायला होते. पण एकदा गवसले की तोच अथांग ओथंबलेपणा प्रययाला येतो. माझीये जातीचा भेटल्याचा आनंद होतो नि मन पुन्हा वीस वर्षांनी तरुण होते.

त्यातल्या काही प्रेमळांची भेट आता होणे नाही. महाजन, कानोले, राजेसाहेब, रंगनाथ बुवा, बाळाचार्य, आनंदीदासराव, देव, आर. डी. कुरुंदकर, एकनाथ महाराज—असा माझ्यावर आपल्या अकृत्रिम प्रेमाचा प्रकाश टाकणारा एकेक देवाचा दिवा विझत गेला. यज्ञेश्वरशास्त्री, शिरवाडकर, डोळे, धर्माधिकारी ह्यांनी नांदेडच सोडले. आता नांदेडला गेलो की आवर्जून भेटावे, असे अण्णासाहेब राहिले होते. खरे म्हणजे अण्णासाहेबांची अन् माझी तेवढीशी जवळीक नव्हती. जरा अंतर होते. ते आदरापोटी होते. माझ्या मानाने गाडगीळ अन् कुरुंदकर हे अण्णासाहेबांच्या अधिक जवळ होते. पण तरी अण्णासाहेबांच्या मायेच्या वर्तुळात माझा समावेश होता. त्यांच्या प्रत्येक कार्यक्रमात माझा सहभाग असायचा. तो उभयपक्षी गृहीतच धरला असे. पीपल्स कॉलेज बरोबरच

कलामंदिर, अण्णासाहेबांचे गायन-वादन विद्यालय, वसेकरांची अभिनव चित्रशाळा, कानोल्यांचे गोदातीर इतिहाससंशोधन मंदिर नि कस्तुरेशास्त्र्यांची पाठशाळा या आमच्या मर्मबंधातल्या ठेवी होत्या. या प्रत्येक एकाकी तपश्चर्येबद्दल आमच्या मनात गाढ आपुलकी नि श्रद्धा होती. प्रतोद नि दीपकळी हे तर आमचे स्वेदज औरस अनुबंध होते. ही सर्व नांदेडची भूषणे होती. प्रेमाने जपून ठेवावीत नि अभिमानाने मिरवावीत अशी. अण्णासाहेब गेले अन् त्यातले एक अमोल अलंकरण गळून पडले. आता सायकलवरची त्यांची मलमलच्या नेहरूशर्टातली ती चिरपरिचित मूर्ती दिसणार नाही. ती खडी बोली ऐकू येणार नाही. श्यामकल्याणमधील तो पहाटेचा रियाझ आता कानावर पडणार नाही. पलुस्कर पुण्यतिथीला अण्णासाहेबांचे ते आरंभीचे वृंदवादन व शेवटचा तो "सबरस"ही आता आठवणीतच शिल्लक राहणार. आणि मनोमन कष्टी झालो. दोन वर्षांपूर्वीच मराठवाडा विद्यापीठाने डी. लिट. ही पदवी देऊन त्याच्या अर्धशतकाच्या संगीतसेवेचा गौरव केला होता. यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, पु. ल. देशपांडे यांसारख्या नामवंतांनी अण्णासाहेबांच्या संगीतक्षेत्रातील एकनिष्ठ कार्याचे मनापासून कौतुक केले होते. मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात आज संगीताची उपासना करणारे असंख्य कलावंत अण्णासाहेबांच्या परिश्रमाबद्दल मनापासून कृतज्ञता बाळगीत आहेत.

अण्णासाहेब मूळचे यवतमाळ जिल्ह्यातील गुंज या गावचे. शिक्षण अत्यल्प. तिथून परभणीला गेल्यावर त्यांना व्यायामशिक्षक, फोटोग्राफी यांसारखे व्यवसाय निर्वाहासाठी करावे लागले. भजनामध्ये भाग घेण्याच्या आवडीमुळे वादनाची व गाण्याची गोडी वाढत गेली. नांदेडचे रसिकाग्रणी श्री. ग. ना. आंबेकर यांनी त्यांना १९२४ मध्ये नांदेडला आणले. १ डिसेंबर १९२७ रोजी चंपाषष्ठीच्या मुहूर्तावर त्यांनी नांदेडला गायन-वादनाची संस्था स्थापन केली. विद्यार्थ्यांना शिकवीत असतानाच अण्णासाहेब स्वतः शिकत गेले व विद्यार्थ्यांच्या साक्षीनेच संगीतातील सर्व प्रकारांवर त्यांनी प्रभुत्व संपादन केले. अलंकार आणि प्रवीण या संगीतक्षेत्रातील सर्वोच्च पदव्या मिळविल्या. संगीत प्रवीण या परीक्षेसाठी त्यांनी "भारतीय संगीत, एक आढावा" हा अभ्यासपूर्ण प्रबंध सादर केला होता. एक सामान्य माणूस कलेच्या प्रेमाखातर व कलेच्या भरवशावर साधनेची शेवटची पायरी गाठून त्या क्षेत्रातील असामान्य पुरुषार्थ सिद्ध करू शकतो हे अण्णासाहेबांच्या जीवनाकडे पाहिल्यावर लक्षात येते. एखाद्या गरजू गायनमास्तराने पोटापाण्यासाठी चालविलेल्या गायनशास्त्राची कला न येऊ देण्याबाबत अण्णासाहेबांचा प्रारंभापासून कटाक्ष होता. आपले विद्यालय हे संगीतकलेच्या व शास्त्राच्या तात्त्विक व प्रायोगिक अभ्यासाचे केंद्र झाले पाहिजे ही त्यांची मुळात तळमळ होती. त्या निष्ठेने नि पोटतिडिकेने

गेल्या जवळजवळ अर्धशतकापासून संपूर्ण मराठवाड्यात भूषणीभूत झालेली ही संस्था अण्णासाहेबांनी निर्माण केली. आजपर्यंत हजाराहून अधिक विद्यार्थी या संस्थेतून बाहेर पडले. त्यांपैकी अनेकजण शिक्षाविशारद, संगीतविशारद, व अलंकार झाले आहेत. त्या विद्यार्थ्यांमध्ये राम पिंगळीकर, नाथ नेरळकर, लक्ष्मीकांत जोशी, उत्तम अग्निहोत्री, शिवदास देगलूरकर, रमेश कानोले, नलिनी देशपांडे, शाम गुंजकर या नामवंतांचा समावेश आहे. या कलावंतांना अखिल भारतीय स्पर्धांमध्ये मानाची पारितोषिके मिळाली आहेत.

अण्णासाहेबांनी मराठवाड्यातील संगीतसंमेलने भरविली. संगीत विषयावर शास्त्रपूत व्याख्याने घेतली. संगीतसाधनेबरोबरच संगीतश्रवणासाठी सामान्य श्रोत्यांचे कान तयार केले. संगीतकाराबरोबरच संगीताची जाण असणारे रसिकही वाढवले. मराठवाड्याच्या सांस्कृतिक पोषणावर अण्णासाहेबांचे योगदान फार मोठे आहे.

संगीताची एकाकी साधना केली असती तर अण्णासाहेबांची वैयक्तिक इयत्ता मोठ्या प्रमाणात वाढली असती. त्याऐवजी अण्णासाहेबांनी गाण्याचे अंग असणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या पातळीपर्यंत आणण्यात कृतार्थता मानली, हे त्यांचे मोठेपण होय. विदर्भ साहित्य संघातर्फे यावर्षी नागपूरला त्यांचा मोठा सत्कार करावा, त्यांच्या व त्यांच्या विद्यार्थ्यांच्या कलेची ओळख वैदर्भीय रसिकांना करून द्यावी असा माझा संकल्प होता. त्यासाठी अण्णासाहेबांची संमतीही मिळविली होती. पण निष्ठुर नियतीने हा योग चुकवला. नियतीच्या अरसिकतेवर मात्र अण्णासाहेबांची मात्रा चालू शकली नाही.

■ ■

# श्रीब्रह्मचारी महाराज

वणीला येऊन काही दिवस झाले होते. एके दिवशी मार्डीकर देशपांड्यांपैकी एक वृद्ध गृहस्थ माझ्याकडे आले. ओळखीपाळखीचे सुरुवातीचे बोलणे झाल्यानंतर त्यांनी चिचमंडळच्या ब्रह्मचारी महाराजांची गोष्ट काढली. ते म्हणाले, "आम्ही त्यांना ईश्वरी अवतारच मानतो. त्यांनी एक मराठी ग्रंथ लिहिला आहे. तो आपण एकदा डोळ्याखालून घालावा." मी कबूल केले व एकदा महाराजांच्या दर्शनाला येण्याची इच्छाही व्यक्त केली. त्यापूर्वी मी महाराजांचे नाव ऐकले होते. पाटणबोरीच्या मठामध्ये लहानपणी त्यांचा फोटोही पाहिला होता. त्यांच्याबद्दलच्या आख्यायिकाही कानावर होत्या. त्यांचे वय शंभर वर्षांहून अधिक आहे, ते रामदासी आहेत, एकांतामध्ये व्रतस्थ जीवन जगत आहेत; त्यांचे वैराग्य कडकडीत आहे; स्त्रीदर्शन त्यांना अजिबात वर्ज्य आहे; वृत्तीने ते अत्यंत कडक व कोपिष्ट आहेत--त्यांच्याबद्दलचे एक चित्र या आख्यायिकांनी मनात तयार होते. बोलणारे त्यांच्याबद्दल दबकूनच बोलत, त्यामुळे त्यांचे दर्शन घेण्याची उत्सुकता मनात वाढत गेली. अशातच उन्हाळ्यात एका भगभगत्या दुपारी मार्डीचे श्री. मारोडकर हे महाराजांनी लिहिलेली ती पोथी घेऊन माझ्याकडे आले. त्या पोथीबद्दलच्या त्यांच्या भावना फार पवित्र व हळुवार होत्या. एका अवतारी सत्पुरुषाने लिहिलेली ही पोथी एका साहित्यिक प्राध्यापकाला वाचायला देण्यास त्यांचे मन फारसे राजी नव्हते. त्यांच्या मते पोथीतील विषय फार गहन होता. तो विषय व महाराजांचे विवेचन समजण्याची पात्रता फार थोड्यांमध्ये असते. हे पुस्तक मला समजण्याबद्दलच्या माझ्या पात्रतेबद्दलची शंका ते आडून व्यक्त करीत होते. पण महाराजांच्या आज्ञेमुळे त्यांचा निरुपाय होता. ते पुस्तक मी वाचावे, आवश्यक वाटल्यास त्यात दुरुस्त्या कराव्या व त्यावर माझा अभिप्राय द्यावा, या अपेक्षेने

खुद्द महाराजांनीच ते माझ्याकडे पाठविले होते. मी ती पोथी ठेवून घेतली. सवडीने वाचूनही काढली. पोथीचे स्वरूप दासबोधासारखे होते. दासबोधातील विशेषत: तत्त्वज्ञानात्मक भागाचा अनुवादच त्या ग्रंथामध्ये उमटला होता. ग्रंथात भाषादोष विपुल होते. त्याखेरीज ग्रंथात विशेष काही दुरुस्ती करण्याची माझी पात्रता नव्हतीच. एक दिवस माझ्या अभिप्रायासहित तो ग्रंथ मी परत केला.

त्यानंतर महाराजांच्या दर्शनाचा योग अचानक आला. श्री. दिगंबरराव देशपांडे मार्डीला व चिचमंडळालाही जाणार होते. मी त्यांच्याबरोबरच येण्याची इच्छा बोलून दाखवताच त्यांना आनंद झाला. दुसरे दिवशी त्यांच्याबरोबर मी मार्डीला पोहचलो. त्यांच्या वाड्यात मुक्काम केला. हातपाय धुऊन चहा घेतला. कपडे बदलून निघालो. पँट वा पैजामा महाराजांकडे चालत नसे. म्हणून धोतर नेसून निघालो. महाराजांचा मठ गावाबाहेर एका शेतात होता. एकाकीच होता. आजूबाजूला काही मोठी झाडे होती. आम्ही गेलो तेव्हा महाराज मठात नव्हते. नदीवर सायंस्नानासाठी गेले होते. त्यांची वाट पाहत आम्ही मठाबाहेरील झाडाखाली बसलो. दरम्यानच्या वेळात दिगंबररावांनी मला महाराजांबद्दलची माहिती दिली. महाराज वर्धा नदीच्या काठावरील शेतात चिचमंडळला मुद्दामच येऊन राहिले होते. शेताच्या मालकाने पुढे त्यांना झोपडी बांधून दिली. नंतर भिंती उभ्या राहिल्या. दोन खोल्या, समोर ओसरी व पुढे अंगण अशी मठाची वास्तू तयार झाली. अंगणात टचुवरवेल होती, नि देवपूजेसाठी काही फुलांची झाडे. मठाभोवती कुंपण होते. कुंपणाचे फाटक नेहमी बंद असे. तिथे तीनचार फलक लावले होते. एकावर लिहिले होते– 'येथे कोणी आम्हाला त्रास देऊ नये. आम्ही जगाच्या भानगडीत पडत नाही. जगानेही आमच्या भानगडीत पडू नये. कुणीही आमच्या उपासनेत व एकांतात व्यत्यय आणू नये.' दुसऱ्या एका फलकावर पाश्चात्य वा यावनी वेषात या ठिकाणी प्रवेश वर्ज्य असल्याची ताकीद होती. महाराजांचे सोवळे अत्यंत कडक होते. ते त्रिकाल स्नान व संध्या करीत. नेहमी आपल्या अनुष्ठानात मग्न असत. कोणाच्या हातचे खात-पीत नसत. काही स्वीकारीतही नसत. त्यांच्या अपरिग्रह व अनासक्तीचा भेटणाऱ्यांवर आपोआप वचक पडत असे. दर्शनार्थी लोकांची ते सायंकाळी भेट घेत. दुरूनच त्यांच्याशी बोलत. फारसे जवळ येऊ देत नसत. आवश्यकता पडल्यास भक्ताकडून साखर, तूप वा फळे यांचा कामापुरता स्वीकार करीत. त्यांच्या वैराग्यवृत्तीमुळे व तपाचरणा-मुळे पंचक्रोशीत त्यांच्या नावाचा दबदबा होता. त्यांच्याभोवती अलौकिकत्वाच्या आख्यायिकांचे एक वलय होते...

मठासमोर जमिनीवर बसल्या बसल्या मी ही सर्व सश्रद्ध वर्णने ऐकत होतो. महाराजांच्या भेटीबद्दलचे कुतूहल त्यामुळे दुणावत चालले होते. तेवढ्यात

स्नान आटोपून महाराज परत आले. आम्ही उभे राहिलो. आमच्याकडे पाहत पाहत ते सरळ मठात गेले. थोडया वेळाने ते मठातून बाहेर आले. फाटकातच खाली फरशीवर बसले. आम्ही त्यांच्या पाया पडलो. समोरच जमिनीवर बैठक मारली. महाराजांनी विचारले, "कुठचे पाहुणे ?"

दिगंबररावांनी उत्तर दिले, "वणीचे."

दिगंबररावांनी वणीचे प्राचार्य म्हणून माझी ओळख करून दिली.

महाराजांनी विचारले, "शेवाळकर ?"

मी म्हटले, "हो"

त्यांनी पुन्हा विचारले, "राम शेवाळकर ?"

मी पुन्हा "हो" म्हटले.

"भाऊसाहेबांचे चिरंजीव ?" त्यांनी परत विचारले.

"हो," मी उत्तर दिले.

मग त्यांनी भाऊसाहेबांची चौकशी केली. अचलपूरच्या गोष्टी काढल्या. भोलारामच्या समाधीचे दर्शन घेण्याकरिता ते अचलपूरला येऊन गेले होते. आमच्याच घरी मंदिरात उतरले होते. भाऊसाहेब त्यावेळी गावी नव्हते. घरात आमची वहिनी–पाटणबोरीच्या महाराजांची मुलगी फक्त होती. अशा इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर संध्याकाळ झाली. मग महाराजांनी आम्हाला आत प्रवेश दिला. अंगणात बसलो. महाराजांनी आपल्या पूर्वायुष्यातल्या काही आठवणी सांगितल्या. स्वत: रचलेली पदे म्हणून दाखविली. महाराजांना गळा चांगला होता. पण पदांची रचना चालीमध्ये बसण्यासारखी नव्हती, तरी सर्व पदे ते सुरावरच म्हणत होते. पदांमध्ये व भाषेमध्ये उघड उघड दोष जाणवत होते. पुढे त्याचे कारण महाराजांकडूनच कळले.

महाराज मूळचे मीनाक्षी मदुराईकडचे. नाव सुब्रह्मण्यमस्वामी. घरचे सधन. वडील मोठे अंमलदार. घराणे गणपतीचे उपासक. महाराजांचा जन्म अठराशे एकाहत्तर सालचा. वयाच्या तेराव्या वर्षीच विरक्ती येऊन महाराजांनी घराकडे पाठ फिरवली ती कायमचीच. गणेश उपासना, नामजप, ध्यानधारणा, एकांतवास हा तेव्हा जीवनक्रम होता. मन:शांतीसाठी तीर्थाटन, साधुसंतांच्या भेटी, यात्रा करीत ते केडगावला आले. नारायण महाराजांच्या सहवासात एक चातुर्मास घालवला. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळे काही दिवस जवळच्याच पडवी नावाच्या खेडयात एका गरीब पण सत्प्रवृत्त शेतकऱ्याच्या घरात वास्तव्य केले. पुढे गणपतीची क्षेत्रे पहात एकदा ते मोरगावला आले. तिथे पौष वद्य ४, शके १८५२ गुरुवार (दि. ८-१-१९३१) रोजी त्यांना दृष्टान्त झाला. प्रत्यक्ष गणपतीने त्यांच्या हाती दासबोध दिला. दुसरे दिवशी सकाळी देवळातून एक

ब्राह्मण शिधा घेऊन आला. दुसऱ्याने दासबोध हातात ठेवला व दोघेही निघून गेले. रात्रीच्या दृष्टांताची प्रचीती आली.

त्यानंतर अंतःप्रेरणेनेच दासबोध वाचायला सुरुवात केली. मराठी अजिबात कळत नव्हते, पण दासबोधाच्या कृपेने हळूहळू समजू लागले. समर्थांनी मनाची पकड घेतली. मग दासबोधपारायणाबरोबरच समर्थांचे सर्व ग्रंथ मिळवून वाचून काढले. समर्थांवरचेही मिळतील ते सर्व ग्रंथ वाचून काढले. आता दासबोधाचे पारायण हाही एक नित्यक्रम झाला. आणि गणेशक्षेत्राबरोबरच समर्थक्षेत्रही पाहण्याचा छंद लागला. समर्थ जीवनातील सर्व ठिकाणे पाहून झाली. पुढे फिरत फिरत माहूरला आले असताना वणीच्याजवळ वसिष्ठा नदीच्या तीरावर आले. एका शेतामध्ये राहू लागले. महाराज स्वतःच्या हाताने स्वतःपुरते तांदूळ शिजवीत. तेवढे वर्षाचे धान्य त्या शेतकऱ्याकडूनच मिळे. बाकी कुणाकडून काही अपेक्षा नव्हत्या. कारण गरजाही नव्हत्या. त्याच ठिकाणी एके दिवशी माघ व ॥ १, शके १८७५ [दि. १८-२-५४] रोजी सायंकाळी सूर्यास्ताच्या सुमाराला महाराजांना त्यांच्या आराध्यदेवतेचा दुसरा दृष्टांत झाला. सायंपूजेच्या वेळी तसबीर पुसत असताना चेहरा गणपतीचा नि देह समर्थांचा असा साक्षात्कार झाला. महाराजांच्या घरात परंपरेने गणपतीची उपासना होती. मोरगावापासून महाराजांनी समर्थांचा पंथ स्वीकारला. या दोन्ही उपासनांचे अद्वैत या नव्या दर्शनाच्या रूपाने प्रकट झाले. तेव्हापासून महाराजांनी "गजनरवेष" या नव्या दैवताची उपासना सुरू केली. त्या संध्याकाळी झालेले ते अद्वितीय दर्शन पुढे मूर्तीच्या व चित्रांच्या रूपाने मठात कायमचे स्थापन झाले. या नव्या दैवताची पूजा व उपासना आता सुरू झाली. या एकांतिक उपासनेने हळूहळू शतक गाठले.

महाराजांचे व्यक्तिमत्त्व चांगले होते. शरीर उंचपुरे व ताठ होते. वर्ण गव्हाळ, डोळे बारीक व नाक धरधरीत होते. वयाची शंभरी ओलांडल्यावरही केस काळेशार होते. कान, डोळे, दात, किंबहुना सर्व कर्मेंद्रिये व ज्ञानेंद्रिये कार्यक्षम होती. मेधा, स्मृती व धारणा अद्याप तल्लख होती. केस तर भरगच्च, खूपच लांब होते. जमिनीवर अगदी लोळत असत. दोनदा त्यांनी समारंभपूर्वक शास्त्रोक्त केशदान केले होते. येणाऱ्याजाणाऱ्यांशी महाराज मराठीतच बोलत असत. मराठी त्यांना कोणी शिकविली असेल ?

"समर्थांनी." महाराजांनी उत्तर दिले.

महाराजांचे मराठी भाषेचे शिक्षक खुद्द समर्थच होते. दासबोध वाचता वाचता मराठी भाषा समजत गेली. या दाक्षिणात्य साधकाजवळ दासबोधाच्या माध्यमातून मराठी माऊलीने आपले हृदय प्रगट केले. महाराजांच्या लेखनात व

बोलण्यात जे भाषादोष जाणवत होते त्यांचे कारण आता माझ्या लक्षात आले !

शतायुषी असल्यामुळे महाराज मनाने व निष्ठेने जुन्याच काळात वावरत होते. ते अतिशय धर्मनिष्ठ, कर्मठ व सनातनी होते. सोवळे ओवळे कडक पाळीत असत. समर्थांबद्दल उत्कटतेने बोलत. "समर्थांनी तुमच्या देशाकरिता जितके केले, तुम्ही समर्थांकरिता काय केले ?" असे तळतळाटाने विचारीत. आमची भेट झाली त्याच सुमारास मराठी वर्तमानपत्रांतून समर्थांच्या प्रतिगामी विचारसरणीवर हल्ला करणारे लेख प्रसिद्ध झाले होते. "समर्थ हे आदिलशहाचे हेर होते" असे समर्थांचे बेछूट मूर्तिभंजन सर्रास चालू होते. महाराजांच्या वाचनातून ते गेले असते तर निश्चितच त्यांची प्रतिक्रिया याहीपेक्षा संतप्त झाली असती.

जगाच्या व्यवहारापासून महाराज अलिप्त होते. निरिच्छ व निःस्पृह असल्याने सत्ता व संपत्ती यापैकी कशाचीही ते दरकार बाळगत नसत. कुणापासून काही घेणेच नसल्याने कुणाचे लिंपित राहण्याची गरज नव्हती. त्यामुळे त्यांची मते माहीत असतानाही व ती अमान्य असतानाही त्यांच्याबद्दल गाढ श्रद्धा असणाऱ्यांची संख्या विपुल होती. त्यांची अनासक्ती, तपश्चर्या व विरक्ती निर्विवाद होती. नव्या काळात धर्मनिष्ठ म्हणवणाऱ्यांनी नव्या परिस्थितीशी जुळवून घेतले. परिणामी विचार व आचार, युक्ती व कृती यांत अंतर वाढत गेले. या वैषम्याचा महाराजांना संताप यायचा. तुकोबाच्या म्हणण्याप्रमाणे, "बरे झाले देवा कुणबी झालो, ना तरी दंभे असतो मेलो ।" अशा उच्चवर्णीयांच्या दिखाऊ धर्माचरणावर व दंभावर ते त्वेषाने आसूड ओढत व त्यांच्याशी व्यवहार बंद ठेवीत. मठात त्यांना मज्जाव करीत. भक्त व दर्शनार्थींखेरीज उर्वरित समाजाशी व गावाशी महाराजांचा संबंध येत नसे. तरी पुढे पुढे महाराजांच्या सोवळ्या आचारधर्मामुळे त्यांना सामाजिक दोषाचा त्रास होऊ लागला.

पुढे महाराजांचे व माझे संबंध वाढत गेले. माझ्याकडे कुणीही सश्रद्ध पाहुणा आला की त्याची महाराजांशी भेट घालून द्यावी असे मला वाटे. एकदा ज्येष्ठ महिन्याच्या दशाहारात नागपूरहून समर्थ सेवामंडळाचे आठ-दहा वयोवृद्ध कार्यकर्ते आले. त्यांत ॲड. रा. का. मनोहर, सोमलवार, नाना धर्माधिकारी हे लोक होते. त्यांना घेऊन मी चिचमंडळला गेलो. दशाहार असल्यामुळे सर्वांनी वर्धेत स्नान केले. महाराजांच्या दर्शनाला गेलो. आमची मठात जेवण्याची व्यवस्था होऊ शकली असती. महाराजांना तसदी नको म्हणून आम्ही वणीवरूनच बरोबर पुरेशी शिदोरी घेतली होती. महाराजांसाठी फळेही नेली होती. महाराजांच्या सोवळ्या मनाला बरोबर शिदोरी आणणे आवडले नाही. फळे खरकटचाबरोबर आणलेली असल्यामुळे ती स्वीकारण्यासही त्यांनी नकार दिला.

निघताना महाराजांचा राग ओसरल्यावर मी सर्व फळे चि. आशूच्या हातात दिली. महाराजांना म्हटले, "नातवाच्या हातून फळे घ्यायला काहीच हरकत नाही असे वाटते." महाराज हसले. आणि त्यांनी ती फळे ठेवून घेतली. महाराजांना स्त्रीदर्शन वर्ज्य आहे असे मी ऐकत होतो. पण वणीला आल्यावर माझ्या पत्नीला व इतर कुटुंबीय स्त्रियांना त्यांनी मुळीच आडकाठी केली नाही.

कविवर्य ग. दि. माडगूळकरांना महाराजांबद्दल मी बोललो होतो. महाराजांच्या भेटीला येण्याची त्यांची इच्छा होती. पण दोनदा वणीला येऊनही चिचमंडळला जाण्याचा योग आला नाही. डॉ. अ. ना. देशपांडेही तिथपर्यंत पोहचू शकले नाहीत मधूनच आम्हाला परतावे लागले.

विसाव्या शतकात वावरत असूनही धर्माचे सार्वभौम प्रभुत्व असलेल्या मध्ययुगीन काळापलीकडे महाराज कधी आले नाहीत. गुहेमध्ये एकाकी तपश्चरण करीत असलेल्या साधकाला बाहेरच्या स्थित्यंतराची गंधवार्ताही नसावी, तसे महाराजांचे जीवन होते. एकापरीने लोकसंमर्दात असूनही ते लोकातीत होते.

आणि अचानक १९ मे १९८० ला सकाळी ब्रह्मचारी महाराजांचा खून झाल्याची दुर्वार्ता आमच्या कानावर आदळली. तावडतोब आम्ही चिचमंडळाला गेलो. महाराजांची भक्तमंडळी जमा झाली होती. पोलिसांच्या देखरेखीखाली महाराजांचा निष्प्राण विवस्त्र देह मठामध्ये पडला होता. फरशीवर, चादरीवर, उशीवर रक्ताचे गडद डाग पडले होते. भुवई व नाकपुडीवर जखमा होत्या. सर्वात भयानक म्हणजे महाराजांचे वृषण पूर्णपणे सोलून काढले होते. एक शतायुषी तपःसाधनेची सांगता अशा भीषणप्रकारे का व्हावी, याचे गूढ मला अद्याप उलगडले नाही.

महाराजांना बाकी या संकेताची चाहूल लागली असावी, असे त्यांच्या शिष्यांच्या बोलण्यावरून कळले. त्यांच्या कथित भाकितानुसार तिसऱ्या दिवशी बरोबर खुनी सापडला. कुळमेथे नावाचा हा तरुण आदिवासी पोरगा आदल्याच दिवशी वर्धेच्या तुरुंगातून सुटून आला होता. दिवसा मठासमोर व गावामध्ये संशयास्पदरीत्या वावरत असलेला त्याला लोकांनी पाहिले होते. महाराजांच्या सोबतीसाठी मठात राहणारे त्यांचे भक्त संध्याकाळच्या जेवणासाठी गावात गेल्याचे त्याने पाहिले आणि ती संधी साधून त्याने झाडावरून उडी घेऊन मठात प्रवेश केला. आपली सायंपूजा आटोपून महाराज शांतपणे अंथरुणावर पडले होते. रात्री दहाच्या सुमाराला महाराजांचे सोबती मठात आले. नेहमीप्रमाणे फाटकाजवळ काठी आपटून आपण आल्याची वर्दी दिली. पण आज काठीच्या आवाजाला प्रतिसाद मिळेना. म्हणून या शिष्यांनी त्यांना मोठ्याने हाक मारली. त्यासरशी कफनी घातलेला एक अनोळखी तरुण बाहेर आला आणि

" महाराजांची योगसाधना चालू आहे तुम्ही त्यात व्यत्यय आणू नका ", असे बजावून पुन्हा आत गेला. शिष्यांना संशय आला. ते पुन्हा गावात गेले. आणखी गावकरी गोळा करून त्यांनी मठात प्रवेश केला. तोपर्यंत मघाचा अज्ञात तरुण तिथून पसार झाला होता. महाराजांचे रक्तबंबाळ निर्जीव शरीर तेवढे तिथे पडले होते.

पुढे रीतसर पोलीस कारवाई होऊन कुळमेथेला पुन्हा तुरुंगवास घडला. काही दिवसांनी तुरुंगातच तोही मृत्यू पावल्याचे कळले. कुळमेथे हा अघोरपंथी साधक होता. तुरुंगातच तो आपली यातुसाधना करीत असे. या साधनेतील यशासाठी कुणीतरी त्याला आजन्म ब्रह्मचाऱ्याचे रक्तप्राशन हा उपाय सुचवला आणि त्याच्या अघोरी साधनेची परिणती या घोर प्रकारात झाली. शेवटी एका शतायुषी तपश्चर्येची समाप्ती एका य:कश्चित गुन्हेगाराच्या हातून एका मूर्ख समजुतीपोटी व्हायची होती. भगवान श्रीकृष्णाच्या लोकोत्तर व देदीप्यमान अवतारकार्याचा अंतही एका य:कश्चित पारध्याच्या नगण्य बाणाने व्हावा, असाच विधिसंकेत होता. महाराजांचेही तसेच झाले आणि एक जुना अश्वत्थ-वृक्ष कोसळून पडला. दक्षिणेत जन्म घेऊन सर्व भारतभ्रमणानंतर विदर्भात वसिष्ठातीरी स्थिरावलेले एक नि:संग, निधडे, उदास असे रामदासीजीवन एका अमानुष अडाणी हत्येने एकाएकी संपुष्टात आणले. गणपतीने समर्थांच्या ओटीत घातलेला एक वैराग्यसंपन्न तपस्वी जीव एका क्षुद्र मारेकऱ्याला आपल्या लोकोत्तर जीवनाचा अहेर अर्पण करून लोप पावला. वसिष्ठेच्या काठावरील विजनात प्रज्वलित झालेला एक धगधगीत यज्ञ मध्येच एकाएकी विझून गेला.

तसे महाराज आमच्याजवळ असून आमचे नव्हतेच. एकोणिसाव्या शतकात तारुण्य काढलेले त्यांचे मन विसाव्या शतकाच्या इहवादी युगधर्माशी शेवटपर्यंत संवाद राखू शकले नाही. त्यांचे पूर्वायुष्य आम्हाला अज्ञात होते. त्यांचे तपश्चरण अज्ञेय होते. त्यांचा अंतही अनाकलनीय ठरला.

> अव्यक्तादीनि भूतानि
> व्यक्तमध्यानि भारत ।
> अव्यक्तनिधनान्येव
> तत्र का परिदेवना ॥

अज्ञातातून येऊन अज्ञात रीतीने पुन्हा अज्ञातात अस्तंगत होणाऱ्या एका लोक-विलक्षण तपस्व्याचा एवढासा " व्यक्तमध्य " तेवढा आमच्या ज्ञानाच्या कक्षेत जेमतेम येऊ शकला.

■ ■

# कुरुंदकर : दिवसाउजेडी

कुरुंदकर हे नाव पहिल्यांदा वाचले, ते त्यांनी ‘ नवभारत ’ नि ‘ सत्यकथा ’ मध्ये अनुक्रमे अ. ना. देशपांडे नि वा. ल. कुळकर्णी ह्यांच्या विवेचनांवर प्रति-क्रियात्मक टिपण लिहिले, तेव्हा. त्यानंतर ‘ सत्यकथे ’मध्ये त्यांची मर्ढेकरांच्या सौंदर्यशास्त्राचा परामर्श घेणारी लेखमाला सुरू झाली. आधीच मर्ढेकर, त्यात पुन्हा त्यांचे सौंदर्यशास्त्र आणि त्यावरचे हे जडजंबाल विवेचन ! कुरुंदकर या नावाबद्दल धास्ती वाटण्याची ती सुरुवात होती.

त्यानंतर त्यांच्याबद्दल आख्यायिका ऐकायला मिळाल्या. ते संपूर्ण रस्त्याने वाचन करीत कसे जातात, उन्हाळ्यात डोक्याचा गोटा कसे करतात, त्यांना गुप्तहेरकथा वाचण्याची आवड किती आहे, मध्येच अनवाणी संचार करण्याची लहर त्यांना कशी येते इत्यादी दंतकथांनी मनातल्या मनात विद्वत्ता नि विक्षिप्तपणा ह्यांचे परंपराप्राप्त नाते कुरुंदकरांच्याही बाबतीत जुळवून टाकले.

कुरुंदकरांना पाहिले ५७ साली औरंगाबादच्या साहित्य संमेलनात, सौंदर्य-शास्त्रावरच्या एका अनाकलनीय परिसंवादात बोलताना. त्यावेळी त्यांचा साधा वेश, ‘ जगत्तुच्छं मन्ये ’ अशी नजर नि वैशिष्ट्यपूर्ण आवाज–ह्याची नोंद विद्वत्ता नि वक्तृत्वाबरोबरच मनात होऊन गेली.

योगायोगाने त्याच वर्षी मी नांदेडला प्राध्यापक म्हणून गेलो. नियुक्तीपूर्वी ज्या तीन चार मुलाखती घेण्यात आल्या, त्यांत एक कुरुंदकरांनी घेतली होती. त्यावेळी उमेदवाराचे पाणी जोखणारी त्यांची अंतर्भेदी दृष्टी नि अंगावर धावून येणारी आक्रमक वादपद्धती अनुभवून सर्वांची गाळण उडून गेली होती. कुरुंदकरांचा प्रत्यक्ष सहवास मिळण्यापूर्वी पुन्हा एकदा त्यांच्याबद्दलच्या दंत-कथांनी मला वेढा घातला. त्यांचे अपुरे शिक्षण, अफाट अभ्यास, त्याहीपेक्षा

बेफाम अहंकार, जगाला धूत्कारून वागण्याची शैली, भल्याभल्यांची भंबेरी उडविण्याची, त्यांचा पाणउतारा करण्याची—त्यातून स्वतःचे श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याची हौस, त्यांच्या खुशमस्कऱ्यांचा मठ, त्यातील त्यांची महंतगिरी, इत्यादी बाबी कानी आल्या. त्या काळी नांदेडमधे कुरुंदकर हे वैचारिक क्षेत्रातील एक प्रस्थ म्हणून ओळखले जात होते. डॉ. बारलिंगे, व म. म. यज्ञेश्वर शास्त्री कस्तुरे यांसारख्यांचा कुरुंदकरांच्या बुद्धिमत्तेवरचा नि ज्ञानावरचा विश्वास त्यांच्याशी झालेल्या अनेक चर्चांमधून सिद्ध झालेला होता. रससौंदर्यशास्त्र, भरत, अभिनवगुप्त, रिचर्डस्, मूर, रसेल, विझगेनस्टाईन, लॉजिकल पॉझिटिव्हिझम्, नवकाव्य, अस्तित्ववाद या शब्दांनी तेथील सर्व शैक्षणिक जग गजबजून गेले होते. कुरुंदकर या सर्व विचारप्रवाहांचे पीठाधीश भाष्यकार होते. नांदेडच्या वाङ्मयीन सांस्कृतिक चळवळीचे कुरुंदकरांशिवाय पान हलेनासे झाले होते. आम्हीही त्यांचे आपसातले नामकरण कुचेष्टेने शंकराचार्य असे केले होते.

'शंकराचार्यां'च्या सुरुवातीच्या भेटीत त्यांचे चढाईचे धोरण गृहीत धरून मी बचावात्मक पवित्रा घेत असे. पुढे पुढे भेटीगाठी वाढल्या. सार्वजनिक कार्यामध्ये पुन्हा पुन्हा संबंध येत गेले. चर्चाही मनमोकळ्या होत गेल्या, तसतसे ऐकीव पूर्वग्रहांचे पापुद्रे उभयपक्षी गळून पडू लागले. एकमेकांच्या खाचाखोचा लक्षात येईपर्यंत संबंध घनिष्ठ झाले. तेव्हा एकमेकांची जाहीर कुचाळकी करणे श्रोत्यांच्याही दृष्टीने आवश्यक होऊन बसले. कुरुंदकरांचे नि माझें एकमेकांच्या उपस्थितीत दुसऱ्याच्या खोडसाळ उल्लेखाशिवाय साधे सरळ व्याख्यान झाले तर ते श्रोत्यांना मानवत नसे. वादविवादामध्ये ठरवून एकमेकांच्या विरुद्ध बाजू लढवणे एरव्हीही होते. पण एकदा एकाने मांडलेल्या मुद्याला दुसरीही त्याहून महत्त्वाची अंगे कशी असतात ते लढाऊ बिनतोडपणाने दाखवण्यात दुसऱ्यास कृतकृत्यता वाटे. त्याच वेळी कुरुंदकरांचे आकलनाचे, ज्ञानाचे नि चिंतनाचे क्षेत्र किती विशाल नि व्यापक आहे, याची नीट कल्पना आली. साहित्यविचार, सौंदर्यशास्त्र, तत्त्वज्ञान, राजकारणापासून संगीत नि चित्रकलेपर्यंत त्यांच्या विवेचनाची झेप होती. हे विवेचन पुन्हा मूलग्राही नि तरी सर्वस्पर्शी असायचे. व्याकरण, भाषाशास्त्र, इतिहास, यासारख्या मराठी मास्तरांच्या हातखंडा विषयांत त्यांचे स्वतःचे वेगळे चिंतन असे. त्याने त्यापूर्वीच्या सर्व ज्ञात प्रतिपादनावर एक निराळाच प्रकाश पडे. कुरुंदकरांना कोणता विषय गम्य आहे, हा त्यामुळेच आमच्यामध्ये पुढे संशोधनाचा विषय ठरला. माझ्या पिढीला इतके चतुरस्र पांडित्य, चोख आकलन, नि तर्कशुद्ध विवेचन अभावानेच आढळले. या पांडित्याला सुदैवाने रसिकतेचे वावडे नाही. एखाद्या कलाकृतीची आस्वाद्यता सर्व सूक्ष्म बारकाव्यांसहित त्यांच्या वाणीने

अनुभवण्यात आनंद द्विगुणित व्हायचा. सौंदर्यास्वादापासून चावट गप्पांपर्यंत कुरुंदकरांची रसज्ञता अकुंठित असे.

माणूसघाणेपणा हा अभ्यासकांचा अलंकार मानला जाण्याच्या काळात कुरुंदकरांचा लोकसंग्रह व सामाजिक कार्याचा व्याप पाहून आश्चर्य व समाधान वाटते.

या माणसाचा सहवास त्याच्या विदग्ध स्वैरकथांमुळे अवीट वाटतो. त्याच्या वाक्प्रवाहाला तसे आपले सोयरसुतक फारसे नसते. श्रोता व कागद कोणताही चालतो. ह्याच्या संचयाची नि चिंतनाची नोंद दृढ होण्याशी मतलब. त्यामुळे चव नसलेल्या लोकांना त्यांचे त्या विशिष्ट आवाजातले एकसुरी बोलणे निद्रानाश घालवते. पण वक्त्याला त्याची चिंता नसते. आवाजाची अजिबात अनुकूलता नसतानाही, ह्याचे वक्तृत्व कित्येकदा एखाद्या शास्त्रोक्त संगीताच्या मैफलीसारखे श्रवणीय वाटते. कधी बडा ख्याल, कधी ठुमरी, कधी ठाय लय, कधी द्रुत गत, कलावंताची तपस्या त्या स्वरविलासातून जाणवत असते. त्याबरोबर सुरांचे एक देखणे शिल्पही आकारला येत असते. स्वरांच्या शागिर्दीला ही समग्र साधना आस्वाद्य वाटत असते. संस्कृत पाठशाळेत वेदान्तदर्शनाचा प्रतिवाद करणारे त्यांचे पाखंडी विवेचन ऐकल्यावर बराच वेळ मी भानावर नव्हतो. सोमनाथ साहित्य संमेलनाच्या उद्‌घाटनाचे त्यांचे भाषण ऐकल्यावर सर्व मंडप अवाक झाला होता. आकंठ तृप्तीनंतर जी निःशब्दता येते, तिचा अनुभव कुरुंदकरांच्या व्याख्यानांनी अनेकदा दिला. त्यांच्या वक्तृत्वाचे हे भारूड ओसरायला बराच वेळ लागतो.

कुरुंदकरांना बोलण्याची हौस आहे. त्याचे कारण त्यांना लिहिण्याचा कंटाळा आहे. त्यांचे बहुतेक महत्त्वाचे लेखन त्यांनी डिक्टेट केलेले असते. स्वतः लिहिण्याचा कंटाळा ही वाचकांच्या दृष्टीने बाकी इष्टापत्तीच म्हटली पाहिजे, कारण त्यांचे स्वहस्ते लेखन फार दारुण असते. शुद्धलेखन समितीवर मौलिक योगदान करणाऱ्या या पंडिताचे अक्षर नि लेखन अक्षरशः दिव्य आहे. त्यांना एखाद्या प्राथमिक शाळेच्या मुलाची शिकवणी लावली की काय, असे ते लेखन पाहिल्यावर वाटते.

कुरुंदकरांचा प्रेमविवाह झालेला आहे. त्यांचा संसार इतकी वर्षे सुखाचा दिसतो, त्याचे प्रमुख कारण, मला वाटते; त्यांनी सौ. प्रभावतीबाईंना स्वहस्ते पत्र पाठवले नसावे.

■ ■

# कुरुंदकर : काळोखानंतर

गेल्या अकरा फेब्रुवारीला दुपारी पावणे चार वाजता नांदेड येथे गोदाकाठी गोवर्धन घाटावर कुरुंदकरांच्या शवासमोर मी उभा होतो. असंख्य हारांच्या ढिगाखाली आमचा उणापुरा पाव शतकाचा स्नेहसंबंध निश्चेष्ट होऊन पडलेला होता. चेहरा शांत होता. कपाळावर करकचून आवळलेल्या दोरीची काच तेवढी पडलेली होती.

आत्ता परवा ते ग्रंथव्यवहार परिषदेच्या निमित्ताने वणीला येऊन गेले होते. दोन दिवस त्यांचा भरगच्च सहवास लाभला होता. परिषदेतील प्रत्येक बैठक व परिसंवाद त्यांच्या मौलिक अध्यक्षीय चिंतनाने संस्मरणीय ठरला होता. रायपूरला माझे जाणे झाले नाही. मित्रमेळाव्यात भेट होईल असे वाटले होते. त्यांचा तसा निरोप होता. पण ते आले नाहीत. मध्ये एकदा मीही नांदेडला जाऊन आलो. पण ते गावी नव्हते...वणीची त्यांची भेट शेवटचीच ठरली.

ग्रंथव्यवहार परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी वणीला यावे, त्यांना मानधनच काय, पण प्रवासखर्चही मिळणार नाही, असे स्वच्छ कळवूनही कुरुंदकर वणीला आवर्जून आले. त्यांनी रिक्षाखर्चसुद्धा माझ्याकडून घेतला नाही. माझ्या आमंत्रणानुसार असेच ते वेळोवेळी वणीला आले. ती. भाऊसाहेबांच्या अमृत-महोत्सवाच्या वेळीही असेच आले. घरचे कार्य समजून आले. आढेवेढे घेतले नाहीत. सबबीही सांगितल्या नाहीत. गेली पंचवीस वर्षे त्यांचे हे प्रेम मला मिळाले. खरे म्हणजे आमच्या संबंधाची सुरुवात दोन वेगळ्या छावण्यांमधून झाली. सत्तावनमध्ये मी नांदेडला गेलो. गेल्यागेल्याच कुरुंदकरांबद्दलच्या आख्यायिकांनी मला घेरून घेतले. त्यांचा उद्दाम अहंकार, तुच्छताबुद्धी, आक्रमक प्रतिपादनशैली, इतरांचा जाहीरपणे पाणउतारा करण्याची आवड या त्यांच्या

बहुचर्चित स्वभाववैशिष्ट्यांमुळे माझे मन शबलित होऊन गेले. त्यामुळे त्यांना भिऊन वागणे वा त्यांच्याच पद्धतीने त्यांच्या तोंडास तोंड देणे हे दोनच पर्याय माझ्यापुढे होते त्यातला दुसरा पर्याय पत्करल्यामुळे मी आणि कुरुंदकर अंतराने जवळ येऊनही अंतःकरणाने दुरावत गेलो. आपसात आम्ही त्यांना कुचेष्टेने 'शंकराचार्य' म्हणत असू. त्यांच्या बोलण्याची, फाटे फोडण्याच्या सवयीची, आवाजाचीसुद्धा नक्कल करीत असू. पण तरी अंतर वाढू शकले नाही. कारण प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमात एकत्र यावे लागे. त्यांच्याच अध्यक्षतेखाली बोलावे लागे. समारोपाच्या भाषणात ते काय चिमटे घेतील त्याचा आगाऊ अंदाज घेऊन मोर्चेबंदी करावी लागे. ही चलाखी लक्षात आल्यावर चिमटे घेण्यातली व घेऊ देण्यातली खुमारी वाढली. हळू हळू श्रोत्यांनाही आमची अशी युती आवडत चालल्याचे आढळून आले. कुणा एकाच्या व्याख्यानालाही श्रोते हमखास मिळत. पण एकाच व्यासपीठावर दोघांची व्याख्याने–तीही परस्पर-विरुद्ध बाजूने असली तर गर्दीच्या खुषीला सुमारच नसे. यातून मोकळेपणा वाढत गेला. परस्परांची मने लख्ख समजून आली. एके दिवशी भर लग्नमंडपात प्रा. कहाळेकरांच्या पायांवर मस्तक ठेवताना कुरुंदकरांना पाहिले नि उरला सुरला दुरावा विरघळून गेला. याही माणसाला वाकावेसे वाटण्यासारखी काही श्रद्धास्थाने आहेत, हा प्रत्यय अकल्पित पण सुखद होता. आक्रमक अहंकार हा याचा सार्वजनिक पवित्रा आहे, स्वसंरक्षणाचे ते एक कवच आहे, आत्म-प्रस्थापनेचा तो एक अनागर उपाय आहे या जाणिवेने नंतर त्यांच्याबद्दल आपुलकी वाढू लागली. पाहता पाहता त्याचे गाढ स्नेहात रूपान्तर केव्हा झाले ते दोघांच्याही लक्षात आले नाही. पुढे नांदेडच्या सांस्कृतिक विश्वात कुरुंदकर–शेवाळकर हा इतरेतर द्वंद्वसमास रूढ झाला.

दपम्. जोशी, तुशम्. कुळकर्णी, सदाशिव कहाळेकर हे खरे म्हणजे कुरुंद-करांचे जिवलग बालमित्र. या परिवारात आता माझाही समावेश झाला. एकमेकांबद्दल सभांमध्ये उखडेलपणाने बोलणे हे या संबंधाचे जाहीर स्वरूप होते. पण अथांग, अबोल आस्था हा त्याखालचा अखंड आंतरिक स्रोत होता.

जवळ आलो तेव्हा त्यांच्या ज्ञानसाधनेची व्याप्ती, विविधता नि खोली लक्षात आली. तोपर्यंत तो आमच्या टवाळीचाच विषय होता. विद्यार्थिवयातच त्यांच्याकडून अफाट वाचन होऊन चुकले होते. केतकरांच्या ज्ञानकोशाचे सर्व खंड वाचून झाले होते. त्यांचे मामा डॉ. नांदापूरकर त्यावेळी महाभारतावर अभ्यास करीत होते. चर्चेसाठी त्यांना अनायासे घरातलाच बालपंडित उपलब्ध झाला. नेमकी व मूलगामी दृष्टी, तत्त्वशोधकता नि मर्मज्ञता ही मुळातल्या कुशाग्र बुद्धिमत्तेला मातुल कुळाकडून मिळालेली देणगी आणि विषयाच्या गाभ्यालाच हात घालून पदर न पदर पिंजून काढणारे तर्कनिष्ठ विश्लेषण–ही

कऱ्हाळेकरांची कृपा. प्रतिपक्षाला उघडे पाडून नामोहरम करणारे गनिमी वाक्पाटव–ही नांदापूरकर संप्रदायाची मुद्रा लेऊन कुरुंदकर विशीतच वाग्युद्धासाठी सज्ज झाले. तोपावतो जुने वाङ्मय संपवून मार्क्सवादाशी सलगी सुरू झाली होती. समीक्षा, सौंदर्यशास्त्र, समाजशास्त्र, दर्शनशास्त्र असा त्यांच्या प्रज्ञेचा चौफेर अकुंठित संचार चालू होता.

सुरुवातीला आम्हाला वाटे; सौंदर्यशास्त्र हाच खरा कुरुंदकरांचा विषय. त्यांनी आम्हा संस्कृतच्या अभ्यासकांसमोर रसशास्त्रावर अनधिकाराने बोलण्याचा उद्धटपणा करू नये. पण अभिनव गुप्ताच्या मध्यस्थीशिवाय भरतसूत्रांचा अर्थ लावण्याच्या तयारीने संस्कृतचा गंधही नसलेले कुरुंदकर म. म. कस्तुरेशास्त्रांच्या पायाशी नाट्यशास्त्र समजावून घेण्यासाठी दाखल झाले. म्हणूनच पढिक पंडितांची पर्वा न करता नाट्यशास्त्राचे मौलिक व विचारप्रवर्तक असे अनोखे आकलन ते ग्रंथबद्ध करू शकले !

नेहरूंच्या राजकारणावर, भारत–चीनवादावर, चित्रकलेतील नवप्रवाहावर, संगीतशास्त्रावर, नवनाट्यावर–अशी कुरुंदकरांची अनेक व्याख्याने मी त्यानंतर ऐकली. नेहरू, पटेल, आझाद, आंबेडकर ह्यांच्या जीवितकार्याचे रहस्य त्यांच्याच व्याख्यानातून जाणून घेतले. संगीतावरचे त्यांचे विवेचन इतर भाषांमधूनही भारतीय तज्ज्ञांपुढे जाऊन विचारार्ह ठरले. भारतातील मुस्लीम प्रश्नाबाबतचे त्यांचे विश्लेषणही भाषांतरित होऊन सर्वत्र प्रसारित झाले. कस्तुरेशास्त्र्यांच्याच संस्कृत पाठशाळेत शारदीय व्याख्यानमालेतील वेदांतावरचे त्यांचे व्याख्यान मला अजूनही आठवते. श्रोत्यांमध्ये त्या विषयातले दिग्गज बसले असताना वेदांतावरच्या आपल्या मौलिक व पाखंडी शंका साधार उपस्थित करणारे त्यांचे विवेचन वक्तृत्वदृष्ट्याही इतके हृदयंगम झाले की, त्या व्याख्यानानंतर काही काळ मी भानावरच नव्हतो. परतताना मित्रांबरोबर 'बीस साल बाद' हा रहस्यपट पाहायला गेलो. त्या सिनेमात माझे लक्ष लागले नाही. इतकी कुरुंदकरांच्या वाक्चातुर्याची घट्ट पकड मनावर बसली होती.

वक्तृत्वाबद्दल ओघानेच आले म्हणून नोंदवणे आवश्यक आहे. कुरुंदकरांचा आवाज भाषणबाजीसाठी अत्यंत प्रतिकूल. एखाद्याचे अशा आवाजातले साधे बोलणेसुद्धा कंटाळवाणे होते. पण कुरुंदकरांची विवेचनाची एकदा लय लागली की एखाद्या संगीताच्या मैफिलीसारखी सभा मंत्रमुग्ध होऊन जाई. विषयावरची घट्ट मांड, चोख प्रतिपादन, तर्कशुद्ध युक्तिवाद, चकित करणारे विश्लेषण व या साऱ्या गुणांना तोलून धरणारी समर्पक भाषा ह्याच्या साह्याने कुरुंदकर सभेला चटकन् कह्यात घेत. इतका गैरसोयीचा आवाज असूनही व्यासंग व विचारसंपन्नतेच्या बळावर महाराष्ट्र जिंकणारा दुसरा वक्ता माझ्या पाहण्यात

नाही. खणखण रोकड मोजून घ्यावी तसे चकचकीत विचार त्यांच्या विवेचनातून बाहेर पडत. सोमनाथच्या साहित्य संमेलनातले त्यांचे उद्घाटनाचे भाषण असेच उपस्थितांना अवाक करणारे ठरले. बाबा आमटयांनी योजकतेने उद्घाटनानंतर लगेच रसपानासाठी मध्यंतर जाहीर केला. त्यावेळी काहीही न बोलता आम्ही डोळे वासून एकमेकांकडे होश हरपल्यासारखे त्यांचे भाषणही एखाद्या उस्तादाच्या मजबूत ख्याल–गायकीसारखे श्रोत्यांना तन्मय करून गेले होते.

तर्ककठोरपणाचे व्रीद पत्करल्यामुळे कुरुंदकर भावनेचे लाड होऊ देत नसत. एकदा हैद्राबादच्या स्वातंत्र्यसंग्रामावरचे भाषण चालू असताना त्यांनी 'वंदे मातरम्' या प्रत्येक घोषणेसरशी फटके खाऊन मूर्छित पडलेल्या एका देशभक्ताचा उल्लेख केला. पण कुरुंदकर निर्विकार होते. व्याख्यानानंतर मी त्यांना त्या प्रसंगाच्या बाबतीत कृपणपणा दाखवून असा अन्याय का केलात असे विचारले. तेव्हा त्यांनी शांतपणे सांगितले, "तुम्ही हे ठिकाण फुलवले असते. पण मला भावनेच्या आहारी जायचे नाही." मी नांदेड सोडले त्यावेळी झालेल्या निरोपसमारंभात कुरुंदकर एकच हळवे वाक्य बोलले–"माझे अर्धे अंग आज पांगळे झाले आहे." दुसरे दिवशी सकाळी सहाच्या बसवर माझ्या प्रेमाचा सर्व परिवार निरोप द्यायला बस स्टँडवर जमला होता. आश्चर्य म्हणजे कुरुंदकरही ऐनवेळी रिक्षाने येऊन पोचले. सगळयांनाच आश्चर्य वाटले. एखाद्याला निरोप द्यायला जाणे, इतक्या सकाळी उठणे व रिक्षा करून येणे–यापैकी काहीच कुरुंदकरांच्या सर्वपरिचित स्वभावात बसणारे नव्हते. बसमध्ये चढण्याअगोदर मी गर्दी बाजूला करून कुरुंदकरांजवळ गेलो आणि त्यांच्या पायावर डोके ठेवले. त्यांनी एकदम मला जवळ घेतले, मला हुंदका फुटला; त्यांनी धरून मला बसमध्ये चढवले. बस निघाली तेव्हा सर्वांचे डोळे पाणावले होते. पण कुरुंदकर शांत होते. वणीला पोहचल्यावर कुरुंदकरांचे दीर्घ पत्र आले. त्यात त्यांनी लिहिले होते, "तुम्हाला निरोप देताना माझेही हृदय भरून आले होते. पण भावनेला आपल्यावर स्वार होऊ देणे माझ्या अहंतेला मानवणारे नाही. म्हणून अनेकदा गैरसमज होतात. तुम्ही माझे आहात, तुम्ही मला समजून घेऊ शकाल." भावनाशून्य तर्ककर्कशता कुरुंदकरांनी जाणीवपूर्वक पत्करली नसती तर त्यांचा जगन्नाथपंडित झाला असता.

अलीकडे बाकी दोन वेळा कुरुंदकरांना विव्हल झालेले मी पाहिले आहे. त्यांच्या मुलाच्या मौंजीच्या निमित्ताने समविचाराच्या मित्रांनी त्यांच्याविरुद्ध जे काहूर उठविले त्यावेळी व नामांतरप्रकरणी झालेल्या वादळाच्या वेळी. तसे कुरुंदकर वादळांना आमंत्रण देणारेच व्यक्तिमत्त्व होते. गुहेत जाऊन निद्रिस्त

श्वापदाला डिवचून अंगावर झेलण्याची त्यांना मुळातच आवड. समोरच्यांची आवडती मते निरर्थक ठरवून त्यांना चिडवण्याची कुरुंदकरांना नेहमीच खुमखुमी येत असे. त्यामुळे मतभेद, विरोध, वादळे ह्यांची त्यांना नव्हाळी नव्हती. कर्तृत्वसंपन्न प्रज्ञावंतांना समकालीनांच्या प्रखर द्वेषाचेही नेहमीच लक्ष्य बनावे लागते. द्वेष ही पराजित व निष्क्रिय बुद्धिमत्तेची हताश बनलेली विषारी प्रतिक्रिया असते. सार्वजनिक आयुष्यात तीही पचनी पाडून घ्यावी लागते. अर्थात व्यक्तिद्वेषातून उफाळलेल्या विरोधाचेही कुरुंदकरांना अप्रूप नव्हते. पण समविचाराच्या मित्रांनी आपली बाजू समजून घेण्याचेही क्लेश न घेता एखाद्या मद्याचे टोलेजंग भांडवल करावे. यामुळे ते उद्विग्न झाले होते. प्रबोधनासाठी व उद्‌बोधनासाठी ज्यांना कुरुंदकरांचा आधार वाटे अशांनीही यावेळी त्यांच्याकडे बेदरकारपणे पाठ फिरविली. त्याहीपेक्षा एस. एम. प्रकरणात त्यांची व्याकुळता सीमेला पोचली होती. नामांतराच्या मुद्यावर मराठवाड्यातील दलितेतरांची प्रक्षुब्ध मनःस्थिती व एस. एम. ची शांतियात्रा या दोन टोकांवर सेतू बांधण्याच्या धडपडीत दोन्ही टोके हातातून निसटली व सपशेल तोंडघशी पडण्याची केविलवाणी वेळ कुरुंदकरांवर आली. झालेल्या अनपेक्षित अपमानाने एस. एम. सारख्यांनी स्तंभित होऊन जाणे समजण्यासारखे आहे. पण कुरुंदकरांची अगतिकताही डोळ्यावर कातडे ओढण्यासारखी निश्चितच नव्हती. हे समविचारी मित्रांच्या लक्षात आले नाही व आयुष्यभर ज्यांची इमानाने साथ केली असे सोबती एस. एम. चा कैवार घेण्याच्या निमित्ताने जन्माचे वैर करण्याच्या तयारीला लागले. हे दृश्य विदारक होते. कुरुंदकरांची अडचण याहीपेक्षा मोठी होती. एकीकडे एस. एम. सारखे श्रद्धास्थान, दुसरीकडे सामाजिक कार्यातले सहकारी. या द्वंद्वामध्ये त्यांच्या मनाचा चेंदा झाला. पत्रकार, विचारवंत, साहित्यिक हे सारे मित्र वास्तव समजून घेण्यापुरतेही सहृदयता दाखविनासे झालेत. या दारुण अपेक्षाभंगाने त्यांना किती अस्वस्थ केले होते याची कल्पना त्यांच्या त्यावेळच्या नांदेड भेटीत आली.

कुरुंदकर हे केवळ ज्ञानसाधक नव्हते. सामाजिक कार्यकर्तेही होते. बालवयात हैद्राबादच्या स्वातंत्र्य संग्रामातली पडेल ती कामे त्यांनी केली. पुढे राष्ट्रसेवादलाचेही काम केले. याव्यतिरिक्त आपापल्या क्षेत्रात व्रतस्थपणे तपश्चर्या करणाऱ्या सांस्कृतिक संस्थांच्या पाठीशीही ते आपलेपणाने आपणहून उभे राहिले. नांदेडचे कलामंदिर, गायनवादन विद्यालय, संस्कृत पाठशाळा, अभिनव चित्रशाळा, गोदातीर संशोधक मंदिर व प्रतोद साप्ताहिक ह्या संस्था कुरुंदकरांच्या उदार सहकार्याची कृतज्ञतेने कबुली देतील. हे सहकार्यही कुरुंदकरांनी अशा तपोनिष्ठ संस्था जगाव्यात, त्यांच्या दुर्लक्षित कार्याची कदर व्हावी, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात या संस्थांना व व्यक्तींना त्यांचे

रास्त स्थान मिळावे या भावनेपोटीच निरपेक्षपणे केलेले असे. इतरांशी रूक्ष व तर्ककठोर वागणारे कुरुंदकर अशा काही संस्थांच्या व व्यक्तींच्या बाबतीत कोवळे होत. स्वामीजी, गोविंदभाई, डॉ. नांदापूरकर, कहाळेकर, बाबा आमटे, अनंत भालेराव, एस. एम. जोशी ही अशी काही ठिकाणे.

कुरुंदकरांचा गोतावळा मोठा होता. त्यात त्यांच्या मित्रांबरोबरच त्यांच्या शिष्यांचा व भक्तांचाही तांडा मोठा असे. हे त्यांचे शिष्य त्यांच्या दृष्टि-पातासरशी त्यांची पडतील ती कामे तत्परतेने करण्यास उत्सुक असत. नांदेडमध्ये किंवा कुठेही कुरुंदकर नेहमी अशा कळपासमवेतच हिंडत. आमच्या मित्रमंडळीत हा 'कळप करून राहणारा प्राणी' त्यामुळे थट्टेचा विषय बने. आम्ही या शिष्यांना 'कल्याण' व कुरुंदकरांना 'मठाधिपती' म्हणत असू. कुरुंदकर आपला मठ घेऊन कुठेतरी जात किंवा बसलेले असत. अन् त्यांचे सर्व कल्याण जीवाचे कान करून त्यांचे विवरण ऐकत राहात. या कल्याणांची मठाधिपतीवर फार भक्ती. पुष्कळदा यामुळे मठामठात भांडणे होण्याची भीती असे. कुरुंद-करांचेही आपल्या शिष्यांवर अपार प्रेम होते. भुजंगवाडीकर वा अण्णा सूर्यवंशी या आपल्या विद्यार्थ्यांना प्रतिष्ठेचा निर्वाह मिळवून देण्यासाठी कुरुंदकरांनी संस्थाचालकांचे उंबरठे झिजवण्यात कसलाही कमीपणा मानला नाही.

परवाच्या त्यांच्या अंत्यदर्शनाच्या प्रसंगी मराठवाडाभर पसरलेला त्यांचा शिष्यसमुदाय पोरकेपणाच्या भावनेने व्याकुळ झालेला पाहिला आणि आमच्या थट्टेला पात्र ठरलेल्या कुरुंदकरांच्या असामान्य कमाईची जाणीव झाली. कुरुंदकरांच्या ऐनपणात झालेल्या अकाली व आकस्मिक निधनामुळे त्यांच्या चाहत्यांच्या, विद्यार्थ्यांच्या मनाला न भरून येणारी जबर जखम झालेली आहे. संपूर्ण मराठवाड्याच्याच सांस्कृतिक जीवनाला पोरकेपणा आला आहे. साहित्य, संगीत, नाट्य, कला, समाजकारण, शिक्षण, राजकारण या सर्व अंगांनी मराठवाड्याचा पिंड पुष्ट करू शकणारा एक श्रीमंत आधार कोसळून पडला आहे.

कुरुंदकरांनी इतक्या लवकर, इतक्या तडकाफडकी न सांगतासवरता आमचा रीतसर निरोप घेण्याआधीच निघून जाण्याचे काहीच कारण नव्हते.

कुरुंदकर, का आमचा असा विश्वासघात केलात ?

■ ■

# ✓महामानव : बाबा आमटे

बाबा आमटे कोण आहेत ?

स्थानिक पातळीवरील लोकनेते, सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, एक गांधीवादी विधायक समाजसेवक, कुष्ठसेवेच्या कार्यातील एक अग्रणी. महाकवीची प्रतिभा लाभलेले एक चिंतक, निःसंज्ञ व निष्क्रियांना भाव आणून कार्यप्रवण करणारा एक प्रेरक वक्ता, देशातील तरुणांची बदनामी धुऊन काढण्यासाठी त्यांना विविध पुरुषार्थक्षेत्रे उपलब्ध करून देणारा स्फूर्तिदाता, कुष्ठरोगी, अंध, अपंग, मूकबधिर व मनोरुग्ण यांना आत्मनिर्भर बनवणाराएक स्वावलंबनाचा मंत्रद्रष्टा, आत्मकेंद्रित व सुखलोलुप गर्दीमध्ये, निःस्वार्थ व समर्पित कर्तृत्वाचे मळे फुलविणारा लोकोत्तर बागवान, पर्यावरणातील तोल सांभाळण्यासाठी झटणारा वृक्षप्रेमी, धर्म, जाती, पंथ, भाषा, प्रांत व पक्ष यांच्या विविध गटांमध्ये एकराष्ट्रीयत्वाचे सेतुबंधन करणारा एक देशभक्त, 'नित्य नवा दिस जागृतीचा' हे ओळखून जीवनामध्ये प्रतिक्षणी विविध प्रयोगशीलतेचे कृतीद्वारे नवेनवे उन्मेष प्रकट करणारा एक व्रती महापुरुष...

बाबा आमटे कोण आहे ?

नित्यनवी स्टंटबाजी करणारा एक भंपक बुवा, स्वतःच्या लोकसेवेचा बाजार मांडणारा एक जाहिरातपटू व्यापारी, दुसऱ्याच्या प्रतिभेचे श्रेय राजरोस लाटणारा एक बनेल शब्दसाधक, अगतिक निराधारांचे निर्दय शोषण करून त्यावर स्वतःच्या मोठेपणाची पोळी भाजून घेणारा लबाड दांभिक, स्वतःच्या अंगीकृत कुष्ठकार्याशी व्यभिचार करणारा भ्रमरवृत्तीचा समाजकार्यकर्ता, तुटपुंज्या अप्रामाणिक कामाच्या भरवशावर नामवंतांकडून स्वतःभोवती आरती ओवाळून घेण्याची आवड असणारा एक स्वार्थपीडित व्यवहारवादी, मित्रमेळावे व

चर्चासत्रे ह्यांचे इंद्रजाल उभारून अज्ञ जनतेच्या डोळ्यात धूळ फेकणारा एक चालबाज राजकारणी, एक क्रूर हुकूमशहा...

बाबा आमटे कोण आहेत ?

स्वतःच्या पिढीजात इस्टेटीचा निर्मम बुद्धीने त्याग करून समाजसेवेत उतरलेला कर्मयोगी, मेहतरांच्या संपाच्या वेळी गावातील संडाससफाईचे काम करून डोक्यावरून मैला वाहून नेणारा अपवादभूत नगरोपाध्यक्ष, कुष्ठरोगांच्या भयभीत करणाऱ्या किळसवाण्या दर्शनाने देवाच्या आमंत्रणासारखा कुष्ठोपचाराच्या कार्याकडे अचानक वळलेला एक कृतिशूर, राष्ट्रपित्याच्या शब्दांत एक 'अभयसाधक', अंगीकृत कार्यात सर्वस्वार्पण बुद्धीने सहकुटुंब सहपरिवार उतरलेला एक दुर्मिळ समाजपुरुष. आनंदवन, अशोकवन, सोमनाथ, नागेपल्ली, भामरागड व हेमलकसा अशी साहसाची, सेवेची व पुरुषार्थांची विविध श्रमतीर्थे उभी करणारा एक प्रयोगवीर, भूमीच्या गर्भातील अनेक गुप्तऐश्वर्यकोष कर्तृत्वाच्या कुदळीने युवाशक्तीला उपलब्ध करून देणारा मार्गदर्शक, पद्मश्री, राष्ट्रभूषण पुरस्कार, बजाज पुरस्कार, बिर्ला पुरस्कार, मॅगसेसे पुरस्कार अशांसारखी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्याप्तीचे बहुमान व त्यातून मिळणारी संपदा विनीतवृत्तीने आनंदवनालाच अर्पण करणारा यज्ञपुत्र, सानेगुरुजी कथामाला, आंतरभारती, लोकबिरादरी, वृक्षदिंडी, पर्यावरण, भारत जोडो अभियान, पंजाब शांतियात्रासारख्या प्रकल्पांमध्ये महारोगी सेवा समितीइतकाच अग्रगामी असणारा एक अथांत कार्यकर्ता, प्रकृतीच्या प्रतिकूलतेची, हितसंबंधीयांच्या बेकदर टीकेची, संबंधितांच्या निष्करुण कृतघ्नतेची, बिभीषणांच्या विश्वासघाताची वा स्वतःच्या असाध्य आजाराच्या जीवघेण्या यातनांची पर्वा न करता अखंड क्रियाशील असणारा एक अविचल धैर्यधर, संपर्कातील सर्वांना आपल्या कृतीने व वाणीने झपाटून टाकणारा प्रेरणापुरुष, जळणाऱ्यांशी सामंजस्य राखून विझण्यास कदापि राजी नसलेला एक पेटलेला पलिता...

बाबा आमटे कोण आहेत ? या एका प्रश्नाला मिळणारी ही सर्व संभाव्य उत्तरे आहेत. या उत्तरांमध्ये मूल्यमापन, गुणग्रहण, पूर्वग्रह, अवास्तवारोप व भक्तिभाव या साऱ्यांचे मिश्रण आहे. त्यांच्या बाबतीत सर्व बाजूंनी टोकाची मते व्यक्त केली जातात. काही व्यवहारचतुर मतप्रदर्शन करताना हिशेबी सावधपणाही दाखवतात. या सर्व मतांमध्ये थोडेफार तथ्य आहे असे गृहीत धरले, तरी बाबांच्या व्यक्तित्वाची व कार्याची धनबाजू ही ऋणबाजूपेक्षा अधिक वजनदार आहे, हे अमान्य करता येत नाही. द्वेष, मत्सर, अपुरे व एकांगी आकलन, मतभेद, पूर्वग्रह, रोष, अनुभवांती आलेला कडवटपणा, भ्रमनिरास, अपप्रचार व मानसिक कावीळ हे सामान्यपणे ऋणबाजूचे आधार-

स्तंभ असतात. एखाद्याच्या व्यक्तित्वाचे वा कार्याचे आकलन करण्याच्या आड येणारा सर्वात मोठा अडथळा वर्तमानाचाच असतो. समकालीनांची दृष्टी धूसर असते व विशेषत: वैचारिकतेची मिरासदारी मिरवणाऱ्या मध्यमवर्गीयांची दृष्टी ऱ्हस्व व कृपण असते. त्यामुळे त्यांच्या आकलनातून निघणारे निष्कर्ष न्याय्य असतीलच, ह्याचा भरवसा देता येत नाही. उभ्या भारताला 'तिलक भगवान' म्हणून पूज्य असणारे लोकमान्य समकालीन पुणेकरांच्या लेखी फक्त साधे 'बळवंतरावच' असतात. मध्यमवर्गीयांच्या दृष्टीने ते 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' म्हणून तुच्छ ठरतात, तर बहुजनसमाजाच्या दृष्टीने 'भट बामण' म्हणून त्याज्य ठरतात. या सर्व संकुचित निष्कर्षांवर मात करून, एखाद्याचे कार्य हे सतत तेवत व तेजाळत राहिले असते. नौआखली यात्रेमध्ये संदेश मागायला आलेल्या विद्यार्थ्यांना गांधीजींनी संदेश दिला होता, 'आमार जीवन इ.–आमार बानी' (आमचे चालते बोलते जीवन, हाच आमचा मूर्तिमंत संदेश), अशांचे जीवनकार्य हेच पुरेसे बोलके असते, तर इतरांचे 'बोलणे' हेच एकमेव कार्य असते.

श्रेष्ठ साहित्यिक पु. भा. भावे हे दुसऱ्यांदा वणीला माझ्याकडे आले, तेव्हा आल्याआल्याच मला म्हणाले, "शेवाळकर, आपल्याला एकदा त्या बाबा आमट्यांकडे जायचे आहे. तो कॉलेजमध्ये आमच्याबरोबर होता. अलीकडे महर्षी झाला आहे. पण ज्या पद्धतीने त्याचे टॉम टॉमिंग चालू आहे, त्यावरून त्याच्या कामाबद्दल माझ्या मनात काही जेनुईन शंका आहेत." मी लगेच बाबांना फोन केला. दुसऱ्या दिवशी त्यांना घेऊन गेलो. ही बाबांच्या कामाच्या आरंभीची गोष्ट आहे. सोमनाथ प्रकल्प जेमतेम नुकताच सुरू झाला होता. आनंदवनात गेल्यावर सवयीप्रमाणे मी बाबांच्या पाया पडलो. भाव्यांनी साधे हातही जोडले नाहीत. 'काय महर्षी ?' असे मोठ्याने संबोधून त्यांनी त्यांचे दोन्ही बाहू गच्च आवळले. त्यानंतर बैठकीमध्ये भाव्यांचा अखंड सूर लागला तो उपरोधाचा व कुचेष्टेचा. कॉलेज काळातील आठवणी निघाल्या. या काळातील आठवणींचे स्वरूप जसे असते, तसेच ते होते. बाबाही त्या गप्पांमध्ये समरस झाले. नंतर ते भाव्यांना घेऊन आनंदवनातून फेरी मारण्यास निघाले. प्रत्येक वॉर्ड, खोली व व्यवस्था ह्यांची ओळख करून देत देत बाबा त्यांच्या पद्धतीने अखंड बोलत होते. भावे त्यांच्या पद्धतीने सर्व बारकाईने न्याहाळत होते. दवाखाने, रुग्णव्यवस्था, रुग्णांची निवासस्थाने, त्यांच्या उपजीविकेचे उपक्रम, सर्वच रहिवाशांचे निर्वाहाच्या बाबतीत स्वयंपूर्णत्व, निराधारांचे संगोपन, सर्वांच्या चेहऱ्यावरचे समाधान व आत्मविश्वास, ह्यांची ओळख करून देत देत बाबा शेतीच्या उत्पादनांकडे वळले. भावे प्रत्येक ठिकाणी 'असं का ?' ह्या अर्थी न बोलता फक्त मान हलवीत होते. आनंदवनातील दूध, फळे, भाज्या व

धान्य बाबांनी दाखवले. त्या सर्व उत्पादनांना राष्ट्रीय स्पर्धांमध्ये बक्षिसे मिळाली होती. कस, चव, पौष्टिकता, दर्शनीयता व वैपुल्य या बाबतीत ही उत्पादने व पिके कुणाला हार जाणार नव्हती. भावे मुकाट्याने बाबांच्या वक्तृत्वाचा धबधबा ऐकत होते. बाबा सांगत होते, "ज्यांच्या खुंटासारख्या मनगटांना पंजे नाहीत व पंजांना बोटे नाहीत अशा अवयव झडलेल्या रुग्णांनी पिकवलेले हे अमाप धान्य साठवून ठेवण्यासाठी ज्या देशात सरकारी गोदामे अपुरी पडतात, त्या देशाला अन्नासाठी दाही दिशा दीनपणे भीक मागायची काय गरज ?"

परतल्यावर बाबांनी भाव्यांना सोमनाथलाही येण्याचा आग्रह केला. भाव्यांचा मघाचा जोश आता ओसरला होता. ते अबोल व अंतर्मुख झालेले दिसले. निघण्यापूर्वी मला बाजूला घेऊन म्हणाले, "शेवाळकर, एकदा आपल्याला सोमनाथला जायला पाहिजे या माणसाचे काम खरोखरच मोठे आहे." आणि हे बोलताना भाव्यांचे डोळे पाणावले होते.

भावे प्रामाणिक होते. आपल्या मतांच्या व विधानांच्या बाबतीत अत्यंत कडवे व अटीतटीचे असूनही बाबांबद्दलचे आपले पूर्वग्रह पुसून टाकण्यास त्यांनी कमीपणा मानला नाही. काही लोकांना अशा बाबतीत आपली लाडकी जाहीर मते सुधारून घेण्याची वेळ आली, तर पराभवाच्या परकोटीच्या यातना होतात. वक्तृत्वासाठी लोकप्रिय असणारे माझे एक ज्येष्ठ प्राचार्य मित्र व्याख्यानाच्या निमित्ताने वणीला आले होते. मित्रमेळाव्याहून मी नुकताच वणीला परतलो होतो. त्या संदर्भात गोष्टी निघाल्या तेव्हा माझ्या लक्षात आले की ते कॉलेज-पर्यंत जाऊनही आनंदवनात डोकावले नव्हते. कारण तिथेच त्यांना 'दुरून डोंगर साजरे असतात', असे कळल्यामुळे त्यांना पुढे सरकावेसे वाटले नाही. विनोबांनी समाजातल्या अशा वाढत्या प्रवृत्तीलाच 'कृष्णभक्तीचा रोग' म्हणून संबोधले आहे. एखाद्या विषयाची काळी बाजू तेवढीच पाह्यची व त्याचीच आपसात चविष्ट चर्चा करायची, अशीच कृष्णभक्तांची आवड असते. त्या विषयाच्या उजव्या बाजूकडे वळावेसे न वाटणे, हेच अशा बिचाऱ्यांचे दुर्दैव असते. कोर्टामध्ये ज्याप्रमाणे न्याय मिळत नसतो, पण कोर्टामध्ये जे मिळते त्याला 'न्याय' म्हटले जाते. या चालीवर कृष्णभक्तांना मूल्यमापन करता येत नाही. पूर्वग्रहदूषित दृष्टीने त्यांना होणारे एकांगी आकलनच मूल्य-मापन म्हणून प्रतिष्ठा पावत असते !

आनंदवन, अशोकवन, सोमनाथ, नागेपल्ली, भामरागड व हेमलकसा ही शापितांच्या उत्थापनाची, पुनर्वसनाची, पुरुषार्थाची व आत्मनिर्भरतेची नवीन तीर्थे विदर्भाच्या भूगोलात नव्याने उत्पन्न झाली आहेत. हा नवा भूगोल

अस्तित्वात आणण्याचा इतिहास बाबांच्या प्रेरणेने निर्माण झाल्याचा वर्तमान आपण अनुभवला आहे. बाबांची मुले व सुनाच नव्हेत, तर देशाच्या कानाकोपऱ्यांतून अनेक बुद्धिमान व तेजस्वी तरुण आपापले शाश्वतीचे सुखासीन निवारे सोडून काळोख्या जंगलात किंवा ओसाडीत आता समर्पण बुद्धीने कार्य करीत आहेत. औदासीन्य, दिशाहीनत्व, सुखलोलुपता व मनोमालिन्य झटकून तरुण पिढी आपली संपूर्ण ताकद निःस्वार्थ बुद्धीने व स्वातंत्र्यपूर्वकालीन ध्येयदृष्टीने सृजनाच्या क्षेत्रामध्ये लावून, 'हात उगारण्यासाठी नसून उभारण्यासाठी असतात' हे बाबांचे आश्वासन सार्थ ठरवीत आहेत. समाजाच्या घृणेला व बहिष्काराला पात्र ठरलेल्या हजारो कुष्ठरोग्यांचे प्रतिष्ठेने पुनर्वसन झाले आहे. त्यांना आत्मविश्वासपूर्ण नवजीवन उमेदीने उपभोगता येऊ लागले आहे. असमर्थांच्या पुरुषार्थातून उरलेली शेप कमाई समर्थांच्या उदासीनतेचा अनुशेष भरून काढण्यात कारणी लावीत आहेत. अंध, अपंग, मूक, बधिर हे सर्व प्राक्तनाचे शिकारी जीविकेच्या बाबतीत पूर्णपणे स्वावलंबी झाले आहेत. दैन्याचे, लाचारीचे, परावलंबनाचे व भिकेचे जिणे त्यांनी कधीच निर्धारपूर्वक नाकारले आहे. अव्यंगांनी ओशाळून जावे, असा कलापूर्ण पराक्रम अपंगांनी गाजवल्याचे उज्ज्वल उदाहरण म्हणजे 'संधिनिकेतन'. या सर्व प्रकल्पांमधील इमारती, कारखाने, उद्योगकेंद्रे, शेते व बगीचे उपयुक्तता आणि सौंदर्य ह्यांच्या समन्वयाची प्रयोगक्षेत्रे झाली आहेत. कचऱ्यातून उपयुक्त कला निर्माण करण्याचे विविध प्रयत्न आनंदवनामध्ये झालेले दिसतात. सामान्यपणे कोणतीही वस्तू तिथे वाया जात नाही. रॉकेल व मीठ सोडल्यास सर्व जीवनावश्यक वस्तू निर्माण करण्याचा आत्मविश्वास ह्या सर्व प्रकल्पांना आला आहे.

मित्रमेळावा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील एक आकर्षण बनला आहे. असंख्य लोक केवळ जाहीर आमंत्रणावर स्वखर्चाने सहकुटुंब सहपरिवार या मित्रमेळाव्याला आवर्जून व ओढीने येतात. दोन दिवस त्या परिसरामध्ये राहतात. तेथील रहिवाशांच्या आतिथ्यशीलतेचा लाभ घेतात. या मित्रमेळाव्याची लोकप्रियता उत्तरोत्तर वाढत आहे. मोठमोठे साहित्यिक, विचारवंत, कलावंत, व लोकनेते या मेळाव्याला आपणहून येतात व हजेरी लावून जातात. एस. एम. जोशी, कुमार गंधर्व, पु. ल. देशपांडे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, राहूल बारपुते, वसंतराव देशपांडे, यांसारखी जीवनातील सत्तत्त्वांचे, सौंदर्याचे व मांगल्याचे यात्रेकरू मित्रमेळाव्याला कर्तव्यबुद्धीने येतात. मित्रमेळाव्याच्या या लोकप्रियतेमुळेही काही असंतुष्टांना पोटशूळ उठणे स्वाभाविक आहे. 'मित्रमेळाव्याला लोक पर्यटकांच्या भावनेने येतात. नित्याच्या चाकोरीपेक्षा वेगळे दोन दिवसांचे मौजमजेचे जिणे चाखण्याच्या स्वार्थबुद्धीने येतात, मित्रमेळाव्याला आपण जाऊन आलो हे सर्वत्र गौरवाने सांगायला मिळावे,

म्हणून येतात, मित्रमेळाव्याला जाणे हा आता उच्च मध्यमवर्गीयांचा एक 'स्टेटस् सिंबॉल' झालेला आहे. "प्रभावित झालेल्या पाहुण्यांकडून स्वत:भोवती दिवे ओवाळून घेण्याचा आनंदोत्सव म्हणून बाबा या मेळाव्याचा उपयोग करून घेतात." अशी नाना प्रकारची टीका अलीकडे मित्रमेळाव्यावर होऊ लागली आहे. एकेकाळी आनंदवनातील सकस दूध व भाजीपाला महारोगाच्या भीतीने वापरण्यास नकार देणाऱ्या लोकांनी मित्रमेळाव्याच्या निमित्ताने आनंदवनात गर्दी करावी, दोन दिवस वास्तव्य करावे, तिथले अन्नपाणी घ्यावे, तेथील रहिवाशांमध्ये मिसळावे, तिथल्या विराट दु:खाचे दर्शन घ्यावे, त्यावरून आपल्या सुखासीन जगण्याने शरमिंदे व्हावे, असे पर्यटकांच्या मनाचे होणारे परिवर्तन ही मित्रमेळाव्याची एक मोठीच फलश्रुती आहे. सुखलोलुप पांढरपेशांची मानसिकता बदलण्याचे काम मित्रमेळाव्यामुळे आपोआप होऊ लागले आहे.

या मित्रमेळाव्यात दीड दोन हजार लोकांची निवास आणि भोजन व्यवस्था विनबोभाटपणे होते. कुठेही आरडाओरडा, आदळआपट, तक्रारीचा सूर वा कुरकूर ऐकू येत नाही. सगळे शांत, शिस्तशीर व सुरळितपणे चालू असते. सगळ्या वेळा तंतोतंत पाळल्या जातात व सगळी कामे न बोलता आटोपली जातात. या सर्व व्यापाचा एक प्रेरणास्रोत बाबांच्या रूपाने अंथरुणावर पहुडला असतो. येणाऱ्या-जाणाऱ्यांची विचारपूस करीत असतो, तर दुसरा प्रेरणास्रोत पाकशाळेमध्ये वा इतरत्र सौ. ताईंच्या रूपाने देवघरातल्या नंदादीपाप्रमाणे नि:शब्दपणे तेवत असतो. विकास, प्रकाश ही मुले आपल्या कुटुंबांसह आपले अस्तित्व न मिरवता आलेल्या गर्दीमध्ये मिसळून गेलेली असतात. या विश्वाच्या स्वामित्वाचा व नेतेपदाचा अहंकार यापैकी एकाच्याही अस्तित्वात वा आचरणात नसतो.

तेथील उपेक्षितांच्या व "दु:खितांच्या दृष्टीने मित्रमेळावा हाच दिवाळी, दसरा, ईद व नाताळासारखा सण असतो. एरव्ही त्यांना वाळीत टाकणारे जग त्यावेळी अश्रू पुसण्यासाठी व आनंद वाढवण्यासाठी आनंदवनात गर्दी करीत असते."

विनोबा म्हणाले होते, 'दुर्गुणांच्या भिंतीला सद्‌गुणांचे झरोके असतात, आतला माणूस झरोक्यातून पाहिले तरच दिसतो, भिंतीशी टकरा घेतल्याने जास्तीत जास्त आपल्याच कपाळावर टेंगूळ येते.'

बाबा आमटे कोण आहेत ? हे आता ज्याचे त्यानेच ठरवावे.

झरोक्यातून पाहिले, तर बेचाळीसची ध्येयधुंदी न उतरलेला एक झपाटलेला व झपाटून टाकणारा असामान्य धडाडीचा देशभक्त दिसेल. कुष्ठरोगी, अंध,

अपंग, मनोरुग्ण, निराधार वृद्ध व अनाथ बालके यांना स्वतःच्या पायावर उभा करणारा एक कर्मयोगी दिसेल. देशातील तरुणाईला साहसाची व आव्हानाची नवीनवी क्षेत्रे उपलब्ध करून देणारा स्फूर्तिदाता दिसेल. दुभंगलेला पंजाब मानवतेच्या भावनेने, स्वतःचा जीव धोक्यात घालून, सांधण्यास निघालेला शांतिदूत दिसेल आणि युवाशक्तीच्या खांद्यांवर कोवळ्या बालतरूंची पालखी देऊन त्याला एकात्म भारताच्या उज्ज्वल उद्याकडे नेणारा महामानवही दिसेल !

आणि भिंतीवर टकरा घेतल्या तर ? आपापले आरोग्य ज्याचे त्यानेच सांभाळलेले बरे !

■ ■

३३६५
२६०६०
७-५-२-३-९०

REFBK-0026060

साहित्य प्रसार केंद्र,नागपूर